केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंची पाहिजे ।।

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित

# श्री सिध्देश्वर महाविद्यालय

माजलगाव ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१










# विचारवेध

वार्षिक अंक २०२१-२२

E-mail: siddheshwar.college@gmail.com Website: www.siddheshwarcollege.com

# भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई

## केंद्रीय कार्यकारिणी



मा.डॉ.सुरेंद्रजी आलुरकर
अध्यक्ष



मा.राधेशामजी लोहिया
उपाध्यक्ष



मा.नितीनजी शेटे
कार्यवाह



मा.प्रा.चंद्रकांतजी मुळे
सहकार्यवाह



मा.सौ.डॉ.कल्पनाताई चौसाळकर
सहकार्यवाह



मा.डॉ.हेमंतजी वैद्य
सहकार्यवाह

## स्थानिक समन्वय समिती



मा.प्रकाशजी दुगड
अध्यक्ष, स्थानिक समन्वय समिती



मा.अमरनाथजी खुर्पे
कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती



मा.सुनिलजी लोढा
कें.कार्य.सदस्य, भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई



मा.अभयजी कोकड
अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती



मा.सुमंतरावजी कुलकर्णी
सचिव, महाविद्यालय विकास समिती



डॉ.महेश देशमुख
प्राचार्य



प्रा.डॉ.गजानन होन्ना
उपप्राचार्य (वरिष्ठ विभाग)



प्रा.युवराज मुळये
उपप्राचार्य (वरिष्ठ विभाग)



प्रा.संतोष लिंबकर
उपप्राचार्य (कनिष्ठ विभाग)

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेचीं पाहिजे ।।

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित

# श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव
# ता.माजलगाव जि.बीड.

# विचारवेध

## वार्षिक अंक २०२१—२२

**Website-** **www.siddheshwarcollege.com**

**Email-** **siddheshwar.college@gmail.com**

- मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.महेश प्रभाकरराव देशमुख

- संपादक मंडळ

डॉ.गंगाधर उषमवार
डॉ.रमेश गटकळ
डॉ.कमलकिशोर लड्डा
प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर
डॉ.राजाराम जाधव
प्रा.राघवेंद्र मुळी
कु.राधिका उरणकर
चि.सौरभ रांजवण

मुद्रक व अक्षर जुळवणी
श्री.राघवेंद्र शिर्षीकर
माजलगाव.

प्रकाशक
प्राचार्य, श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव.
Website-www.siddheshwarcollege.com
Email-siddheshwar.college@gmail.com

हा अंक केवळ खाजगी वितरणासाठी.
या अंकात प्रकाशित साहित्याशी महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...

महाविद्यालयाचा १९वा वार्षिक अंक 'विचारवेध' शैक्षणिक वर्ष २०२१–२२ आपल्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे. कोरोना महामारीचा प्रभाव कमी होत आहे. पुर्वीप्रमाणे महाविद्यालयात विद्यार्थ्यी येत आहेत. या महामारीने मानव जातीला एक संदेश दिला की, या जगात पैसा आणि संपत्ती सर्वस्व नाही. प्रेम, वात्सल्य, मानवता, समरसता हे जीवन जगण्याचे मूल्य आहेत. माणसाने माणसाशी माणसासम वागणे हा संदेश कोरोना अखिल विश्वाला देवून गेला आहे.

यावर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी **'आजादी का अमृत महोत्सवात'** सहभागी होवून विविध कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला आहे. या विचारवेधच्या माध्यमातून आपले लेख, कथा, कविता, निबंध, विनोद इत्यादि प्रकारातून विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले आहेत. या लेखनातून विद्यार्थी भविष्यात एक महान लेखक, कवी, समिक्षक, नेता, समाज सुधारक, प्रशासकीय अधिकारी होवून देशाच्या विकासात हातभार लावतील ही महाविद्यालयाची अपेक्षा आहे.

'विचारवेध' या अंकाचे दरवर्षी प्रकाशन व्हावे म्हणून आम्हाला सातत्याने प्रेरणा देणारे आमच्या संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष मा.श्री.डॉ.सुरेद्रजी आलुरकर, कार्यवाह मा.श्री.नितीनजी शेटे, उपाध्यक्ष मा.श्री.राधेशामजी लोहिया, सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक मा.श्री.सुनिलजी लोढा, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा.श्री.प्रकाशजी दुगड, स्थानिक कार्यवाह मा.श्री.अमरनाथजी खुर्पे,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा.श्री.अभयजी कोकड, सचिव मा.श्री.सुमंतराव कुलकर्णी,महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासा साठी सतत प्रयत्नशील असलेले प्राचार्य डॉ.महेश देशमुख यांची प्रेरणा व मार्गदर्शन मोलाचे आहे. हा अंक तयार करण्यासाठी संस्थेचे सर्व सभासद महाविद्यालयाचे तिन्ही उपप्राचार्य, महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी तसेच आम्हाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वच जणांचे सहकार्य मोलाचे वाटते. तसेच या अंकाची सुबक अक्षरजुळवणी व छपाई करणारे श्री राघवेंद्र शिर्षीकर या सर्वांचे याप्रसंगी मी ऋण व्यक्त करतो.

**संपादक**

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेची पाहिजे ।।

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई जि.बीड.

# केंद्रीय कार्यकारिणी समिती

| अनु.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा.डॉ.श्री.सुरेंद्रजी गोविंदराव आलुरकर | अध्यक्ष |
| २ | मा.श्री.राधेशामजी छगनलाल लोहिया | उपाध्यक्ष |
| ३ | मा.श्री.नितीनजी विजयकुमार शेटे | कार्यवाह |
| ४ | मा.प्रा.श्री.चंद्रकांतजी अनंतराव मुळे | सहकार्यवाह |
| ५ | मा.डॉ.श्री.हेमंतजी वसंतराव वैद्य | सहकार्यवाह |
| ६ | मा.डॉ.सौ.कल्पनाताई गोपाळराव चौसाळकर | सहकार्यवाह |
| ७ | मा.डॉ.श्री.अशोकजी लक्ष्मणराव कुकडे | सदस्य |
| ८ | मा.श्री.विकासजी रामचंद्र डुबे | सदस्य |
| ९ | मा.श्री.रावसाहेबजी राधाकृष्ण कुलकर्णी | सदस्य |
| १० | मा.श्री.शंकरजी विश्वनाथराव लासूने | सदस्य |
| ११ | मा.श्री.वसंतराव त्रिंबकराव पुराणिक | सदस्य |
| १२ | मा.श्री.बाबुराव दगडुबा आडे | सदस्य |
| १३ | मा.श्री.विष्णुजी तुकाराम सोनवणे | सदस्य |
| १४ | मा.श्री.आप्पारावजी तुकाराम यादव | सदस्य |
| १५ | मा.श्री.सुनिलजी कचरुलाल लोढा | सदस्य |
| १६ | मा.सौ.सुनिताताई श्रीकांत देशपांडे | स्विकृत सदस्य |
| १७ | मा.श्री.विजयजी प्रभाकरराव चाटुफळे | स्विकृत सदस्य |
| १८ | मा.श्री.विलासजी नरसिंगराव टोंगे | स्विकृत सदस्य |

**Website- www.siddheshwarcollege.com**
**Email- siddheshwar.college@gmail.com**

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेची पाहिजे ।।

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई जि.बीड

# स्थानिक व्यवस्था मंडळ, माजलगाव

| अनु.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.प्रकाशजी भिकचंदजी दुगड | अध्यक्ष |
| २ | मा.श्री.अमरनाथजी प्रभाकरआप्पा खुर्पे | कार्यवाह |
| ३ | मा.श्री.प्रेमकिशोरजी नंदलालजी मानधने | सदस्य |
| ४ | मा.ॲड.श्री.विश्वासजी सोमेश्वरराव जोशी | सदस्य |
| ५ | मा.श्री.नंदकुमारजी लक्ष्मणराव कुलकर्णी | सदस्य |
| ६ | मा.श्री.तेजसजी प्रकाशजी महाजन | सदस्य |
| ७ | मा.श्री.जगदिशजी रामेश्वरजी साखरे | सदस्य |
| ८ | मा.डॉ.श्री.महेश प्रभाकरराव देशमुख, प्राचार्य महाविद्यालय | सदस्य |
| ९ | मा.श्री.बाबुराव दगडुबा आडे, मुख्याध्यापक माध्यमिक | सदस्य |
| १० | मा.श्री.प्रदीप रंगनाथराव जोशी मुख्याध्यापक प्राथमिक | सदस्य |

# कायम निमंत्रित सदस्य, माजलगाव

| अनु.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.राधेशामजी छगनलालजी लोहिया | कायम नि.सदस्य |
| २ | मा.श्री.सुनिलजी कचरूलालजी लोढा | कायम नि.सदस्य |

Website- www.siddheshwarcollege.com
Email- siddheshwar.college@gmail.com

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेची पाहिजे ।।

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई जि.बीड

# महाविद्यालय विकास समिती

| अनु.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.अभयजी औदुंबर कोकड | अध्यक्ष |
| २ | श्री.सुमंतराव दगडोपंत कुलकर्णी | सचिव |
| ३ | श्री.डॉ.कमलकिशोर कल्याणदास लड्डा | सदस्य (विभाग प्रमुख) |
| ४ | श्री.डॉ.सिताराम बापुराव इंगोले | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| ५ | श्री.डॉ.सतिश सुरेशराव हिवरेकर | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| ६ | प्रा.डॉ.श्रीमती छाया शिवरूपराव कोदरकर | सदस्य (महिला प्रतिनिधी) |
| ७ | श्री.उत्तरेश्वर गोपाळराव आनेवार | सदस्य (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) |
| ८ | श्री.डॉ.संजय गोविंदराव शिरोडकर (प्राचार्य) | सदस्य (संशोधन तज्ञ) |
| ९ | श्री.लक्ष्मीनारायण मिठ्ठुलालजी मुंदडा | सदस्य (उद्योजक तज्ञ) |
| १० | श्री.तुकाराम मुरलीधरराव येवले | सदस्य (समाजसेवक) |
| ११ | श्री.संदीप दत्तात्रय कुलकर्णी | सदस्य (शिक्षणतज्ञ) |
| १२ | श्री.डॉ.विनायक पुंडलिकराव देशमुख | सदस्य (समन्वयक IQAC) |
| १३ | कु.सना गफ्फार आत्तार | सभापती (विद्यार्थिनी प्रतिनिधी) |
| १४ | चि.रघुनंदन पुरूषोत्तम काळे | सचिव (विद्यार्थी प्रतिनिधी) |
| १५ | श्री.डॉ.महेश प्रभाकरराव देशमुख (प्राचार्य) | पदसिध्द सचिव |

# प्राध्यापक वृंद वरिष्ठ विभाग

## कला शाखा

| अनु. क्र. | नाव | विषय | ई–मेल | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.म.प्र.देशमुख (प्राचार्य) | अर्थशास्त्र | mpdeshmukh77@gmail.com | 9158553597 |
| २ | प्रा.यु.रा.मुळये (उपप्राचार्य) | हिंदी | yrmuley2012@gmail.com | 9890785810 |
| ३ | प्रा.डॉ.गं.बा.उषमवार | हिंदी | gbushamwar@gmail.com | 9623785477 |
| ४ | प्रा.डॉ.र.व.गटकळ (विभाग प्रमुख) | मराठी | gatkalramesh@gmail.com | 9970414300 |
| ५ | प्रा.डॉ.ज्ञा.कों.गवते | मराठी | gavatednyaneshwar@gmail.com | 9421505398 |
| ६ | प्रा.डॉ.क.क.लड्डा (विभाग प्रमुख) | इंग्रजी | laddakk2008@gmail.com | 8275521760 |
| ७ | प्रा.डॉ.ता.प.सोंडगे (विभाग प्रमुख) | समाजशास्त्र | tpsondge@gmail.com | 9423473852 |
| ८ | प्रा.जि.श्री.बागल (विभाग प्रमुख) | राज्यशास्त्र | bjijaram@gmail.com | 9764846756 |
| ९ | प्रा.डॉ.गो.पां.फसले (विभाग प्रमुख) | इतिहास | gpf1969@rediffmail.com | 9890121846 |
| १० | प्रा.डॉ.के.का.मालू | इतिहास | kedar.malu@gmail.com | 9689970564 |
| ११ | प्रा.डॉ.सु.हि.पाटील (विभाग प्रमुख) | लोकप्रशासन | spsarthak2008@gmail.com | 9422192459 |
| १२ | प्रा.सु.मा.बनसोडे | ग्रंथपाल | smbansode21@gmail.com | 9637538772 |
| १३ | प्रा.डॉ.उ.रा.साडेगावकर | शा.शि.निर्देशक | umesh.sadegaonkar@gmail.com | 9422231612 |

## वाणिज्य विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.अ.का.होके (विभाग प्रमुख) | वाणिज्य | ashokhoke@rediffmail.com | 9850047312 |
| २ | प्रा.सं.लो.एडके | वाणिज्य | se12868@gmail.com | 9890590072 |

# विज्ञान विभाग

| अनु. क्र. | नाव | विषय | ई–मेल | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.ग.बा.होन्ना (उपप्राचार्य) | वनस्पतीशास्त्र | gbhonna@gmail.com | 9890486288 |
| २ | प्रा.डॉ.प्रे.गो.घडसिंग (विभाग प्रमुख) | वनस्पतीशास्त्र | ghadsingsadhna@gmail.com | 9767926503 |
| ३ | प्रा.डॉ.सि.बा.इंगोले (विभाग प्रमुख) | प्राणीशास्त्र | sbingole@yahoo.com | 9890103310 |
| ४ | प्रा.डॉ.शं.रा.मिटकरी (विभाग प्रमुख) | पदार्थविज्ञान | mitkarisr@gmail.com | 9422244176 |
| ५ | प्रा.डॉ.छा.शि.कोदरकर | पदार्थविज्ञान | chaya.kodarkar@gmail.com | 9421440975 |
| ६ | प्रा.डॉ.वि.पुं.देशमुख | पदार्थविज्ञान | dvinayaka@gmail.com | 9325028239 |
| ७ | प्रा.डॉ.वि.वि.बोरगावकर (विभाग प्रमुख) | रसायनशास्त्र | vikas.borgaonkar@rediffmail.com | 9423716705 |
| ८ | प्रा.सं.रा.पवार | रसायनशास्त्र | pawarsanjay62@yahoo.com | 9850428436 |
| ९ | प्रा.डॉ.प्रे.म.राठोड (विभाग प्रमुख) | गणित | premrathod1971@gmail.com | 9421337528 |
| | **तासिका तत्वावरील प्राध्यापक** | | | |
| १ | प्रा.डॉ.एस.एन.दाभाडे | संगणकशास्त्र | sanskar2786@gmail.com | 9763978188 |
| २ | प्रा.के.व्ही.मिटकरी | रसायणशास्त्र | kalyan.mitkari7008@gmail.com | 9011404142 |
| ३ | प्रा.ए.डी.मकसरे | इंग्रजी | | 9657610840 |
| ४ | प्रा.पी.बी.चव्हाण | इंग्रजी | | 9011504898 |
| ५ | प्रा.ए.पी.भोले | राज्यशास्त्र | | 8180896447 |
| ६ | श्रीमती एम.के.मस्के | अर्थशास्त्र | | 7875454414 |
| ७ | प्रा.ए.एल.डोंगरदिवे | गणित | | 7338454291 |

# प्राध्यापकेत्तर कर्मचारी

| अनु. क्र. | नाव | विषय | ई—मेल | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | श्री उ.गो.आनेवार | अधिक्षक | anewar72@gmail.com | 9403830015 |
| २ | श्रीमती स्वा.गो. धर्माधिकारी | मुख्य लिपिक | sgdharmadhikari67@gmail.com | 9403041059 |
| ३ | श्री सं.व्यं.मोती | वरिष्ठ लिपिक | smoti30@gmail.com | 9420017445 |
| ४ | श्री सु.रा.कुंभकर्ण | वरिष्ठ लिपिक | srkumbhakarn@gmail.com | 9421279039 |
| ५ | श्री सं.बा.लिंबकर | कनिष्ठ लिपिक | | 9881200503 |
| ६ | श्री श.सु.कुलकर्णी | प्र.शा.सहाय्यक | sharadkulkarni69@gmail.com | 9422887743 |
| ७ | श्री एन.जे.नेटके | प्र.शा.सहाय्यक | navnathnetke4@gmail.com | 9921721637 |
| ८ | श्री र.ना.चांभारे | प्र.शा.परिचर | | 9422265870 |
| ९ | श्री रा.वा.पांडागळे | प्र.शा.परिचर | rajvp22@gmail.com | 9422517351 |
| १० | श्री वि.दे.पंडीत | प्र.शा.परिचर | vdpandit7548@gmail.com | 9422696295 |
| ११ | श्री प्र.कु.नांदगावकर | प्र.शा.परिचर | | 8208082602 |
| १२ | श्री द.न.मोटे | प्र.शा.परिचर | | 9175609592 |
| १३ | श्री शै.सु.उजडे | प्र.शा.परिचर | shaileshujade98@gmail.com | 8956568615 |
| १४ | श्रीमती अ.वि.डोंगरे | ग्रंथालय परिचर | | 9890591117 |
| १५ | श्री अ.रा.गुगळे | ग्रंथालय परिचर | | 9403788118 |
| १६ | श्री रा.बा.कोपनर | ग्रंथालय परिचर | | 9405488470 |
| १७ | श्री शं.बा.कदम | प्र.शा.परिचर | shankarkadam2222@gmail.com | 9890723910 |
| १६ | श्री एस.एच.शिंगाडे | प्र.शा.परिचर | ssshingade@gmail.com | 8600737045 |
| १७ | श्री डी.एम.घोडके | सेवक | dmghodke 1984@gmail.com | 9665356851 |
| १८ | श्रीमती एम.ए.कांबळे | सेवक | ashasonwale7@gmail.com | 7020830733 |
| १९ | श्री एस.बी.काळे | सेवक | sudhirkale8247@gmail.com | 9373050537 |

# कनिष्ठ विभाग प्राध्यापक वृंद

| अनु. क्र. | नाव | विषय | ई–मेल | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.सं.बा.लिंबकर (उपप्राचार्य) | रसायनशास्त्र | limbkar1@gmail.com | 9421347311 |
| २ | प्रा.बा.ह.परळकर | मराठी | paralkar948@gmail.com | 9623523623 |
| ३ | प्रा.रा.बा.जाधव | हिंदी | sjadhav5752@gmail.com | 9028953637 |
| ४ | प्रा.प.खे.पवार | हिंदी | parmeshwarpawar69@gmail.com | 7588566946 |
| ५ | प्रा.ल.न.सोन्नर | संस्कृत | lnsonnar111@gmail.com | 9421347610 |
| ६ | प्रा.सु.सु.नेळगे | संस्कृत | nelgesuresh1981@gmail.com | 8600466462 |
| ७ | प्रा.रा.सं.मुळी | इंग्रजी | raghav.muli@gmail.com | 9890172404 |
| ८ | प्रा.प.लिं.खेत्री | समाजशास्त्र | rutujapkhetri@gmail.com | 9637753195 |
| ९ | प्रा.शं.सु.राठोड | समाजशास्त्र | rathodss1980@rediffmailcom | 9923542508 |
| १० | प्रा.श्रीमती प्र.सु.जाधव | इतिहास | Jadhavpratibha95@gmail.com | 7709964294 |
| ११ | प्रा.कि.रा.ठाकुर | राज्यशास्त्र | kishorbhau.s@rediff.com | 9975208216 |
| १२ | प्रा.ना.श्री.हेडे | अर्थशास्त्र | nshede08@gmail.com | 8421990138 |
| १३ | प्रा.अं.तु.साबळे | जीवशास्त्र | atsable1973@gmail.com | 9404023758 |
| १४ | प्रा.प्र.प्र.जोशी | जीवशास्त्र | prassana.joshi884@gmail.com | 9403882568 |
| १६ | प्रा.नि.ज्ञा.चामले | भौतिकशास्त्र | nitinchamle21@gmail.com | 7447881243 |
| १७ | प्रा.श्रीमती स.ग.मद्रेवार | रसायनशास्त्र | sgmadrewar1964@gmail.com | 8446529367 |
| १८ | प्रा.सं.बा.गायकवाड | रसायनशास्त्र | sanjeevgaikwad@gmail.com | 7620966068 |
| १९ | प्रा.चि.ल.दिक्षीत | गणित | chintaman.dixit@gmail.com | 9421272448 |
| २० | प्रा.श्रीमती प्रि.ज.कळसणे | गणित | | 9511515115 |
| २१ | प्रा.अ.वा.येवतेकर | वाणिज्य | abhayyevtekar@gmail.com | 9765338634 |
| | | प्राध्यापकेत्तर कर्मचारी वृंद | | |
| १ | श्री मो.कों.भिसे | प्रयोगशाळा सहाय्यक | mohanbhise48@gmail.com | 9421344125 |
| २ | श्री वि.वि.घेवारे | प्रयोगशाळा सहाय्यक | vikrantgheware@gmail.com | 9923587595 |

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १ | सार्क | चि.तुषार पटटेकर |
| २ | भारताचे शिल्पकार डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम | कु.विदया जाधव |
| ३ | आई बाबा हेच आमचे दैवत | चि.वैभव पांढरे |
| ४ | नेतृत्वाची पायाभरणी | कु.सना आतार |
| ५ | मराठी भाषा | कु.प्रतिभा खांडेकर |
| ६ | भ्रष्टाचार राष्ट्र विकासापूढिल एक आव्हान | चि.महेश वाघमारे |
| ७ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | कु.वैभवी देशमुख |
| ८ | सयाजीराजे पार्क मधील अविस्मरणीय क्षण | चि.सौरभ रांजवण |
| ९ | स्त्री सबलीकरणात शिक्षणाची भूमिका | कु.आरती माने |
| १० | खेडयातील लोकजीवन | कु.सोनम घाडगे |
| ११ | भारतातील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने | कु.सायली कुलकर्णी |
| १२ | जलप्रदुषणाचे दुष्परीणाम व उपाय | चि.मुकुंद गवते |
| १३ | पसायदान | कु.पल्लवी गायगवे |
| १४ | गंभीर बनू नका | चि.सिद्दिकी जफिरोद्दिन |
| १५ | सहनशक्ति | चि.खिजर सय्यद |
| १६ | वेळ व नशिब | कु.अंजली खळगे |
| १७ | पर्यावरण जनजागृती | चि.चंद्रशेखर कसबे |
| १८ | मुलीचे अस्तित्व | कु.पल्लवी राठोड |
| १९ | भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्य व सद्यस्थिती | कु.नेहा पोतदार |
| २० | रहीमदास के दोहे | कु.राधिका उरणकर |
| २१ | १४ सितंबर को ही हिंदी दिवस क्यों मनाया जाता है? | कु.क्रांती ढगे |
| २२ | **Blue Revolution in India** | **Priyanka Pandit** |
| २३ | **My National Service Scheme Journey** | **Saurabh Ranjwan** |
| २४ | **Corona And the Changing World** | **Yash Khater** |
| २५ | **Union Budget 2022-23** | **Gopal Tela** |

२६ काव्यफुले– कु.मुळक प्रियंका, कु.सानिया शेख, कु.प्रियंका शिवलकर, कु.गायत्री गोपाळ, कु.साक्षी येवले, कु.ऋतुजा कदम, कु.कोमल पाटील, कु.बोधिनी कांबळे, चि.संदीप डाके, चि.रामेश्वर आम्रुळे, चि.आकाश चव्हाण, चि.सोहेल आतार, चि.मोईन खान, चि.अनम सय्यद, चि.पांडुरंग जाधव,चि.अरबाज शेख, चि.क्षितीज कांबळे.




# प्राचार्यांचे मनोगत...!

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंची पाहिजे ।। या समर्थ रामदासांच्या उक्ती प्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचार कुलाशी निगडित असलेल्या भा.शि.प्र. संस्थेचे श्री.सिध्देश्वर महाविद्यालय हे संस्कार केंद्र १९९६ ला स्थापीत झालेले असुन स्थापने पासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाठी कार्यरत असलेले हे एक संस्कार केंद्र म्हणून मराठवाड्यात सुप्रसिध्द आहे. संस्था व महाविद्यालय गुणवत्ता आणि सामाजिक बांधीलकी जपण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. कोरोनाच्या संकट काळात अनेक सामाजिक कार्य हाती घेऊन लोकांना मदत करण्याची आणि दातृत्वाची भावना विद्यार्थ्यात निर्माण केली आहे. कोरोनाच्या कठू आठवणी मागे ठेऊन आपण पुन्हा नव्या उत्साहाने, नव्या उमीदीने कामाला लागलो आहोत. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष झालेली शैक्षणिक हानी/झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी अविरत परिश्रम घेण्याची सर्वांची मानसिकता झाली पाहिजे, यासाठी महाविद्यालय म्हणून आपण सामूहिक प्रयत्न सुरू केले आहेत.

हे वर्ष, 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' म्हणून मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले या अंतर्गत ही महाविद्यालयात बरेचशे समाजपयोगी कार्यक्रम घेण्यात आले. माझ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी कलोपासक मंडळ, बलोपासक मंडळ, ज्ञानोपासक मंडळाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यातुन कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राध्यापक वेळो वेळी मार्गदर्शन करत असतात. महाविद्यालयास नॅक मूल्यांकनात B दर्जा प्राप्त झालेला आहे. लवकरच महाविद्यालय पुन्हा 'नॅक' ला सामोरे जाणार आहे. त्याचीही आपण तयारी करत आहोत.

विद्यासभा हे संस्था व महाविद्यालयाचा आत्मा असून या अंतर्गत गुणवत्तेत सुधार करण्यासाठी विद्यासभेचे सात विभाग कार्यरत आहेत. देशाला उच्चप्रतिचे मनुष्यबळ मिळावे त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी प्रखर राष्ट्रभक्ती, चारित्र्य संपन्नता, सदाचार, लोकशाही निष्ठा, संस्कारक्षमता निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते.

'विचारवेध' हा १९ वा वार्षिकांक आपल्या हाती देताना मनापासून आनंद होत आहे या अंकात विद्याथी व विद्यार्थिनी यांनी खूप कष्टाने, मेहनतीने कथा, कविताचे स्वबळावर लेखन केलेले आहे व संपादक मंडळाने अतिशय कष्टाने हा अंक तयार केलेला आहे त्या सर्वांचे महाविद्यालय प्रमुख या नात्याने कौतुक करतो व अंकास शुभेच्छा देतो....!




श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जीवनकार्याचा माहितीपट फलक प्रदर्शित करताना या प्रसंगी भा.शि.प्र.संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.सुरेंद्रजी आलुरकर,सहकार्यवाह मा.डॉ.हेमंतजी वैद्य, संस्था पालक विवेकराव आयचीत, तालुका संघचालक गोरक्षनाथ बादाडे,स्था.व्य.मं.अध्यक्ष प्रकाशजी दुगड, स्था.व्य.मं.कार्यवाह अमरनाथजी खुर्पे, प्राचार्य डॉ.महेश देशमुख, संयोजक डॉ.कमलकिशोर लड्डा व



महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त मार्गदर्शन करताना डॉ.योगीता तौर होके पाटील व व्यासपीठावर भा.शि.प्र.संस्थेचे उपाध्यक्ष मा.राधेशामजी लोहिया,स्था,व्य.मं.अध्यक्ष मा.प्रकाशजी दुगड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख व मान्यवर.





पालक मेळावा प्रसंगी मार्गदर्शन करताना भा.शि.प्र.संस्थेचे सहकार्यवाह मा.प्रा.चंद्रकांतजी मुळे ,व्यासपीठावर मा.प्रा.सतिशजी कुलकर्णी, स्था.व्य.मं.अध्यक्ष प्रकाशजी दुगड, स्था.व्य.मं.कार्यवाह अमरनाथजी खुर्पे,म.वि.स.अध्यक्ष मा. अभयजी कोकड, मान्यवर व उपस्थित पालक वर्ग.



नवमतदार नोंदणी व जागृती अभियान अंतर्गत मार्गदर्शन करताना तहसिलदार मा.वर्षाताई मनाळे व उपस्थित विद्यार्थी



नानाजी पालकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कु.अन्वी जाधव, कु.मोहीनी पायघन यांनी प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल त्यांचा महाविद्यालया तर्फे सत्कार करण्यात आला या प्रसंगी संस्था पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक.



श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त व्याख्यान प्रसंगी प्रतिमा पूजन करताना संस्था पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक.



डिजिटल ग्रंथालय राष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रोफेसर जितामोनि भट्टाचार्य (आसाम) व्यासपीठावर म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड व प्राचार्य

# सार्क

## (South Asian Association for Regional Co-Operation)

**प्रस्तावना :**

**सहकार्य संघटना :** सार्क संघटनेची स्थापना ८ डिसेंबर १९८५ मध्ये झाली मुख्यालय हे काठमांडू (नेपाळ) येथे आहे. सदस्य राष्ट्रांची संख्या ८ आहे. दक्षिण आशियाई देशांची प्रादेशिक सहकार्यासाठी स्थापन झालेली ही अतिशय महत्वपुर्ण संघटना आहे. संघटनेचा सरचिटणीस हा मुख्य आहे. त्याला मदत करण्यासाठी आठ संचालक असतात. त्यांची नियुक्ती तीन वर्षासाठी करीत असतो. सचिवालयाची अधिकृत भाषा इंग्रजी ठेवण्यात आली आहे. आठ राष्ट्रांचे पंतप्रधान अथवा राष्ट्रप्रमुख या संघटनेचे प्राधिकारी आहेत. वर्षातुन एक परिषद संघटनेमार्फत घेतली जाते. या आगोदर आगामी धोरणाचे नियोजन करण्यासाठी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातुन दोनदा बैठक होते. या परराष्ट्रमंत्र्यांना आपल्या कार्यात सचिवांची स्थायी समिती मदत करते. याचबरोबर अकरा तांत्रिक समित्या देशपरत्वे वेगवेगळया कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सहभागी होतात.
अशा या सार्क संघटनेसमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

दक्षिण आशियाई देशांची प्रादेशिक सहकाऱ्यासाठी स्थापन झालेली सार्क संघटना आज अनेक वेगवेगळया मुद्दयांवर चर्चा करून निकोप विकासासाठी प्रयत्नशील आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या सर्वांगीन प्रगतीसाठी ही संघटना बांधील आहे. आज अंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक संस्था उलथापालथी होत असतांना देखील गरीबी, दहशतवाद, आणि पर्यावरण संरक्षण हे विषय संघटना चांगल्या पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. संघटनेची तात्वीक बैठक अतिशय महत्वपुर्ण आहे. एकमेकांच्या सहकार्यांवर आपणास शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करता येते. हा आजपर्यंतचा इतिहास आहे. मात्र सहकऱ्याऐवजी एकमेकांचे खच्चीकरण करण्यास सुरवात केली तर विकासाची आणि शांततेची फळे चाखता येत नाही. याच गोष्टी संघटनेत होताना दिसत आहेत. त्यामुळे सार्क संघटनेत अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झाली आहेत ती पुढील प्रमाणे

**१) अंतर्गत मतभेद :** दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या विकासासाठी स्थापन झालेल्या सदस्य राष्ट्रातच आज अनेक प्रकारचे अंतर्गत मतभेद निर्माण झाले असतील परस्पर सहाकार्यासाठी एकत्र आलेल्या सदस्य राष्ट्रातच मतभेद झाले असतील तर विकासाची भाषा कशी करायची हे मोठे आव्हान संघटनेसमोर आहे. भारत आणि पाकिस्तान हे संघटनेचे सदस्य राष्ट्रे आहेत. मतभेद मात्र सुईच्या टोकाचे आहेत. बांग्लादेशाच्या निर्मीतीसाठी भारताने मोठे योगदान दिले असतांना देखील बांग्लादेश कधी कधी भारताविरोधी भुमिका घेतांना दिसतो. बांग्लादेशचे राष्ट्राध्यक्ष झिया उर रहमान यांनी परस्पर सहकार्याचे स्वप्न बघितले होते. परंतु ते अंतर्गत मतभेदामुळे पुर्ण होतांना दिसत नाही.

**२) गरीबी व दारिद्रय :** सार्क संघटनेतील सदस्य राष्ट्रांची लोकसंख्या झपाटयाने वाढत त्यामुळे या राष्ट्रांना विकास साधणे कठीन होत आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा त्याचबरोबर

आरोग्य या मुलभूत बाबी पुर्ण करणे सदस्य राष्ट्रांना किचकट होत चालले आहे. अशा परिस्थितीत संघटनेचा विकास साधणे सदस्य राष्ट्रांना अवघड जात आहे. या समस्यांचे निराकरण होवू शकते, मात्र संघटनेतील राष्ट्रेच एकमेकांना निस्वार्थपणे मतदान करत नाहीत. अशा वृत्तीमुळे संघटनेचा विकास होण्या ऐवजी संघटना कमकुवत बनत चालली आहे. सदस्य राष्ट्रे एकमेकांना मदत करण्याच्या मुद्दयांवर एकत्र येतांना दिसत नाहीत. सहकार्याच्या मुद्दयांवर संघटनेची निर्मीती झाली असून ही राष्ट्रे सहकार्यासाठी शक्तिशाली राष्ट्रांच्या हाताखाली जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्व बाबी संघटनेसमोर एक प्रकारचे आव्हान निर्माण करीत आहेत.

**३) दहशतवादाची भीती :** दक्षिण आशियाई भागातील सर्वच राष्ट्रे विकसनशिल आहेत. राष्ट्रांच्या संरक्षणासाठी या राष्ट्रांकडे पुरेशाप्रमाणात यंत्रणा नाही. पाहीजे तेवढा ही राष्ट्रे संरक्षणावर खर्च करू शकत नाहीत. संघटनेतील काही सदस्य राष्ट्रे दहशतवादी कृत्यांना प्रोत्साहन देत आहेत. त्यामुळे त्या कृत्यांचा परिणाम इतर राष्ट्रांवरही आणि जे राष्ट्र दहशतवादास प्रोत्साहन देत आहे अशा राष्ट्रांलाही दहशतवादी कारवायांचा मुकाबला करावा लागत आहे. भारतास तर नेहमीच दहशतवादी कारवायांना सामोरे जावे लागले आहे. १९९१ पर्यंत दशतवाद फक्त काही राज्यापुरताच मर्यादीत होता. आज संपुर्ण देशात दहशतवादी कारवाया होतांना दिसतात. या दहशतवादामुळे संघटनेत एक प्रकारचे वितुष्ट निर्माण झाले आहे. १९९८मध्ये भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी अण्वस्त्रांच्या चाचण्या घेतल्या. या बरोबर एका वर्षाने कारगिल सीमेवर दोन्ही देशांच्या सेनांनी युध्द पुकारले. त्यानंतर इ.स.२०००मध्ये अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्रांध्यक्ष बिल क्लिंटन यांनी जेव्हा भेट दिली तेंव्हा शिख वस्ती असलेले एक संपुर्ण गाव हत्याकांडाला बळी पडले यामागे ज्या दहशतवादयांचा हात होता त्यांना हेच सुचवायचे होते की, या भुमीवरील दहशतवाद अजुनही जिवंत आहे.

**४) कायम अस्थिरता :** दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये नेहमीच कायम स्वरूपाची अस्थिरता दिसून आली आहे. नैसर्गिक साधन संपत्तीने ही सर्वच राष्ट्रे संपन्न आहेत. याचा पुरेपुर फायदा या सर्वच देशांना घेता आला नाही. विकासाच्या प्रेरणेने एकत्र आलेले हे देश राजकीय अस्थिरतेत नेहमीच गुरफटलेले असतात. विकासाच्या मुद्दयांवर बोलण्याऐवजी यांचे अंतर्गत हेवेदावे एवढे आहेत ते एकमेकांना सहकार्य करण्याऐवजी मागे ओढण्याचा प्रयत्न करतात. पाकिस्तान आणि बांग्लादेश दहशतवादयांना नेहमीच भारताविरोधी मदत करतात. पाकिस्तान आणि बांग्लादेश ही दोन्ही राष्ट्रे भारताच्या अनेक भागांवर आपला हक्क सांगतात. त्यामुळे एकप्रकारची राजकीय स्वरूपाची अस्थिरता या संघटनेत निर्माण झाली आहे. दक्षिण आशियात अस्थिरतेमुळे निर्माण झालेल्या समस्या या किचकट स्वरूपाच्या आहेत.याचे दुष्परिनाम सर्वच राष्ट्रांना भोगावे लागत आहेत.

**५) अविश्वास :** दक्षिण आशियाई राष्ट्रातील एकमेकांच्या अंतर्गत वादामुळे एकमेकात अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. भारताने वेळोवेळी दक्षिण आशियातील सर्वच राष्ट्रांना

मदत केली. बांग्लादेशाच्या निर्मीतीसाठी भारताचे मोठे योगदान आहे. मात्र हाच देश भारताच्या विरोधात उभा आहे. त्याच बरोबर पाकिस्तान, मालदीव, श्रीलंका अशा सर्वच राष्ट्रांना भारताने मदतीचा हात दिला आहे. तरीसुध्दा ही राष्ट्रे भारतासारख्या देशाच्या विरोधात वागतात. त्यामुळे विश्वास कोणावर ठेवायचा हा प्रश्न वेळोवेळी उपस्थित झाला आहे. छुप्या मार्गाने दक्षिण आशियातील राष्ट्रे एकमेकांना सहकार्य करण्याऐवजी एकमेकांच्या विरोधात कारवाया करत आहेत. त्यामुळे एक प्रकारचे अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. खरे तर या सर्वच राष्ट्रांसमोर दहशतवाद, भुक, पर्यावरण प्रदुषण, गरीबी, आणि प्रचंड लोकसंख्या वाढ या प्रमुख समस्या आहेत. याकडे लक्ष केंद्रीत करण्याऐवजी सार्क राष्ट्रांनी धर्माच्या नावाखाली एकमेकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण केले आहे.

**६) अशांतता :** दक्षिण आशियाई राष्ट्रांना मोठा प्राचीन इतिहास आहे. भारत, अफगाणिस्तान आणि श्रीलंका या तीन राष्ट्रांना प्राचीन संस्कृती आहे. पुरातन काळात ही राष्ट्रे प्रगल्ब होती परंतु आज दक्षिण आशियामधील सांस्कृतीक मुल्ये पायी तुडवली जात आहेत. शांतता व विकासाचे मार्ग अलीकडील काळात धोक्यात आले आहेत. एकेकाळीची वैभवी संपन्नता असणारे अफगाणिस्थान, अमेरीका व रशिया या राष्ट्रांनी राजकारणाचा आखाडा बनविला आहे. त्यामुळे एकेकाळचा शांत असलेला कंधार देश पुर्ण अशांत झालेला दिसतो. अफगाणिस्थान हे राष्ट्र आशिया खंडाचे हृदयस्थान आहे. तेच बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे येथे एकप्रकारची दुफळी निर्माण होवून अशांतता निर्माण झाली आहे. दक्षिण आशियातील इतर राष्ट्रांची देखील हीच स्थिती आहे.

**७) महासत्तांचे वर्चस्व :** दक्षिण आशियातील सर्वच राष्ट्रांवर महासत्तांची वक्रदृष्टी आहे. दक्षिण आशियातील राष्ट्रांचे मतभेद दुर करण्याऐवजी तो वाढविण्याचा प्रयत्न महासत्तांनी केला आहे. या राष्ट्रांतील मतभेद दुर झाल्यास ही राष्ट्र आपल्यासाठी तापदायक ठरू शकतात याची भिती महासत्तांना आहे. पाकिस्तान सारख्या राष्ट्राची बाजु घेतांना दिसते. भारत पाकिस्तान यांचा संघर्ष अविरत चालला पाहिजे असे महासत्तांना वाटते हे सुध्दा सार्क संघटनेसमोरील मोठे आव्हान आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था खिळखिळी झालेली आहे. याचा पुरेपूर फायदा महासत्तांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच हे राष्ट्र सतत शक्तिशाली राष्ट्रांच्या डावपेचाची बळी पडते आहे. जवळपास दक्षिण आशियातील सर्वच राष्ट्रांवर महाशक्तिंचे वर्चस्व आहे.

**८) चीन चे आव्हान :** दक्षिण आशियाई राष्ट्रांसमोरील सर्वात मोठे आव्हान चीन या राष्ट्रांचे आहे.आज चीन या देशाने स्वत:स प्रत्येक क्षेत्रात सज्ज ठेवले आहे. कारण चीन आपल्या व्यापारी वस्तुसाठी या सर्व राष्ट्रांना बाजारपेठ म्हणून बघत आहे. मालदिवमध्ये सुध्दा चीन या देशाला कसे आवरावे हा सार्क संघटनेसमोरील जिकीरीचा विषय आहे. चीन ने जवळपास सर्वच देशात मोठी गुंतवणूक केली असून येथील बाजारपेठ हा ताब्यात घेण्याचा प्रयत्न दिसतो. जोपर्यंत दक्षिण आशियातील देश एकत्र येवून काम करीत नाहीत तोपर्यंत जगाचे लक्ष या देशांकडे जाण्याचे शक्य नसल्याचे सांगत आपण बरेच साध्य केले असले तरीही अजुन बराच पल्ला गाठायचा असल्याचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी म्हंटले होते.

दक्षिण आशियाई जनतेच्या सर्वांगीन विकासाला सर्वतोपरी अग्रक्रम देणे. आर्थिक विकासाला गती देवून सामुहिक स्वावलंबन तयार करणे. सर्व क्षेत्रातील निर्णय सर्वांनी सामुहिकपणे घेणे. यातुनच सार्क संघटनेचा उद्देश, ध्येय यशस्वी होवू शकतो.

**चि.तुषार पटटेकर**
**बी.ए.प्रथम वर्ष**

**चलो सफलता की और !**

ताला नही चाबी हे तु
पत्थर नही पानी हे तु
रुकना नही थमना नही
मेहनत से कभी डरना नही
मेहनत से हे कामयाबियाँ
जैसे बंद तालो की होती है चाबिया
तु बुँद नही तु हे लहर
तु शाम नही तु हे सहर
तेरा काम हे मुश्कील कता
इस में हो जाएगी बहुत सारी खता
तु मुश्किल से अब भिडता ही चल
तु गिर गिर के संभलता ही चल
आसान होंगी सब मुश्किले
तु मेहनत के बल पे डरता ही चल
तु बुंद से तालाब बन
तु आग से शोला दिखा
बादल से तु पानी गिरा
तु मंगल ये जाने का सामान बना
अनम की नज़रो से हे गिरा हुआ
जो अपनी जिंदगी से हे हारा हुआ
हिमालया से भी बड़ा
तु इतना बडा होसला बना

**चि.सय्यद अनम इलियास**
**11वी विज्ञान**

# भारताचे शिल्पकार : डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

**शिल्पकार म्हणजे कोण?**

जेंव्हा रस्त्याच्या कडेला एखादा वेडावाकडा दगड पडलेला असतो त्या वेडयावाकडया दगडाला चालतांना कोणीही लाथ मारून जात असते. पणं जेंव्हा त्या दगडाला एखादी व्यक्ती आपल्या घरी नेऊन त्या दगडाची छान प्रकारे मुर्ती बनवते म्हणजेच त्या दगडावर सुसंस्कार करते आणि ती एक सुंदर अशी मुर्ती बनते तेंव्हा त्या बनवणाऱ्या व्यक्तीस शिल्पकार असे म्हणतात. अशाच प्रकारे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम हे भारतीयांवर सुसंस्कार करून अमर झाले. तो वेडावाकडा दगड म्हणजेच भारतीय समाज आणि ती व्यक्ती म्हणजेच **डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम** होय. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सुध्दा भारतीय समाज या शिल्पावर सुसंस्काराचे काम केले. त्यांनीसुध्दा या भारतीय शिल्पाची मुर्ती बनविली.

**जिऐंगे तो अब्दुल कलाम सहाब जैसे ।**
**जिऐंगे तो अब्दुल कलाम सहाब जैसे ।**
**जिंदगी तो संघर्ष से भरी होती है ।**
**मगर हम न छोटे सपने देखेंगे ।।**
**मंजिल तो अपनी–अपनी होती है ।**
**रास्ते मुश्किल होते है,**
**मगर सपने बडे होते है ।।**
**मन में इरादा किया है पक्का,**
**भारतभूमी का लगा चुके है टिला ।**
**गुरू का आशिर्वाद है पुरा,**
**बस अब कुछ कर के दिखाना है,**
**बस अब कुछ कर के दिखाना है ।।**

खरचं डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम एक भारताचे शिल्पकारच होते. हे एक सत्यच आहे. त्यांनी भारतीयांना कसं जगायचं हे शिकवलं आहे. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळ–मुस्लीम कुटुंबात झाला होता त्यांचे पुर्ण नाव अबुल पकीर जैनलब्दीन अब्दुल कलाम असे होते तामिळनाडुतील रामेश्वरम हे त्यांचे जन्मगाव होते. भारताच्या राष्ट्रपती बनण्यापुर्वी प्रोफेसर, लेखक आणि शास्त्रज्ञ म्हणून ते परिचीत होते. त्यांचे 'विंग ऑफ फायर' हे आत्मचरित्र तरूणवर्गासाठी प्रेरणादायी असल्यामुळे खुपच लोकप्रिय ठरले होते. या आत्मचरित्राच्या अन्य अनेक भाषांमध्ये आवृत्या निघाल्या आहेत. अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात ते देशाच्या राष्ट्रपती पदावर विराजमान होते. ते भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून निवडले गेले होते. फिजिक्स आणि एअरस्पेस इंजिनीअरींगमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. संरक्षण,संशोधन आणि डेव्हलपमेंट, ऑर्गनार्जशन(डीआरडीओ) तसेच इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायजेशन (इस्त्रो) या ठिकाणी त्यांनी जवळपास ४ दशके शास्त्रज्ञ आणि सायन्स

प्रशासक म्हणून काम पाहिले होते. भारताचे अंतराळ संशोधन कार्यात त्यांचा वाटा खुपच मोलाचा ठरला होता. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम हे एक महान व्यक्ती होवून गेले त्यांनी भारतीय लोकवासीयांना वेळेचे पालन कसे करावे हे शिकवन दिलीच पण त्याच बरोबर त्यांनी भारतीय तरूणांना ही शिकवन दिली की, गरीबीत राहुन देखील आपण शिक्षण घेवू शकतो. मात्र खचुन हरून कधीही जायचं नाही. उलट मनामध्ये जिद्द उत्साह असायला पाहिजे.

**चिंता से चतुराई घटे, दुखः से घटे शरीर ।**
**आशा, तृष्णा न मिटे, कह गये दास कबीर ।।**

खरोखरच चिंता नाही काळजी नाही असा एकही माणुस शोधुन सापडणार नाही प्रत्येकाला कशाची न कशाची चिंता असतेच.माणसाला अनेक चिंता नेहमी सतावत असतात. म्हणून चिंता सोडा जस जीवन तुमच्या वाटयाला आलय त्याचा स्विकार करा. एकवेळ चिता बरी पण चिंता नको. चिता माणसाला मृत्युनंतर एकदाच जाळते पणं चिंता मात्र क्षणोक्षणी जाळते. चिंतेने चातुर्य, शहाणपणा **यांचा क्षय होतो. विवेक राहत नाही.**

**कोण? कहता है की हम यह कर नहीं पा सकते ।**
**हम है भारतवासी चाहे, जान न जाऐं ।**
**मगर भारतभूमीपर पर अब हम नां**
**कोई आंच नां आने देंगे यही विश्वास दिलाया है**
**बापुने कुछ वक्त नही है अब आंच दुर**
**करने मे, यही सिखाया है डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ने ।।**
**अब स्त्री भी है लढने के लिये,**
**यही ज्ञान दिया है सावित्री मॉ ने ।**
**नही सह सकते अब हम किसी का अत्याचार,**
**तलवार से तलवार को देंगे हम जवाब,**
**क्योंकी खुन का नाता जोडा है शिवाजींसे ।।**
**अब हम ना किसी, गरीब–दिन–दलीत**
**को पिछे रहने देंगे,**
**हम सब भारतीय है, अब हम सब एक है ।**
**चाहें हिंदु हो, या मुस्लीम,**
**चाहें सिख हो, या इसाई,**
**कंधे से कंधा मिलाके, हाथ से हाथ मिलाके,**
**जग में भारत को हम, सच्चाइ की**
**चमकती रोशनी का चांद बनाऐंगे ।**
**यही वादा किया है भारत से ।।**
**यही संस्कार रूजाया है, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामजिंने**

**यही संस्कार रूजाया है, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामजिंने ।।**

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या मते प्रत्येक भारतीय आईने आपल्या मुलांशी बालवयातचं चांगले संस्कार दयायला पाहीजे. लहान वयातच त्याच्याशी कठोर मनाने वागले पाहीजे. जेंव्हा मुले लहान असतात तेंव्हा त्यांचे हटट पुरवले नाही पाहीजेत. ते जेंव्हा लहान असतात तेंव्हाच त्यांच्याशी कठोर मनाने वागले तर ते त्यांच्या भावी आयुष्यात आपल्या पायावर उभा राहायला शिकतील.

**जांती ना पुछो साधु की,**
**पूंछ लिजीऐ ज्ञान।**
**मोल करो तलवार का पडी रहने दो मयान ।।**

जर आपल्याला कोणी ज्ञान देत असेल तर असा विचार करायला नाही पाहीजे की हा दुसऱ्या धर्माचा आहे, दुसऱ्या जातीचा आहे. जो आपल्याला ज्ञान देत आहे. त्याला किती संस्कार आहेत त्यामध्ये किती चांगले गुण आहेत हे पाहिले पाहीजे. असे संस्कार जर प्रत्येक आईने दिले तर भारत हा देश नक्कीच पुढे जाईल. समाजात वावरणारी स्त्री ही आपली आई-बहीन असते. असे संस्कार प्रत्येक भारतीय मुलाला असने गरजेचे आहे.

**वन्ही तो चेतवावा रे । चेताविताची चेत ता रे ।**
**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।।**

एखादं काम करायचे ठरवले की ते केलेच पाहिजे जास्त वेळ विचार करत बसण्यापेक्षा पटकन ते काम करून टाकले पाहिजे. जर चिमणीच्या पिलांना आकाशात उंच भरारी घ्यायची असेल आणि तिला ती जमत नसेल तर ती किमान प्रयत्न तर करून पहाते, एकदा जर ती प्रयत्न करायला लागली की ती हळुहळु शिकेलच. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी भारतीयांनसाठी खुप काही केले एवढेच नव्हे तर त्यांनी १९९८ साली भारताने पोखरन येथे जो अनुस्फोट केला.त्यामध्ये कलाम यांचा मोलाचा सहभाग होता त्यामुळे त्यांना भारताचे मिसाइल मॅन म्हणूनही संबोधले जात होते. यानंतर २००१ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम भारताच्या राष्ट्रपती पदावर निवडुन आले होते. ५वर्ष राष्ट्रपतीपदाची कारकिर्द यशस्वीपणे पुर्ण केल्यानंतर ते या पदावरून सन्मानाने निवृत्त झाले. आणि पुन्हा एकदा आपले सर्वसामान्य जिवन जगु लागले. राष्ट्रपती पदावरून पायउतार झाल्यानंतर शिक्षण, लेखन आणि सार्वजनीक जिवनात त्यांनी स्वत:ला झोकुन दिले. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना भारतरत्न या भारताच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यांच्या आधी सर्वपल्ली राधाकृष्णन आणि डॉ जाकिर हुसेन यांना उपराष्ट्रपतीपदी असतांना भारतरत्न सन्मान दिला होता. जाता-जाता डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी भारतीय तरूणांना जीवन मोलाचे संदेश दिले. त्यांच्या मते- खेळतांना कधी विजय होतो त कधी पराभव. पण पराभवाने खचुन न जाता जो निश्चयाने उभा राहातो त्यालाच खरा खेळाडु म्हणतात. त्यांच्या या वृत्तीलाच खिलाडु वृत्ती असे म्हणतात ही खिलाडु वृत्ती प्रत्येकाच्या अंगी यायलाच हवी कोणीतरी एक हरतो म्हणुन दुसऱ्याला जिंकायची संधी मिळते.

आज जिंकलेला उदया जिंकेलच असे नाही. आज हरलेला उदया कदाचित जिंकेल हे कोणी सांगावे. हार–जित, सुख, यश–अपयश, फायदा–तोटा, मिलन–वियोग या सगळया गोष्टींना हसत सामोर जातो. जो हरतो म्हणून खेळायचे सोडत नाही चिकाटी,मेहनत आणि प्रयत्नात मागे पडत नाही. मागे हटत नाही तोच खरा खेळाडु.तुम्ही असे खेळाडु बना जिवन हे एक खेळ आहे आनंदाने खेळा. ''हार जित तो बहादुर के किस्मत के दो सितारे होते है''। असे अनेक जिवनमोलाचे संदेश या भारतीय तरूणांना दिले. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या सारखे पुर्ण भारतीयांचे विचार असावे म्हणजे बरे!

असं वाटतं की, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी भारतीय तरूणांची जिद्द–उत्साह, मुर्ती तर बनवलीच आहे पणं त्यांनी आणखी एक जन्म या भारत–भुमीवर घ्यावा आणि भारताच्या अर्धवट मुर्तीला पुर्ण करावं म्हणजेच डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी त्या मुर्तीला रंग, रूप, आकार द्यावा हीच देवाकड प्रार्थना....

**भलेही आप, ओर की नजरों मे मर चुके है,**
**लेकीन हमारे दिल मे तो, आप अभी भी जिंदा है।**
**भुल कर भी भुल पा नां सके**
**क्योकी हमारे दिल मे आप गुरू की जगह बना गऐं।**
**सिखा आपसे ही कि दुनिया मे सर उठांकर कैसे जिना होता है ।**
**जाना आप से ही सच्चाई ओर मेहनत का रास्ता कैसा होता है ।।**
**भले ही आप ओरो की नजरों मे मर चुंके है।**
**मगर हमारे दिल में तो, आप अभी भी जिंदा है।**
**आप अभी भी जिंदा है।।**

माया ही लेकरांच्या काळजात गेल्यावरही जिवंत असते. पणं आई–आई जेंव्हा हाक मारती तेंव्हा तिने काय? म्हणून उत्तर दिले आहे. असा भास होतो. पणं जेंव्हा एखादया कामात यश मिळते तेंव्हा आईचं हे स्वप्न होत हे आपण म्हणतो, तेंव्हा आईला आनंद मिळाला असेल असं वाटतं पण जेंव्हा आपण आईकडे धाव घेतो म्हणजेच घरी जातो तेंव्हा मात्र आई घरी नसते ती तेंव्हाचीच गेलेली असते. पण तरी इकडे– तिकडे पहातो आणि शेवटी भास झाल्याचे आठवते त्या वेळेला एकटे असल्या सारखे वाटते आणि आईचा मायेचा हात पाठीवरून फिरवलेला मिळत नाही. तेंव्हा आईच्या आठवणींचे डोळयातुन अश्रु वाहु लागतात. अशाच प्रकारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची क्षणो–क्षणाला आठवणींने डोळयातुन अश्रु वाहु लागतात अशा या महान व्यक्तिस त्रिवार मुजरा.

**कु.जाधव विदया रमेशराव**
**११वी विज्ञान**



# आई बाबा हेच आमचे दैवत

आई वडील हे आपल्यासाठी देव आहेत. एखादया वेळी देवाला नमस्कार करायला विसरलात तरीही चालेल, पण आई–बाबांना नमस्कार करायला विसरू नका. त्यांच्या चरणामध्ये स्वर्ग असतो. त्यांची सेवा केल्यावर पुण्य मिळते. प्रत्येकाच्या जीवनात आई वडीलांचे महत्वपुर्ण स्थान असते. आई आपल्याला जन्म देते आणि आपले वडील खुप कष्ट करून आपल्या सगळया गरजा पुर्ण करतात. आई वडील आपल्यासाठी आयुष्यात खुप काही गोष्टी करत असतात. आपल्या लहानपणापासून ते आपण मोठे होई पर्यंत आपल्या प्रत्येक गोष्टीची काळजी घेतात, आपल्याला कोणत्याही गोष्टींची कमतरता होवू देत नाही. सपुर्ण जग आपल्या विरूध्द राहीले तरी ते आपली साथ कधीही सोडत नाहीत स्वत:चा विचार करण्या आगोदर ते आपला विचार करतात. ते नेहमी आपल्याला चांगली शिकवन देत असतात. जीवनात आपल्याला यश मिळो हिच त्याची इच्छा असते. अशा या देवासारख्या आई वडीलांचा आपण नेहमी आदर केला पाहीजे, त्यांच्या सगळया गोष्टी ऐकल्या पाहीजे, कारण ते नेहमी आपल्या भल्यासाठीच बोलत असतात आपल्या जीवनात त्यांचे स्थान सर्वात उच्च असलेच पाहीजे. आई बाबा या दोन शब्दांच इतके महत्व आहे आपल्या आयुष्यात की, सांगता येणार नाही कारण हे फक्त शब्द नाहीत तर आपले आयुष्य आहे.

आई म्हणजे ती जिने फक्त जन्मच नाही तर हे आयुष्य दिले हे विश्व दाखवले आणि बाबा ज्यांनी स्वत:च्या आयुष्याची झीज करून आपल्या आयुष्याला गती दिली असे आई बाबा. अगदी पहील्या दिवसापासून ते आतापर्यंत ते आपल्यासाठी झटत आहेत. खरं म्हंटल तर आजच्या मुला मुलींना सर्व काही भेटुनही ते आई बाबांच महत्व विसरत चालले आहेत कारण आई बाबा हे शब्द आता फारसे ऐकु येत नाहीत त्यांची जागा आता मम्मी, मॉम, पप्पा, डॅड या शब्दांनी घेतली आहे आणि या शब्दांमुळेच आई बाबांच महत्व कमी झालं अस वाटायला लागल आहे. काळ बदलतोय तसं आई बाबांसोबत चे जे संबंध आहेत आजच्या मुला मुलींचे ते ही बदलतांना दिसत आहेत, तो आदर ती नम्रता या गोष्टींची कमतरता भासायला लागली आहे. अस वाटतय जस जस मुलं मुली मोठे होत चालले आहेत तसं आई बाबाच्या सोबतचे बोलणं बसणं कमी होत जात. जे निर्णय घ्यायचे असतात मुला मुलींना ते जवळच्या मित्रांना ते सांगण योग्य त्यांना वाटत पण आई बाबांना सांगाव वाटत नाही.तर ते बोलतील,रागावतील त्यांना त्यातल काही कळत नाही अशा आजच्या मुला मुलींची स्थिती होत चालली आहे. आणि यातच आई बाबांचे महत्व आपण विसरत चाललो आहेत अस वाटत.

आपल्या पेक्षा जास्त पावसाळे त्यांनी पाहीले काय योग्य काय नाही हे त्यांना चागल माहित असते. तरी आज आपण त्यांना बोलु देत नाहीत. बोलले तर त्यांचा आपल्याला त्रास होतो सहन होत नाही कारण बदलत्या वेळेनूसार आपणही बदललो आणि त्यांच अस होत म्हणून त्यांना आपण वृध्दाश्रमात ठेवतो का तर ते नसले की आपल आयुष्य असं मोकळ आपणचं आपल्या मनाचे राजे खरं तर त्यांनी असे दिवस पाहायला आपल्याला जन्म दिला नसतो. पण आपण त्यांच्या मनाचा विचार कुठ करतो त्यांच्या भावना आपण कोठे समजुन घेतो आई बाबा हे दोनच असे व्यक्ति आहेत जे आपल्या प्रत्येक गोष्टीत सोबत असतात तेच आपल्या जवळ असतात पणं आपण त्यांना आपल्या जवळच समजत नाहीत ज्यांनी स्वत:चे पंख कापुन आपल्या पंखानां उडायचे शिकवले त्यांना आज आपण महत्व देत नाहीत. खरं तर आई बाबा हे दोनच असे आहेत ज्यांची जागा विश्वात कोणी घेवु शकत नाही आणि हेच आजचे मुल मुली विसरत जात आहेत.

प्रेम आईचं आणि बापाचं : जन्माला आलेल्या प्रत्येक मुलाला आईच आणि बापाचं प्रेम लाभायलाच हवं दोघांच्याही प्रेमात खुप फरक असतो. मुलाला जे हवं असतं ते मुलांनी मागण्यापुर्वी आईला समजल असतं बापाला पुष्कळदा ते सांगीतल्यावर समजत बापाच्या मनोरचनेमुळे मुलाला हटट करून एखादी गोष्ट वसुल केल्याचा आनंद मिळतो आईच प्रेम हे आंधळ, भाबड म्हणुनच की काय, मुलांच काही चुकलं तर ती तिला स्वत:चा पराभव वाटतो स्वत:च नुकसान झाल असं वाटतं. बापाच प्रेम डोळस म्हणुनच मुलाच्या हातुन होणाऱ्या चुकांचे फटके मुलालाच जास्त बसणार म्हणुन तो कासावीस होतो अंगावर वार झाले तर आईचं प्रेम फुंकर घालतं पण बाप होणारा वार वरच्या वर अडवू शकतो म्हणुनच आईच्या प्रेमाला पारखं होण्याची पाळी आली तर गाभाऱ्यातही समयी विझल्यासारखं वाटतं आणि बापाच प्रेम लाभलं नाही तर त्याचं देवळाचा कळस कोणी तरी नेल्यासारखी अवस्था होते. म्हणुन म्हंटल मुलाला दोघही हवीत कडाक्याची थंडी पडली की शाल ने भागत आणि नुसत ब्लॅकेट अंगावर असल तरी कोरडेपणाची भावना तशीच राहते म्हणून आईच्या शालीचं अस्तर बापान वरून घातलेल्या ब्लॅकेटच्या आत हवं.

**चि.वैभव पांढरे**
**बी.ए.एस.वाय.**

आपकी हमारी दोस्ती सुरो का साज है
आप जैसे दोस्त पर हमें नाज है
अब चाहे कुछ भी हो जाये जिंदगी में
दोस्त वैसे ही रहेगी जैसे आज है।

**चि.महेश वाघमारे**
**बी.एस्सी.एस.वाय.**

आसमान से तोड़कर सितारा दिया है
आलम ए तन्हाई में एक शरारा दिया है
मेरी किस्मत भी नाज करती है मुझपे
ख़ुदा ने दोस्त ही इतना प्यारा दिया है।

**चि.अजय जुजगर**
**बी.एस्सी.एस.वाय.**

# नेतृत्वाची पायाभरणी

आमच्या वर्गात मॉनिटर असतो का? तुमच्या सर्वांचे उपक्रमामध्ये सहभागी होणारा किंवा कोणता विद्यार्थी एखादया उपक्रमासाठी योग्य आहे. हे वर्ग शिक्षकासोबत चर्चा करून योग्य निर्णय घेणारा वर्गाला शिस्त लागावी, म्हणून प्रसंगी कठोर निर्णय घेणारा हा मॉनिटर म्हणजे तुमचा नेता. जसा एखादया क्रिकेट संघाचा कॅप्टन असतो. तसाच हा तुमच्या वर्गाचा मॉनिटर तुमच्यापैकी सर्वामध्येच 'मॉनिटर' बनण्याचे गुण असतात, फक्त तुमच्या गुणांना वाव देणारे वातावरण आणि योग्य संधी नेहमीच असेल असे नाही. तुम्ही जेव्हा स्वच्छंद भटकंतीसाठी, ट्रेकिंगसाठी, वनासाठी जाता तेव्हा तुमच्यातील नेतृत्व गुणांना पाळी मिळण्याची संधी उपलब्ध होते.

नेतृत्व म्हणजे काय तर कोणत्याही परिस्थितीत पुढे ऊत काम करणारा, आपल्या साथीदारांच्या हिताचा विचार करणारा व मार्ग दाखवणारा व्यक्ती, तुम्ही हाल हे सर्व गुण गिर्यारोहण करताना कसे बरं लतात, कारण गिर्यारोहण या खेळात तर स्पर्धा नाही आणि विरोधी संघ देखील नाही. मग इथे कैप्टन चे काय? तुमचा प्रश्न साहजिक आहे, मात्र त्याचे नरदेखील तेवढेच रंजक आहे. गिर्यारोहण, ट्रैकिंग हे सर्गाच्या सान्निध्यात, अनवट प्रदेशात खेळले जाणारे इथे प्रत्येक पाऊल तुम्हाला नवीन नव्या वाटेवर न जाते. तुम्ही ज्या प्रदेशात जाता तेथील हवामान, जीवन इतर भौगोलिक परिस्थिती याचा अंदाज घेऊन दिशतुमचा मित्र हा लीडरच असतो. मीदेखील अशाच एका गिर्यारोहण मोहिमेचा 'लीडर होतो. ही गोष्ट आहे २०१२ची. जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या माउंट एव्हरेस्टप्रेमी संस्थेने गिर्यारोहण मोहीम आखली होती. भारतातून एव्हरेस्ट शिखरावर आयोजित केलेली ही सर्वात मोठी नागरी मोहीम होती. या मोहिमेचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली.

२०१२ सालच्या एप्रिल-मे महिन्यात जरी प्रत्यक्ष मोहीम आयोजित केली जाणार असली तरी मी तब्बल चार वर्षे आधीपासून म्हणजे २००८ पासून एरेस्ट झालो होतो. या मोहिमेला परवानगी मिळवण्यापासून ते प्रत्यक्ष शिखर चढ़ाई करताना गणदार्थाचे नियोजन करण्यापर्यंत सर्व गोष्टी जुळवल्या सहभाग होत्या यावेळी माझ्या २१ संघासोबत मी देखील एव्हरेस्ट शिखरमाया चढणार होतो. मात्र त्या परिसरात पोहोचल्यावर तेथील भौगोलिक परिस्थितीच अंदाज घेता मी बेसवाशी असलेल्य तळावरचण्याचा निर्णय घेतला कारण संघाचा रेट म्हणून, कॅप्टन म्हणून संपूर्ण मोहिमेची सांभाळण्यासाठी मी चढ़ात व्यस्त न होता एक ठिकाणी थांबणे गरजेचे होते. नेता म्हणून मला माझ्या संघाचा विचार करणे गरजेचे होते. याचा चांगला परिणाम झाला की ११ पैकी ८ जणांनी रकमे शिखरावर यशस्वी चढाई केली. अलेवा लिया झिरपे ५ लो होतो. तेव्हा मी अवघ्या १३ वर्षांचा होतो. आमच्या शाळेच्या ट्रेकिंग क्लबमधील मित्रांसोबत आमच्या सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही हिमालयातील 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स येथे ट्रेक केला. ट्रेकच्या शेवटच्या दिवशी आम्हाला एक छोटे शिखर चढायचे होते. वयाच्या मानाने अगदी दमवणारी चढाई। होती. आमच्यातील

अनेकांना परत खाली जावे वाटत होते. मी मात्र मोठ्या उत्साहाने चढाई करत होतो. माझ्या मित्रांना प्रोत्साहित करत होतो. मला माझ्या शाळेचे बॅनर, भारताचा झेंडा शिखरावर फडकवायचा देखील पुढच्या वर्षी चढाई करत एव्हरेस्टचे निर्भेळ यश मला हे नेतृत्वाचे बाळकडू शाळेत असताना सहभागी झालेल्या ट्रेकमधून मिळाले, १९७८ साली मी पहिल्यांदा हिमालयात ट्रेकिंगसाठी मी आयुष्यात पहिल्यांदा कुठेतरी नेतृत्व करत होतो आणि त्यात मला यश आले. आपल्या संघाला हवे तेव्हा प्रोत्साहित करण्यासाठी सर्वात पुढे राहून 'लीड' करणे तर कधीतरी आपल्या संघाला यश मिळवण्यासाठी मागे थांबून सगळ्यांना सपोर्ट करणे, अशा दोन्ही गोष्टी म्हणजे 'नेतृत्व' करणे होय, तुम्ही जसजसे गिर्यारोहण कराल, तसतसे तुमच्यातील नेतृत्व गुण नक्की फुलतील.

**कु.सना अत्तार**
**बी.ए.टी.वाय.**

## स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी

आई म्हणूनी कोणी आईस हाक मारी
ति हाक येई कानी मज होई शोक कारी
नोहेच हाक माते मारी कोणी कुठारी
आई कुणा म्हणु मी आई घरी न दारी
चारा मुखी पिलांच्या चिमणी हळु न देई
गोठयात वासरांना त्या चाटतात गाई
वात्सल्य हे बघुनी व्याकुळ जिव होई
येशिल तु घराला
परतुन केंव्हा गे
रूसणार मी न आता
जरी बोलशिल रागे
आई कुन्हा म्हणु मी
आई घरी न दारी
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी.

**कु.प्रियंका मुळक**
**बी.ए.एस.वाय.**

# मराठी भाषा

महाराष्ट्र राज्याची भाषा म्हणजे मराठी. संपुर्ण भारतात बोलल्या जाणाऱ्या भाषांपेकी मराठी तिसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषीकांचे राज्य आहे महाराष्ट्रातील अनेंक लेखकांनी आपल्या साहित्यातुन मराठी भाषेची माहिती सांगीतलेली आहे. दर वर्षी २७ फेब्रुवारीला कवि कुसुमाग्रज यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या स्मृतींना स्मरण करून मराठी राजभाषा दिन साजरा केला जातो मराठी ही दिड हजार वर्षाचा इतिहास जपणारी भाषा आहे. महाराष्ट्रातील घरा घरामध्ये मराठी मायबोली भाषा बोलली जाते. आज पर्यंत आपल्या महाराष्ट्रात जेवढे लेखक साहित्यीक लाभले आहेत त्यांनी मराठी भाषेच महत्व जपुन ठेवले आहे या भाषेमुळे आपण आपले सुरवातीला लेखन, वाचण शिकलो. मराठी ही अतिशय सुंदर भाषा आहे परंतु आज दिवसेंदिवस वाढलेल्या इंग्रजी भाषेच्या आकर्षनामुळे मराठी भाषा जपणे काळाची गरज झाली आहे.

दैनंदिन जीवनामध्ये आपण बरेचसे इंग्रजीच्या शब्दांचा वापर करत असतो सगळीकडे इंग्रजी भाषेचा प्रसार झालेला आहे. महाराष्ट्रातील अनेक कंपनींमध्ये कामाच्या ठिकाणी इंग्रजी भाषेतुनच व्यवहार केले जातात. शाळेत दाखल करतांना देखील पालक आपल्या पाल्यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतच शिकावे अशी इच्छा दर्शवितात. मराठी भाषा टिकली तरच महाराष्ट्रीयन समाज टिकेल. आपल्या विचारांची, सुसंस्कृतीची देवाण घेवाण ही मातृभाषेतुनच होवू शकते. आपल्या सर्वांगीन विकासासाठी आपल्याला आपल्या मातृभाषेशी निगडीत असणे फार महत्वाचे आहे.आपली मराठी भाषा आपण समृध्द केली पाहीजे व विविध मराठी पुस्तकांचे वाचण करून मातृभाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवे.

**माझ्या मराठीची बोलू कौतुके,**
**परी अमृतही पैसा जिंके**
**ऐंसी अक्षरे रसिका मेळविन,**
**लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेचं धन्य ऐकतो मराठी**

एखादया व्यक्तिचे व्यक्तिमत्व हे त्याच्या भाषेवरूनच ठरवले जात असते. एखादी व्यक्ति व्यवस्थित बोलत असेल किंवा चांगला संवाद करत असेल तर त्याला अधिक समजुतदार समजले जाते. त्यामुळे व्यक्तिला योग्य दर्जा देण्यासाठी मातृभाषा महत्वाची भुमिका बजावत असते. आपल्याला आपला महाराष्ट्र राज्याचा विकास करायचा असेल तर आपण आपल्या मातृभाषेचा विकास करणे खुप गरजेच आहे.त्यामुळे मातृभाषेचा प्रसार केला तरच महाराष्ट्राची प्रगती आणि जयजयकार होईल. अशी ही माझी मातृभाषा म्हणजेच मराठी भाषा आहे. मला खुपच प्रिय आहे. व मला माझ्या मातृभाषेवर अभिमान आहे.

**कु.प्रतिभा खांडेकर**
**बी.ए.टी.वाय.**



# भ्रष्टाचार : राष्ट्रविकासापुढील एक आव्हान...

धरण फुटुन वीस हजारांवर ठार, भ्रष्टाचारी इंजिनीयर फरार..!औषधातील भेसळीमुळे नउ अर्भकांचा मृत्यु...! डोनेशनमुळे तीन विद्यार्थ्यांची आत्महत्या...! महागाईने त्रस्त होवून पित्याकडुन तीन कन्या व पत्नीचा खुन...! अरेरे...! या वर्तमानपत्रातील बातम्या की मृत्युचा अहवाल? आमच्या आदर्श मानवी मुल्यांचे काय झाले? कुठे गेली आमची आचार संहिता? हे सारे कशामुळे झाल.

एक विश्वव्यापी संचार करणारा व्यापक असा आचार साऱ्या आदर्श तत्वांना गिळंकृत करू पाहातोय, आजचा शिष्टाचार बनु पाहतोय, तो म्हणजेच भ्रष्टाचार! राष्ट्रीय विकासापुढील एक आव्हान...!

**''मना मनात एक विचार**
**क्षणोक्षणी एक आचार,**
**काहि देशातुन सर्वत्र संचार**
**भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, आणि भ्रष्टाचार..!**

खरचं! भ्रष्टाचार म्हणजे काय हो? भ्रष्टाचार म्हणजे पैसा? भ्रष्टाचार म्हणजे अनिती? भ्रष्टाचार म्हणजे स्वार्थ? तर भ्रष्टाचार म्हणजे नक्की काय? आणि त्याचा उगम कोठे झाला? भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार मग ते भ्रष्टाचार पैशाचा असेल, स्वार्थाचा असेल, अनितीचा असेल! त्याचा उगम झाला तो माणसाच्या मनात त्याच्या मनातील पशुत्वास आणि या पशुला कुरण मिळाल राजकारणाच. प्रथम दबकत वावरणारा हा भ्रष्टाचार पुढाऱ्याच्या पदरी गेला. त्याला राजाश्रय, विदवानाश्रय आणि धनिकाश्रय मिळाला. आणि आता हा भ्रष्टाचार राजरोजपणे सुर्यकिरणाही ही सहजतेने वावरावा तितक्या सहजतेने वावरू लागला आहे. कोणतेही नियमबाहय गोष्ट करण्यासाठी कुठलाही गैरमार्गाने केलेला प्रयत्न म्हणजे भ्रष्टाचार. आज जगात नव्हे त्रिलोकात एकही जागा अशी नाही जिथे भ्रष्टाचार पोहोचला नाही. आजकाल शिक्षण क्षेत्र, वैद्यकिय, व्यापारी, औद्योगिक, धार्मिक, बाजार, नोकरी, औषधे इत्यादी सर्वच ठिकाणी भ्रष्टाचाराने धुमाकुळ घातलेला आहे.

**''करूया सर्वजण भ्रष्टाचार निर्मुलन,**
**बनला आहे जो आता**
**राष्ट्रविकासापुढील एक आव्हाण !**

आज शाळा, महाविद्यालय तसेच शिकवन्या ही विद्यादानाची पुन्यक्षेत्र माणली जातात सरस्वतीचा शारदेचा हा दरबार भ्रष्टाचाराने इतका ग्रासला आहे की, सामान्य माणुस शिक्षण घेण्यासाठी सुध्दा घाबरू लागला आहे. ९वीत ७०/८० टक्के मार्क मिळवणारा आपला मुलगा १०वीत नापास झाला तर बर होईल ना निदान डोनेशनचा खर्च तरी वाचेल, असा विचार सर्वसामान्य माणसाला सुचला तर त्यात नवल ते काय? कारण शारदेचे भ्रष्टाचारी व्दारपाल त्याला असा विचार करण्यास भाग पाडतात. २ लाख भरून इंजिनीयर व्हा, ४लाख भरून डॉक्टर व्हा, ४०हजार भरून शिक्षक व्हा आणि भ्रष्टाचार करा आणि पुढारी व्हा हा आमच्या शिक्षणाचा महान

संदेश आहे. कसंतरी थोडसं शिक्षण पदरात पाडुन घेतल तर नोकरी मिळण महाकठिण कारण तिथही आडवा येतो हा भ्रष्टाचार ६५ हजार एका हातात, नोकरीची ऑर्डर दुसऱ्या हातात हा संदेश राजरोसपणे सगळीकडे सांगीतला जातो. आता ६५ हजार भरून नोकरी मिळवायची पुर्ण पगारावर सही करून अर्धा पगार हाती घ्यायचा ही नोकरीतील तत्वे सामान्य,मध्यमवर्गीय माणसाला मृतप्राय करतात. शिक्षणासाठी पैसा, नोकरी मिळवण्यसाठी पैसा आणि जगण्यासाठी पैसाच हे दुष्टचक्र माणसाच्या मृत्युनंतर संपत पण ते फक्त त्याचा पुरक माणुस मेला हे सिध्द करण्यासाठी सुध्दा भ्रष्टाचाराचाच आधार घ्यावा लागतो. मरतांनाही वैरानी हे जरी सत्य असलं तरी''मरतानाही भ्रष्टाचार नाही'' असं होत नाही, ते कटु असलं तरी सत्य आहे.

व्यापार आणि औद्योगीक, वैद्यकिय आणि औषधे ही क्षेत्रे तर माणुसकीचे भ्रष्टाचाराचे ही जिवंत उदाहरणे आहेत. संजिवणी ठरणारी औषधे आज जटिल विषाचे काम करत आहेत. कुठे निळे महाविषारी विष पिऊन शंकर जिवंत राहीले ते त्यांच्या नवसामर्थ्याने पण आज रोग बरे करणारे औषधे पिऊनही माणुस मरतोय, तो भ्रष्टाचाराच्या सामर्थ्याने पोटाची आग शांत करण्यासाठी माणुस माणुसकी सोडतोय, खुण, दरोडे यांचे प्रमाण वाढले आहे आणि भ्रष्टाचाराचा राक्षस हे पाहुन खदाखदा हसतो आहे.

धर्म म्हणजे दिशादर्शक! माणसाने वागावे कसे याची आचर संहिता घालुन दिली ती धर्मानिच मग तो धर्म कोणताही असो तो माणसाला माणसासारखं वागायला शिकवणारा सैतानासारखं नाही पण या पवित्र क्षेत्रातही भ्रष्टाचाराचा कलि शिरला आणि इथला सच्चेपणा त्यांना हा म्हणता गिळंकृत केला आणि मग सुरू झाली जिव घेणी चढाओढ! मतांच्या गठठयांसाठी धर्माचा वापर आणि जाती दंग्यांचा वणवा, पणं देवसुध्दा या भ्रष्टाचाराला घाबरला हे जातीय दंगे विझवण्यासाठी मंदीरातुन श्रीराम बाहेर आले नाही, मस्जीदीतुन अल्लाने ही डोकावले नाही चर्चमधुन येशुही क्रुझसावरून उतरला नाही की गुरूव्दारातुन गुरूनानक आणि मग केवळ माणसाचे प्राण जात राहीले चारही धर्मात भ्रष्टाचार पसरतच गेला कॅन्सरसारखा हा भ्रष्टाचार जर असाच पसरत राहीला तर राष्ट्राचा विकास कदापी शक्य नाही.

नैतिकता हा आमच्या समाजाचा मुल स्त्रोत आहे सुखी जीवन हे त्याचे मंदीर आहे. पण तिथ हा भ्रष्टाचार शिरला आणि हे मंदीरच त्याने उध्वस्त केले आणि हा पायाचं नष्ट केला. या पवित्र संकेतात भ्रष्टाचाराच्या हातात हात घालुन हुंडा नावाचा दैत्य आणि कुळ कौतुकाच्या लेकी–सुना जाळल्या जावू लागल्या. असा हा भ्रष्टाचार राक्षस बनुन निती तत्वांना, आदर्श तत्वांना गिळंकृत करू पाहतोय. एक असाध्य रोग बनुन माणसाचा बळी घेतोय आज जगामध्ये कॅन्सरसारख्या रोगावर आम्ही उपाय शोधले आहे पण भ्रष्टाचाराच्या या असाध्य रोगावर एकही संजिवणी चालली नाही.

एकीकडे राष्ट्राच्या विकासाच्या गोष्टी करणारे पुढारी स्वत:च आपली कामे भ्रष्टाचाराच्या मदतीने पुर्ण करतात व त्यामुळे सर्वसामान्य जनतेला काहि न बोलता भ्रष्टाचाराला बळी पडावं लागतं पण असे असेल तर हा भ्रष्टाचार संपणार तरी कधी? आणि राष्ट्रविकास तरी कसा होणार?

दुचाकी अगर चारचाकी वाहण चालवण्याचे परवाने असोत किंवा अन्य काही कामे असोत पैसे दिल्याखेरीज होतच नाहीत अशी खुनगाठ सामान्य माणसाने मनात बांधलेली असते त्यामुळेच ते मुकाटयाने मान्य करतात. थोडक्यात या सर्व प्रकारास त्यांची मुक संमती असते, किंवा तो आगतिक असतो. भ्रष्टाचार हा एकांगी नसतो मला लाच घ्यावी लागली असा आरडा ओरडा करण्यापेक्षा, मी लाच दिली असे कोणी मान्य करत नाही. लोकशाही की झुंडशाही अशी लोकशाहीची अवहेलना होत असतांना एक सुजान नागरीक म्हणून या भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी आपण काय करतो? आपल काही बांधीलकी आहे की नाही? या प्रश्नांचे उत्तर शोधने आज गरजेचे झाले आहे.

**"फोन म्हणाला लाईटला**
**आपण दोघे बहीन भाऊ,**
**दोघे मिळुन लोकांचा**
**जमेल तसा जिव घेवू,**
**तुझे लोडशेडींग तर**
**माझी लाईन बिझी असते,**
**सामान्य लोकांना फसवणे,**
**खरचं किती सोपे असते"**

अशी ही परिस्थीती बदलवण्यासाठी व तसेच राष्ट्रविकासाला हातभार लावण्यासाठी आता सर्वसामान्यानी एकजुट होणे गरजेचे आहे. प्रतिष्ठा, पैसा,स्वत:चा अधिकार यांचा किंचीतही गैरवापर होणार नाही असे प्रत्येकाने ठरवले तर कितीतरी गोष्टींना आळा बसु शकेल. त्यासाठी उभ्या समाजाची माणसीकता बदलणे आवश्यक आहे. केवळ सत्य, प्रामाणिकपणा व चारित्र या गोष्टी शिकवून लोक सुधारणार नाहीत तर कोणत्याही प्रलोभणाला मी बळी पडणार नाही अगर कोणालाही बळी पडु देणार नाही, अशी भुमीका जेंव्हा होईल तेंव्हाच खऱ्या अर्थाने समाजिक बदल घडुन येईल आणि हा बदल नक्कीच घडुन येईल याचा मला पुर्ण विश्वास आहे. आपण सर्वच देवाच अस्तित्व माणतो. शांततेचे, मांगल्याचे तसेच विकासाचे आधिराज्य मागतो आहोत. काळोख्या रात्रीनंतरच्या सुंदरशा (पहाट) प्रसंन्नतेला देखील आपण मानतो. पाऊले रक्ताळली असली तरीही जिद्द जिवंत आहे, आशा दुर्दम्य आहे. कारण –

**" यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत**
**अभ्युत्थानं अर्धमस्य तदात्यानं सृजाम्यहम्।**
**परित्राणय साधुनां विनाशायच दुष्कृताम्**
**धर्म संस्थापनार्थाय संभवानि युगे युगे।।**
**यावर माझा पुर्ण विश्वास आहे.**

**चि.महेश वाघमारे**
**बी.एस्सी एस.वाय.**




हिंदी विभागाच्या मिडिया लेखन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख, व्यासपीठावर IQAC समन्वयक डॉ.विनायक देशमुख, हिंदी विभाग प्रमुख प्रा.युवराज मुळये, डॉ. गंगाधर उषमवार व उपस्थित विद्यार्थी वर्ग



राजश्री शाहू महाराज जयंती निमित्त मार्गदर्शन करताना इतिहास विभाग प्रमुख डॉ.गोरखनाथ फसले, व्यासपीठावर म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड व मान्यवर.



व्यसनमुक्ती दिना निमित्त शपथ घेताना महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी.



उपविभागीय अधिकारी मा.निलमजी बाफना यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करताना या प्रसंगी स्था.व्य.म.अध्यक्ष मा.प्रकाशजी दुगड व प्राचार्य डॉ.महेश देशमुख.



आर्ट ऑफ लिव्हिंगचे मा.अमोलजी वागळे युवक-युवतीना मार्गदर्शन करत असताना एक क्षण.





मिशन युवा स्वास्थ अंतर्गत युवक-युवतींना कोविड -१९ चे लसीकरण करताना वैद्यकीय कर्मचारी या प्रसंगी म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख व मान्यवर.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

देऊनिया आहुती प्राणांची वाचविले आपल्या भारतभूमीला. संकटे सारी स्वतःची झेलुनी स्वतःच्या तनाच्या चिंधड्या होऊनी जीवन आपुले त्यागले या कर्मभूमीला.मनी ध्यानी नसतांना अचानक आलेला वार शत्रुचा झेलुनी कवटाळले ज्या देशवीरांनी मृत्युला.

**सदैव असैन प्रणाम माझा**

**शहीद झालेल्या देशभक्तांना ...**

**भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या शूर वीरांना..**

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अतिशय आनंदाने उत्साहाने आणि देशभक्तीने प्रेरित होऊन साजरा करीत आहोत. भारत देश जवळजवळ चौदाशे वर्षे वेगवेगळ्या प्रांतात आणि भागात पारतंत्र्य अनुभवत होता.जागोजाग स्वातंत्र्याच्या मशाली पेटल्या होत्या. परंतु भारताच्या स्वातंत्र्यासाठी खरी क्रांतीची अग्निज्वाला छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रतिज्ञेतून आणि त्यासाठी त्यांनी सुलतानांच्या जुलमी राजवटीविरुद्ध दिलेल्या लढ्यातून खऱ्या अर्थाने निर्माण झाली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी छत्रपती शिवरायांचे योगदान अत्यंत मुलगामी व प्रेरणादायी होते.

व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या इंग्रज डच पोर्तुगीज इत्यादी युरोपीय लोकांनी भारत देश हळूहळू आपल्या जुलुमी राजवटीखाली आणला. तो कसा आणला हे भारतीयांना सुद्धा आश्चर्य वाटू लागले. वेगवेगळ्या लढा यांमधून इंग्रजांनी फोडा झोडा आणि राज्य मिळवा. राज्य करा. अशी भेदनीती अवलंबून संपूर्ण हिंदुस्तान किंवा भारतीय उपखंडच आपल्या टाचेखाली आणला.

भारत देश यापूर्वीच परकीय जुलमी रानटी सुलतानांच्या गुलामगिरीत होता आणि आता इंग्रजांच्या अन्यायकारक जुलमी सत्तेखाली आला. अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर यश न मिळता संपुष्टात आले. भारतामध्ये इंग्रजांनी शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्यामुळे सुशिक्षित तरुणांमध्ये विचारवंत निर्माण झाले. वेगवेगळ्या विचारवंत आणि देशभक्तांनी वर्तमानपत्रे सुरू केली राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केले आहे राजा राम मोहन रॉय यांनी बंगालमध्ये जागृती निर्माण केली महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी मोठ्या नेत्यांनी महाराष्ट्र जागृत केला देशाच्या विविध भागांमध्ये विचारांच्या जागृतीने भारताच्या स्वातंत्र्यासाठी आंदोलने उभी राहिली.

लोकमान्य टिळकांनी देशाला जहाल नेतृत्व दिले. त्यांनी देशाला खडबडून जागे केले. बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, बाळ गंगाधर टिळक या तिघांनी संपूर्ण हिंदुस्थान गदागदा हलवून स्वातंत्र्याच्या प्रेरणेने जागा केला. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये पाय रोवून उभे राहिले. टिळक युगानंतर गांधी युग सुरू झाले.

महात्मा गांधींनी सत्य,अहिंसा,शांतता या चिरंतन मार्गांनी भारताचा स्वातंत्र्य लढा अखंडपणे सुरू ठेवला. स्वातंत्र्याची चळवळ सर्वसामान्य माणसा पर्यंत नेली याच वेळी हिंदुस्तानामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू,सचिंद्रनाथ संन्याल, खुदीराम बोस, चंद्रशेखर आजाद, जतीनदास, अनंत कान्हेरे अशा अनेक क्रांतिकारकांनी देशभर सशस्त्र क्रांतीचा लढा सुरू करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी लढा दिला त्या सर्वांची नावे आज इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहेत. परंतु सर्वच देशभक्त आणि क्रांतिकारक आणि त्यांचा जाज्वल्य इतिहास सर्वांसमोर आलाच असे नाही. कारण इतिहासाची काही सोनेरी पाने अज्ञात असतात हा जणू इतिहासाला शापच असतो. भारताचे स्वातंत्र्य अखंड हिंदुस्थानचे धर्मावर आधारित दोन तुकडे होऊन प्राप्त झाले. फाळणीची भळभळती रक्ताळलेली जखम घेऊन भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. आज या गोष्टीला पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत.

देश स्वतंत्र झाला पण देशाच्या स्वातंत्र्याच्या निमित्ताने देशभक्त आणि क्रांतिकारकांनी वैभव शाली आणि बलवान भारत देशाचे स्वप्न पाहिले होते एका समता, शांतता आणि बंधुता यांनी परिपूर्ण असणाऱ्या सार्वभौम भारत राष्ट्राचे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न आज साकार झाले का? असा प्रश्न प्रत्येक भारतीयांनी स्वतःला विचारला पाहिजे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अतिशय आनंदाने साजरा तर केलाच पाहिजे. कारण यानिमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठीच्या अगणित ज्ञात आणि अज्ञात क्रांतिकारक आणि देशभक्त यांना खऱ्याअर्थाने आदरांजली वाहता वाहता त्यांच्यातील देशभक्तीची जाज्वल्य भावना आपल्यामध्ये निर्माण व्हावी ही अपेक्षा करता येईल. स्वातंत्र्याचा पावन मंगल दिन ज्यांनी आपल्याला दाखवला त्या महान देशभक्ताला स्मरावे त्यांचा आदराने उल्लेख करावा त्यांचे बलिदान व योगदान व्यर्थ गेले नाही हे आपल्या कृतीतून दाखवून द्यावे. यासाठी आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव प्रत्येक नागरिकांनी अगदी आनंदाने साजरा करावा.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आज देशापुढे असलेल्या ज्वलंत समस्यांचा विचारपूर्वक आढावा घेऊन एक वैचारिक सिंहावलोकन होणे गरजेचे आहे. आज देशापुढे असलेल्या सामाजिक,संरक्षण विषयक समस्या अतिशय भेदकपणे भारत राष्ट्राला पोखरत आहेत. प्रांतभेद,जातिभेद, लिंगभेद, भाषाभेद, सामाजिक असमता, आर्थिक असमता, दहशतवाद यांनी भारत देश मेटाकुटीला आला आहे. सर्वसामान्य माणसाच्या मानगुटीवर बसलेलं दारिद्र्य पाहिलं की भारत मातेच्या डोळ्यातून किती दुःखाचे अश्रू दररोज वाहत असतील याची कल्पना येते.

१९४७ ला देश स्वतंत्र झाला आणि २०४७ ला भारत जगामध्ये एक महासत्ता म्हणून निर्माण वाहे आज आपण स्वप्न जरुर पाहत आहोत परंतु देशभक्तांनी पाहिलेली स्वप्ने काय होती याचा आपल्याला विसर पडला नाही का? असा प्रश्न आज माझ्या मनात निर्माण होतो. कारण आर्थिक दृष्ट्या आणि संरक्षण दृष्ट्या भारत बलवान जरी झाला तरी

सर्वसामान्य भारतीय नागरिकाचे जीवनमान कितपत उंचावले आहे? हा फरक खरं विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

**ए मेरे वतन के लोगो जरा आंखो मे भरलो पानी**
**जो शहीद हुए है उनकी जरा याद करो कुर्बानी"**

असे नम्रतापूर्वक प्रत्येक भारतीयाला सांगून आपल्या भारतातील सामान्यातील सामान्य देशबांधवांना स्वातंत्र्याचे फळे मिळाली पाहिजेत. यासाठी तन-मन-धनाने प्रयत्न करावेत. यासाठी प्रेरणा निर्माण होतो आणि यासाठी त्यांना मी शुभेच्छा देतो. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वजण खूप नशीबवान आहोत की स्वतंत्र अशा भारत देशामध्ये आपला जन्म झाला आहे. त्या शूर वीरांच्या बलिदानामुळेच आपण आज शांत आणि सुंदर आयुष्य जगू शकत आहोत. हा सुवर्णकाळ आपण इथे आनंदाने उत्साहाने साजरा करत आहोत. कारण आपल्या देशाचे वीर जवान तिकडे सीमेवरती स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रूशी सामना करत आहेत. या सैनिकांना माझा सलाम. आज आपला भारत देश आणि शिक्षण विज्ञान-तंत्रज्ञान खेळ व्यापार अशा अनेक क्षेत्रात मोलाचे काम करत आहे.

**आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे**
**आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे"**

दिवसेंदिवस देश प्रगतीपथावर जात आहे. परंतु समाजात गुन्हेगारी, भ्रष्टाचार, गरिबी आणि अस्वच्छता यांचे प्रमाण वाढत आहे. भारताचे एक नागरिक म्हणून देशाच्या विकासासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. वाईट लोकांपासून आणि वाईट गोष्टी पासून आपल्या देशाचे संरक्षण केले पाहिजे. सर्वांनी एकत्र येऊन एकजुटीने काम करून भारत देश जगातील सर्वोत्कृष्ट देश बनवणे है आपले कर्तव्य आहे.

**स्वातंत्र्याच्या जल्लोषाचा**
**महिमा हा आगळा...**
**अमृत महोत्सवी वर्षात**
**साजरा करू उन्नतीचा सोहळा स्वातंत्र्याचे जतन कराया**ए
**त्यागाचा मार्ग धरू वेगळा !!"**
**जय हिंद जय महाराष्ट्र जय भारत**

कु.वैभवी विनायक देशमुख
बी.एस्सी.एस.वाय

# सयाजीराजे पार्क मधील अविस्मरणीय क्षण

(अकलूज 12 एप्रिल २०२२)

11 एप्रिल रोजी प्रवासाला सुरुवात झाली. रात्री बाराच्या सुमारास आम्ही सयाजी पार्क याठिकाणी जाण्यासाठी रवाना झालो एकुण ४६ जणांची टीम या पार्कला भेट देण्यासाठी सुसज्ज होती. सर्वांच्या डोळ्यासमोर तोच सयाजीराजे पार्क विशेष पार्क नव्हे तर वॉटर पार्क आमच्यासाठी तर स्वर्गाला भेट देण्यासारखे होते. खरे तर सर्वप्रथम आमच्या ट्रीपच्या नियोजन त्रिमूर्ती युवराज मुळे सर,डॉ.रमेश गटकळ सर, डॉ.गंगाधर उषमवार सर तसेच डॉ.प्रेमनंदा घडसिंग मॅडम चे आभार मानतो. सयाजीराजे पार्क च्या प्रवासात खूप मज्जा आली. गाडी मधील डान्स, विविध प्रकारची गाणी व तसेच पार्कचा रस्त्यामधील निसर्गरम्य वातावरण या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद आमच्या सर्व टीम ने भरपूर घेतला. विविध ठिकाणांची मेजवानी व तसेच चहाचा आस्वाद आणि विशेष म्हणजे एवढ्या दिवसातून मिळालेले मित्र कंपनी बघता बघता आम्ही सयाजीराजे नॅशनल पार्क कडे रवाना झालो. सकाळी ठीक पाच वाजता आमची सर्व टीम रवाना झाली निसर्गरम्य वातावरण व पक्षांच्या किलबिलाटाने आमचे सयाजीराजे वॉटर पार्क येथे स्वागत झाले भव्य दिव्य असा पार्क सर्व जणांचे लक्ष एकाच गोष्टीकडे लागले होते. या पार्कचे बाह्य सौंदर्य इतके सुंदर आहे तर, अंतर सौंदर्य किती मस्त असेल.

सकाळी अल्प अल्पोहार करून अकराच्या सुमारास पार्कमध्ये प्रवेश केला. प्रवेशद्वाराच्या पुढे गेल्यानंतर दोन घोड्यावर स्वार असणारे दोन सैनिक आमच्या सर्व टीमने छायाचित्र व तसेच पुढे गेल्यानंतर प्रवेशद्वाराचे न विसरणारे व डोळ्यात टिपून राहणारे दृश्य नंतर पुढे गेल्यानंतर गावातील ग्रामीण भागाच्या लोकांचे राहणीमान याचे वर्णन करणारे विविध मूर्ती व बलाढ्य असा हत्ती जवळ सर्वांनी क्षणचित्रे भरपूर टिपली नंतर पाण्यात असणाऱ्या व बोटेत सफारी करण्यासाठी बोटीत बसून आमच्या सर्व टीमने सुमारे एक तास बोटीतून सफारी केली. निसर्गरम्य वातावरणाचा आनंद बोटीच्या सफारी मार्फत केला. नंतर आम्ही स्विमिंग ची मजा घेण्यासाठी व नंतर अवघड अशा गुहेची भ्रमंती करण्यासाठी अवघड व भयानक अशा गुहेचे वैशिष्ट म्हणजे अश्मयुगीन जीवनाचे वर्णन करणारी ही अँडव्हनटेज गुहा. असा ह्या प्रवास होता. या गुहेत विविध धबधबे होते. या गुहेत खडतर प्रवास मोठे मोठे धबधबे होते या गुहेचा प्रवास सुमारे एक तासाचा होता. स्विमिंग मध्ये विविध राईट वर चढून स्विमिंग पूल स्विमिंग पूल मध्ये पोहण्याचा आनंद सर्व टीमने घेतला. जीवनातील जीवनातील जीवनात आलेली पोहण्याचा आनंद आम्हाला

मिळाला .याचा आनंद आमच्या टीमने घेतला मध्ये तीन स्विमिंग पूल, एक समुद्र लाटा डान्स, तीन रेन डान्स असा होता . मला या पार्कमध्ये आवडणारी गोष्ट म्हणजे' गाण्यावर डोलारे लाटा व त्यामधील असणारी व्यक्ती. त्यामध्ये जवळजवळ दोन तास आनंद आमच्या टीमने घेतला. या सयाजीराजे पार्क चे गणवेश आमच्या टीमला देण्यात आली. लेडीज साठी वेगळा व जेन्ट्स साठी वेगळा अशा स्विमिंग पूल ची रचना केलेली होती. त्यानंतर सयाजीराजे पार्क मधील मेजवानीचा उपभोग घेण्यासाठी आम्ही भोजनालय मध्ये गेलो मधुर अशी मेजवानी व शुद्ध मेजवानीचा आस्वाद घेतला. एकदम उत्तम भोजन मिळाले होते. व नंतर थंडगार आईस्क्रीम चा आस्वाद घेतला नंतर आम्ही डिस्को राइट्स, राइट्स ट्रेन, डेंजरस झोन, झोका व सयाजीराजे पार्क चे वैशिष्ट्य असणारे पार्क या यामध्ये आमच्या टीमने छायाचित्र घेतले. या पार्कमध्ये विविध राईड चार आनंद आमच्या टीमने घेतला. 65 एकर मध्ये असलेला सयाजीराजे पार्क व त्यामध्ये असणारे राइट्स व उत्तम जेवण व गाण्यावर डान्स करणाऱ्या लाटा यांचा उपभोग घेऊन आमच्या टीम मधील सदस्यांचा आनंद गगनाला मावत नसे. एडवांटेज पार्क मध्ये असणारे निसर्गरम्य ठिकाण आम्हाला जेवढे वाटले होते, त्यापेक्षाही जास्त चांगला ही सहल झाली होती. या पार्क मध्ये आम्ही सुमारे पाच ते सहा तास भ्रमंती केली. व वेगवेगळ्या राईट चा उपयोग घेतला. काही राईट तर अशा होत्या की उंचीवर जात होत्या. काही वरील जाऊन उलट्या होत होते. हे बघून आमच्या काही टीम मधील सदस्यांच्या डोळ्यात पाणी आले. व तसेच स्विमिंग टँक मधील राईट चा उपयोग घेताना काही टीमच्या सदस्यांना नकळत इजा ही झाली पण, आनंदाच्या भरात भरावुन गेलेले टीमच्या सदस्यांना मेळ पण लागला नाही.

सुमारे सहा वाजता आम्ही सयाजीराजे पार्क सोडला जेव्हा आम्ही सर्व टीममधील सदस्यांच्या तोंडावरचा आनंद गगनाला मावणारा होता . येता येता आम्ही लेझर लाईट शो पाहण्यासाठी गेलो. लेजर शो मध्ये आधुनिक पद्धतीने काज्यातून प्रोजेक्टर द्वारे केला होता. गाण्याच्या स्वरावर डोलणारे कारंजे व लेजर लाइट चा प्रकाशाने शो असा उत्तम प्रकारे पार पडला. व आम्ही माजलगाव साठी निघालो. येताना खूप मज्जा आली. सकाळी पाचच्या सुमारास आम्ही माजलगाव कॉलेज ला पोहोचलो.



**चि.सौरभ दत्तात्रय रांजवण.**
**बी.कॉम.एफ.वाय**

# स्त्री सबलीकरणात शिक्षणाची भुमिका

**"जिच्या हाती पाळण्याची दोरी,**
**तिच देशांते उध्दरी"**
**आणि**
**"यत्र नारीस्तु पुज्यन्ते,**
**रमन्ते तत्र देवता "**

अशी विदवानाने केलेली विधाने ऐकली म्हणजे स्त्रीयांचा दर्जा पुरूषाइतकाच किंबहुना पुरूषांपेक्षा उच्च आहे. हे कोणासाठी मान्य करावे लागेल. पण प्रत्यक्ष व्यवहारात आपण स्त्रीयांची स्थिती आज तशी नाही हे ही सर्वांना मान्य करावे लागेल. ज्या वाङ्मयात अशी उच्च दर्जाची विधाने आढळतात त्यांचच 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' वगेरे स्त्रीयांना कमीपणा आनणारी वाक्ये ही दृष्टोत्पत्तीस येतात. यावरून असे दिसते की, काळाच्या बदलत्या स्थिती बरोबर स्त्रियांचा दर्जाही बदलत गेला. हे असे का झाले? आज २१ व्या शतकातही अशी परिस्थिती आहे यावर आपला विश्वास बसणार नाही.

स्त्री वर्गाचा औपनिषदिक व भारतकालीन इतिहास पाहिला तर त्यांची कर्तबगारी सर्वशक्तिपुर्ण व पुरूषांपेक्षाही सामर्थ्यवान असल्याचे स्पष्ट होते. प्राचिन काळात यांना पुरूषांच्या बरोबरीने शिक्षण मिळत होत. कोणताही भेदभाव नव्हता. स्त्रियांनी मंत्र ऐकु नयेत किंवा वेदास स्पर्श करू नये या हिनपणाच्या कल्पना त्यावेळी नव्हत्या म्हणुनच गारगी, मुक्ताबाई, मैत्री इ. यासारख्या स्त्रिया झाल्या त्यावेळी त्यांना पुर्ण मतस्वातंत्र्य असेल त्या नुसत पाठपुरानंच नाही तर घोडा, गायन, वादन, तलवार चालवणे, दांडपटटी मारणे इ. शिक्षीत असतं. असं सर्वांगीन व उच्च दर्जाचं शिक्षण त्यांना मिळत असत म्हणुनच गारगी, सिता, सावित्री, द्रोपदी इ.भारतकालीन स्त्रिया आपली नावे अमर करून गेल्या. परंतु ज्या वेळेपासून "यत्र नारीस्तु पुजन्ते, रमन्ते तत्र देवता" इ. विधानांची अवहेलना होवू लागली व "न स्त्रि स्वातंत्र्य मर्हति" तत्वांना मान मिळु लागला तेंव्हापासूनच स्त्रियांच्या अवनतीस प्रारंभ झाला व त्याच बरोबर हिंदुस्थानाचा ग्रहदशेचा फेरा फिरला! स्त्रियांची योग्यता गुलामा इतकीच समजण्यात येवू लागली. पुढे तर स्त्रियांना आत्मा असतो ही गोष्ट पुरूष विसरून गेले.

भारताला स्वातंत्र्य होवून आज ६८ वर्ष झाली तरीही भारताने संपुर्ण साक्षरतेचा टप्पा गाठला नाही. विश्व बॅकेने जी पाहणी केली त्यात असे आढळुन आले की, जगात सर्वात जास्त निरक्षर भारतातच आहेत मग यावर आपण कशी मात करणार?

एक सुशिक्षीत आई ही शंभर गुरूपेक्षाही श्रेष्ठ आहे हा आपल्या राष्ट्रपित्याच्या संदेश अनमोल आहे. कारण जेथे स्त्रि शिकते ते घर म्हणजे अज्ञानी राहत नाही. तरी पण आजही आपल्या देशात स्त्रि-साक्षरतेचे प्रमाण ५० टक्के एवढेच आहे. खरं पाहता आज महाराष्ट्र शासनाने मुलींना १ली पासून ते १२वी पर्यंतचे शिक्षण मोफत केले आहे त्यामुळेच आज काही प्रमाणात मुलीनां शिक्षण मिळत आहे. आज किती स्त्रिया मोठी पदे जबाबदारीने सांभाळत आहेत कोणतेही क्षेत्र आज स्त्रि जबाबदारीने सांभाळते. हे स्त्रिने स्पष्ट केले आहे तरी आज आपल्या देशात स्त्रि शिक्षणाची समस्या कठीन का झाली?

किशोरी प्रशिक्षण या प्रकल्पामुळे आता स्पष्ट झाले आहे. की स्त्रि शिक्षणात आजही अडथळे उभे आहेत वर्षानुवर्ष आज स्त्रियांना शिक्षणासाठी विरोधच होता. चुल आणि मुल सांभाळायला शाळेत कशाला जायचे,ही मनोधारना होती. आज ही समजुत समाजातुन थोडी बाहेर

पडली आहे.तरी पण खेडयात आज स्त्रि शिक्षणाबाबत उदासिनताच दिसून येते. तुम्ही सांगा आज स्त्रिया काय करत नाहीत स्त्रि अबला आहे की सबला आहे याची साक्ष इतिहासाने वेळोवेळी पटविली आहे. व पुढेही पटवेल. प्राचिन काळी राष्ट्राला ललामभुत होणाऱ्या स्त्रिया होत्या ज्यावेळी देशात पसलेल्या अशांततेमुळे स्त्रि शिक्षणावर पुर्णपणे घाला पडला होता त्यावेळी जगाच्या रंगभुमिवर राजमाता जिजाबाई, सोयराबाई, शिवतनया, आहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई, आनंदीबाई व झाशीची राणी लक्ष्मीबाई इ.स्त्रीरत्न आपल्या बुध्दीने, शौर्याने व चातुर्याने समाजाला तोंडात बोट घालायला लावत. यांनीही स्त्रियांसाठी कार्य केले शुर सावित्रीबाई फुले यांनी तर सर्व समाजाचा विरोध पत्कारून स्वत: शिकुन मुलींची शाळा उघडली व कल्पना चावला, इंदीरा गांधी व माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या सारख्या स्त्रियांनी पटवून दिली की स्त्रि जात तेंव्हा ही श्रेष्ठ आहे पुरूषांनी त्यांना कमी लेखण्याचा कितीही अटटहास केला तरी जगाच्या उध्दाराची गुरूकिल्ली ही अबला समजल्या जाणाऱ्या स्त्रिच्या च हाती आहे!

''No Nation can Be Free When half the Population is enslaved in Kitchen''असे लेनीनचे म्हणने खरे आहे ज्या देशातील स्त्रिया प्रगतीच्या मार्गावर आहेत तोच देश पुढे आहे आणि हे शिक्षणाशिवाय होणार नाही. स्त्रिशिक्षण हाच उन्नतीचा मार्ग आहे. १८६४मध्ये मुंबईतुन प्रसिध्द होणाऱ्या स्त्रिभुषण मासिकाने आपले ब्रिदवाक्य काव्यातुन व्यक्त केले होते.

**'देशस्थिती सुंदर व्हावयाते**
**ज्ञानी कराव्या आधी हो स्त्रियांते**
**सुज्ञा दिसे मुख्य उपसना ही**
**यावाचुनी अन्य उपाय नाही''**

म्हणुनच आपण स्त्रियांना शिकवुन सबल बनवायला हवे. मातेच्या रूपाने स्त्रियांना जी कामगीरी जगात करायची असते तिला तर तोडच नाही. लहाण मुलांच्या संगोपणाचे, शिक्षणाची जबाबदारी जिच्यावर असते मुख्य तिचं शिकलेली नसावी का? आपल्या देशाचे भविष्य जिच्या सर्व संस्कारावर अवलंभुन आहे ती माता श्रेष्ठ नाही का? स्त्रि रूपाने एक स्त्रिस माता, पत्नी, बहीन इ.नाते पार पाडावे लागतात. हे आपणास आज राजाच्या उदाहरणावरून समजते.

**गृहिणी सचिव सखी मिथ:**
**प्रियशिष्या ललिते कलाविर्धो।।**
**करूणाविमुखेन मृत्युना हरता**
**त्वां किं न मे हतम।**

पत्नी पतीची सहचारिणी असते परिवाराच्या आनंदाने ती आनंदी होते. दु:खाने दु:खी होते व संकटात धैर्याने सामोरे जाते अश्या या स्त्रीचा आपण आदर करावा.तीला मान दयावा. भारत देश पारतंत्र्यात अडकण्यास जी काही कारणे आहेत त्यात स्त्रियांची अवनती हे एक कारण झाले असे म्हणले तर वावगे होणार नाही स्त्रियांना अशिक्षीत ठेवल्यामुळे व बालाविवाह सारख्या चालीमुळे स्त्रीयांच्या अंगी असणाऱ्या धैर्यशौर्यादी गुणांचा ऱ्हास होत गेला शिक्षणाअभावी त्यांची मने कोरीच राहिली जेथे माताच आपली कर्तव्ये विसरली तेथे तिने मुलाला तरी स्वकर्तत्वाची जाणिव कशी करून दयावी? याप्रकारे स्त्रीजातीचे अवनती हीच पुरूष जातीच्या अवनतीस कारणीभूत होवून भारताच्या कपाळी दास्य येवून चुकले.ज्या देशात सावित्रीबाई, आनंदीबाई यांसारख्या महान स्त्रीया होवून गेल्या त्याच देशातील स्त्रीयांची आज परिस्थिती पाहुन यांनाही दु:ख

होईल जर महिलांना सबल व्हायचे आहे. तर त्यांनी स्वत: काही प्रयत्न करायला हवे आपणचं शिक्षण घेवून आपली प्रगती साधायला हवी.

फ्रान्स देशाचा सुप्रसिध्द बादशहा नेपोलीयन बोनापार्ट यास एकदा त्याच्या सरदाराने विचारले की, फ्रांन्सची प्रगती करण्यास काय करावे? तेंव्हा त्याने उत्तर दिले 'मातास शिक्षण दया' राजमाता जिजाबाई प्रमाणेच याचीही आई एक अव्दितीय स्त्री होती म्हणजे स्त्रीयांची प्रगती म्हणजे देशाची प्रगती. जेंव्हा आपण स्त्रीस तिचा दर्जा वापस देवू तेंव्हाच भारतास उर्जितावस्था प्राप्त होईल. भारत आज स्त्रियांच्र्रा पुरूध्दाराची कामगिरी आपल्या हाती घेत आहे. स्त्री शिक्षणासाठी सर्व बाजुंनी प्रयत्न चालु आहेत ही भारताच्या भावी उदयाची चिन्हे आहेत असे म्हणने योग्य ठरेल.

भारत देश हे जगातील विशाल लोकशाहीचे मुर्त स्वरूप आहे. पण भारतातील सर्व मतदार सुशिक्षीत सुविद्य होत नाहीत तोपर्यंत लोकशाहीस अर्थ नाही.सर्व मतदारास आपल्या मतदानाच्या हक्काचे महत्व समजायला हवे त्यांना त्यांची कर्तव्य समजायला हवीत व हे सर्व शिक्षणाशिवाय होणार नाही म्हणुन आपण भारत साक्षर करूया.

साक्षर भारत : समर्थ भारत हेच आपल्या जिवनाचे ध्येय ठरवू या साक्षर भारतासाठी सुजाण नागरीकांची नितांत गरज आहे. आपल्या भारतास समर्थ भारताकडे वाटचाल करायची असेल तर प्रथम निरक्षरतेवर मात करायला हवी हे काम शासनावर सोडून चालणार नाही. या देशातील प्रत्येक सुजाण नागरीकाने या कार्याचा विडा उचलायला हवा सर्वाच्या अथक परिश्रमातुन साकार झालेल्या भारतीय नागरीकांना आपल्या स्वातंत्र्याची, अस्मितेची किंमत कळेल व सामर्थ्य वैभव संपन्न भारत निर्माण होईल. जोवर स्त्रीया साक्षर, सुशिक्षीत होत नाहीत कारण अज्ञानातुन अंधश्रध्दा, अविवेक या गोष्टी येतात म्हणुनच म.ज्योतीराव फुले सांगतात की, विद्येविना सर्वकाही व्यर्थ आहे

**'विद्येविना मती गेली**
**मतीविना निती गेली**
**नितीविना गती गेली**
**गतिविना वित गेले**
**वित्तविना क्षुद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले.**

म्हणुनच आपण सर्वजण साक्षर होवू या.

**कु.आरती माने**
**बी.ए.एस.वाय.**



# खेडयातील लोकजीवन

आपला देश हा खेडयांचा देश आहे. आणि याचा आपल्याला एकेकाळी अभिमान होता आज काय आढळतं शहरे फुगत चालली आहेत. आणि खेडी ओस पडत चालली आहेत. असे का होते एक काळ असा होता की, आपली खेडी ही स्वयंपुर्ण होती स्वबळावर जगत होती त्यांच्या सर्व गरजा स्थानिक उत्पादनाव्दारेच भागत होत्या. त्यामुळे खेडयातले लोकजीवन सुखाचे होते. या सुखात मिठाचा खडा पडला शहरे निर्माण होवू लागली तेथे पैशाची झगमग वाढली तेथील जीवनात वैभव आले. चैन आली थोडया कष्टावर जगता येवू लागले याउलट खेडयातील उदयोगधंदे बंद पडले अतिवृष्टी, आवर्षन अवेळी पडणारा पाउस पिकांवर पडणारे रोग अशा नाना आपत्तीमुळे शेतकरी संकटात येवू लागला आणि कर्जबाजारी होवू लागला पुर्वी आपल्या खेडयांमध्ये पराकोटीची विषमता होती उच्चनियता होती गावात जमिनदार , सावकार असतं. कुणी खोत कुणी कुळे परंतु ते एकमेकांच्या गरजा गावातील बारा बलुतेदार गावाच्या गरजा भागवत त्या बदल्यात गाव त्यांना उपजिविकेसाठी आवश्यक ते अन्नधान्य देई. अशाप्रकारे सर्वांचे जीवन एकमेकांवर अवलंबून होते सर्वजण एकमेकांशी घटट बांधलेले होते. त्यातला एक घटक जरी वगळला गेला तरी गावाच्या जीवन व्यवहारात अडथळे येत असत त्यामुळे सगळे जण एकमेकांना सांभाळुन घेत याच कारणाने गावातले जीवन सुस्थिर होते. आता तसे राहिले नाही शहरात तयार झालेल्या वस्तु गावात जातात यंत्रावर तयार झालेले कपडे, वहाणा व इतर वस्तू गावात जातात त्यामुळे खेडयातील उद्योग व्यवसाय बंद पडले आहेत. शेती पारंपरीक पध्दतीनेच केली जाते एक व्यवसाय म्हणुन शेतीकडे पाहिले जात नाही. त्यामुळे शेतीतुन योग्य उत्पन्न मिळत नाही. काही उद्योग नसल्यामुळे बेकारी निर्मान झाली आहे.

लहान शेतकरी तर कर्जबाजारीच होत आहे. अन्न,वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा ही निट भागत नाहीत वरील परिस्थितीचा परिनाम संपुर्ण ग्रामीन जीवनावरच होत आहे. शिक्षणाची मोठया प्रमाणावर हेळसांड होत आहे. आरोग्यसेवा अत्यंत खालावलेल्या अवस्थेत आहे. रस्ते व इतर दळण वळणाची साधने फारशी उपलब्ध नाहीत. जी आहेत ती चांगल्या स्थितीत नाहीत साहजिकच अज्ञान,दुखः, दैन्य व दारिद्रय यांनी ग्रामीण जीवन व्यापले आहे. लोक हतबल होवून दैववादी बनत आहेत. त्यामुळे विकासाकडे जाण्याची उर्मीच दुबळी होत आहे. शहरात सर्व आर्थिक सुबत्ता एकवटल्यामुळे लोक शहराकडे आकर्षित होत आहेत.

शहरी जीवनाचे अनुकरण करीत आहेत श्रमप्रतिष्ठा लोप पावत आहे पांढरपेशा जीवनाशी ओढ निर्माण होत आहे. यामुळे शेतीकडे पाठ फिरवली जात आहे. ग्रमीण जीवनात आपत्तीची साखळीच निर्माण होत आहे. खेडयातील जीवन म्हणजे रमणीय, निर्मळ व सुखी जीवन ही कल्पना आता केंव्हाच बाद झाली आहे. आता आपल्याला खेडयाकडे लक्ष दयावे लागेल.

**कु.घाडगे सोनम**
**बी.ए.एस.वाय.**



स्वा.सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त मार्गदर्शन करताना IQAC समन्वय डॉ.विनायक देशमुख, व्यासपीठावर म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड व डॉ.सुनिल पाटील.



आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत व्याख्यान देत असताना डॉ.केदारनाथ मालू, व्यासपीठावर म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड,स्था.व्य.म.अध्यक्ष मा.प्रकाशजी दुगड प्राचार्य डॉ.महेश देशमुख व प्रा.बाळासाहेब परळकर.



स्वा.सावरकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख व कर्मचारी.



सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख, प्राध्यापक व विद्यार्थी.



प्राणीशास्त्र विभागाची ग्रंथालय तासिका घेताना प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.बी. इंगोले व विध्यार्थी.



हिंदी, मराठी व वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित शैक्षणीक सहल प्रसंगीचे एक क्षणचित्र उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी (सयाजीराजे पार्क, अकलूज)



पायल गिल्डा हिची अंडर-१८ क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड झाल्या बद्दल सत्कार करताना स्था.व्य.म.कार्यवाह मा.अमरनाथजी खुर्पे, स्था.व्य.मं.अध्यक्ष प्रकाशजी दुगड,म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख व कर्मचारी वर्ग.



कनिष्ठ महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्रा.राजाराम जाधव यांनी विद्यावाचस्पती पदवी संपादित केल्या बद्दल त्यांचा सपत्निक सत्कार करताना भा.शि.प्र.संस्थेचे अध्यक्ष मा.सुरेंद्रजी आलूरकर, भा.शि.प्र.संस्थेचे सहकार्यवाह मा.हेमंतजी वैध, संस्था पदाधिकारी व मान्यवर

# भारतातील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने

भारतात प्राकृतिक रचना व हवामान यात भिन्नता असल्यामुळे विविध जातींचे वन्य प्राणी व पशु-पक्षी आढळतात. एका सर्वेक्षणानुसार भारतात 300 पेक्षा जास्त वन्यप्राण्यांच्या जाती आणि एक हजार पेक्षा जास्त वनस्पतींचे प्रकार आहेत.

पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून वन्य पशुपक्षी आणि वनस्पतींना अतिशय महत्त्व आहे. परंतु मध्यंतरी मोठ्या प्रमाणात झालेली पशुपक्ष्यांची हत्या आणि जंगलतोड यामुळे पशु पक्षी आणि वनस्पतींचे संवर्धन करण्याची गरज आहे. या उद्देशाने भारताच्या निरनिराळ्या भागात अभयारण्य व राष्ट्रीय उद्याने निर्माण करण्यात आली. हे अभयारण्य व राष्ट्रीय उद्याने पर्यटनाची केंद्रे बनली. भारतामध्ये 250 च्या आसपास अभयारण्ये आणि 50 च्या दरम्यान राष्ट्रीय उद्याने आहेत. त्यातील काही महत्त्वपूर्ण अभयारण्य आणि उद्याने यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

**1. नागार्जुन सागर अभयारण्य :**

आंध्र प्रदेशात कृष्णा नदीवर बांधलेल्या धरणाच्या नागार्जुन सागर जलाशयाच्या सानिध्यात हे भारतातील सर्वात मोठे व्याघ्र अभयारण्य आहे. या अभयारण्यात विस्तृत पठारे ,खोल दऱ्या असून येथे पानझडी वृक्ष आढळतात. त्याचे क्षेत्रफळ 3560 चौरस किलोमीटर असून ऑक्टोबर ते जून हा काळ पर्यटनासाठी योग्य आहे. वाघ अभयारण्याचे वैशिष्ट्य असून चित्ते, बिबट्या, अस्वले, नीलगाय, सांबर ,माकडे हे प्राणी मोठ्या प्रमाणात आढळतात.

**2. कान्हा राष्ट्रीय उद्यान :**

मध्य प्रदेशातील हे उद्यान वाघांसाठी प्रसिद्ध आहे . या उद्याना इतके विविध प्राणी भारतातील अन्य उद्यानात आढळत नाहीत. याचा उल्लेख "व्याघ्र भूमि" असा केला जातो. पठारावरील घोड्यांच्या टापां सारख्या नदी खोऱ्यात वसलेल्या या उद्यानात वेगवेगळ्या बावीस जातींचे प्राणी आढळतात .येथे पानझडी वृक्षांची मोठी जंगले आहेत. त्याचे क्षेत्रफळ 940 चौरस किलोमीटर आहे .तसेच येथे वाघ ,चित्ता ,हरसिंगा, सांबर, माकडे आढळतात.

**3. गीर अभयारण्य :**

जुना गड पासून 125 किलोमीटरवर भारतातीलच नव्हे तर सबंध जगात सिंहा साठी प्रसिद्ध आहे .याचे एकूण क्षेत्रफळ 360 चौरस किलोमीटर असून लहान-मोठे डोंगर ,टेकड्या दऱ्या यांनी व्यापलेला आहे. येथे मोसमी प्रकारचे वृक्ष व गवत आढळते. यात सिंहांची संख्या जास्त आहे .तसेच इतर चितळ, सांबर, डुक्कर, कोल्हे व अनेक प्रकारचे पक्षी येथे आढळतात.

**4. काझीरंगा अभयारण्य :**

आसाम मधील ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावरील गुवाहाटी पासून 220 किलोमीटर अंतरावर हे अभयारण्य एक शिंगी गेंड्या साठी प्रसिद्ध आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ 430 चौरस किलोमीटर आहे. येथे 1978 साली 1000 गेंडे होते.

**5. भरतपूर अभयारण्य :**

राजस्थान मध्ये भरतपुर याठिकाणी पक्षांसाठी प्रसिद्ध असलेले हे अभयारण्य सुमारे तीस चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले आहे. या भागात पानथळी चे भाग असल्याने येथे विविध जातींचे पक्षी आढळतात. येथे पक्षांच्या सर्वात जास्त जाती आढळतात. भारताशिवाय सैबेरिया व मध्य अशियातील स्थलांतरित पक्षी येथे आढळतात.

**6. कार्बेट राष्ट्रीय उद्यान :**

हे उद्यान ई. स. 1836 मध्ये सुरू करण्यात आले.भारतातले पहिले उद्यान आहे.नैनिताल पासून 120 किलोमीटर अंतरावर वाघांसाठी प्रसिद्ध असलेले 530 चौरस किलोमीटरचे क्षेत्रफळ आहे . डोंगरदऱ्यांनी साल ,पाईन वृक्ष व गवत यांनी व्यापलेल्या भागातून "रामगंगा" नदी वाहते. शिवाय हत्ती, चितळ, हरीण व विविध पक्षी येथे आढळतात. नरभक्षक वाघांची शिकार करणाऱ्या "जिम कार्बेट" या जगप्रसिद्ध शिकाऱ्चे या उद्यानाला दिले आहे. त्यापूर्वी त्या उद्यानाचे नाव "हॉले नॅशनल पार्क" असे होते.

**7. रणथंबोर राष्ट्रीय उद्यान:**

राजस्थान मधील रणथंबोर या उद्यानातील वाघ देशातील इतर अभयारण्यातील वाघापेक्षा अधिक माणसाळलेले आहेत . हे उद्यान अरवली पर्वत क्षेत्रात विखुरलेले आहे. पानझडी वृक्षांची जंगले व ढोक पक्ष्यांचे मोठे प्रमाण या उद्यानाची प्राकृतिक वैशिष्ट्ये मानली जातात . याचे एकूण क्षेत्रफळ 392 चौरस किलोमीटर आहे .

**8. नॉर्थ सिमलीपाल राष्ट्रीय उद्यान :**

पश्चिम बंगाल मधील हे राष्ट्रीय उद्यान देशातील पहिले व्याघ्र अभयारण्य म्हणून ओळखले जाते. भारतातील व्याघ्र प्रकल्पाची येथूनच सुरुवात झाली.मयूरगंज संस्थांच्या महाराजांचे हे राखीव जंगल होते.हे उद्यान 303 चौरस किलोमीटर क्षेत्रावर पसरलेले असून या ठिकाणी हत्ती, चित्ते ,बिबट्या ,सांबर ,रानटी कुत्रे, मोठी खार, माकड इत्यादी प्राणी आढळतात.

**9. सुंदरबन राष्ट्रीय उद्यान:**

गंगा व ब्रह्मपुत्रा या दोन प्रचंड नद्यांच्या सलग पसरलेल्या गाळाच्या सखल मैदानी भागात सुंदरबन राष्ट्रीय उद्यान आहे. हे उद्यान नद्यांचे प्रवाह खाड्या व नद्यांची पात्रे यांनी बनले आहे.याचे क्षेत्रफळ सुमारे 2600 चौरस किलोमीटर आहे . येथे सुंदरी (Mangrove )वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळतात. वाघ हा या जंगलातील प्रमुख प्राणी असून अनेक शतकापासून वाघाचे वास्तव्य आहे. त्याचबरोबर मांजरी व नदीत मगरी आढळतात.

**10. मदुमलाई अभयारण्य :**

तामिळनाडू राज्यात उटी पासून 65 किलोमीटर अंतरावर निलगिरी पर्वत परिसरात 320 चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले हे अभयारण्य हत्तीसाठी विशेष प्रसिद्ध आहे. या भागात पर्जन्याचे प्रमाण खूप आहे त्यामुळे साग ,बांबू आणि निलगिरीची दाट वने आहेत. या क्षेत्रात हत्ती मोठ्या संख्येने आढळतात. शिवाय वाघ, चित्ते ,बिबटे, चितळ, माकडे इत्यादी प्राणी व वनस्पती आढळतात.

**11. बंदीपूर अभयारण्य:**

हे अभयारण्य दक्षिण कर्नाटकात नांजूनगड पासून 55 किलोमीटर अंतरावर आहे. येथे घनदाट जंगल असून विविध प्रकारचे प्राणी आढळतात .जंगले पानझडी ,सदाहरित प्रकारची मिश्र असून काटेरी झुडपे येथे आढळतात. या अभयारण्यातून प्रसिद्ध "मोयार" नदी वाहते वाघांचे राखीव हे अभयारण्य असून याचे क्षेत्रफळ सुमारे 874 चौरस किलोमीटर आहे .हत्ती सुद्धा येथे मोठ्या संख्येने आढळतात.

**12. पेरियार राष्ट्रीय उद्यान :**

हे राष्ट्रीय उद्यान केरळ राज्यात कोलायम पासून 115 किलोमीटर वर आहे .त्याचे क्षेत्रफळ 780 किलोमीटर असून" पेरियार" नदीवर बांधलेल्या जलाशयाच्या परिसरात हे भारतातील एक सुंदर राष्ट्रीय उद्यान समजले जाते. या भागात भरपूर पाणी उपलब्ध आहे व जंगल दाट आहे येथे वाघ ,रानडुक्कर, सांबर ,रानटी कुत्रे व अनेक पक्षी आढळतात.

**13. पालामाऊ अभयारण्य :**

हे अभयारण्य छोटा नागपूरच्या पठारावर पालामाऊ राखीव जंगलात आहे .त्याचे क्षेत्रफळ 970 चौरस किलोमीटर असून हे भारतीय चित्त्यां साठी प्रसिद्ध अभयारण्य आहे. हे अभयारण्य पनझडी जंगलांनी अच्छा दिलेले आहे. येथे चित्ते मोठ्या प्रमाणामध्ये आढळतात.

**14. मानस अभयारण्य :**

हे असाम मधील गुवाहाटी पासून 175 किलोमीटरवर उत्तरेस भूतांनच्या सीमेवर आहे. याचे क्षेत्रफळ 2840 चौरस किलोमीटर असून एक सुंदर अभयारण्य आहे. येथील भौगोलिक परिस्थिती वन्य प्राणी व पक्षांसाठी अनुकूल आहे. येथे हत्ती, गेंडे, सोनेरी माकड, हरीण व अनेक प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात



**कु.सायली कुलकर्णी**
**बी.एस्सी.प्रथम वर्ष**

# जल प्रदूषणाचे दुष्परिणाम व उपाय

जल प्रदूषण ही सर्व जगाला भेडसावणारी पर्यावरणीय गंभीर समस्या आहे. जल प्रदूषणामुळे पाण्यात विशिष्ट गुणधर्मांचे पदार्थ अशा प्रमाणात मिसळले जातात की, त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन ते वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदूषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात किंवा पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते मानवी कृतीआणि अन्य कारणांमुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे बदल होतात आणि पाणी कोणत्याही कारणासाठी वापरण्यास अयोग्य ठरते. या पाण्याला प्रदूषित जल म्हणतात. पाण्याचे प्राकृतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म बदलल्याने मानव व जलीय सजीवांवर अपायकारक परिणाम करणारी जल प्रदूषण ही प्रक्रिया आहे.

नैसर्गिक पाण्यात एखादा बाह्य पदार्थ  यांची भर पडल्यास ते पाणी प्रदूषित होऊन त्याचा मानव, इतर प्राणी आणि जलीय जीव यांना अपाय होतो. जगातील बहुतेक देशांत जल प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. कॅनडा, चीन, भारत, जपान, रशिया, अमेरिका इ. देशांत ही समस्या तीव्रतेने जाणवते.

**पाण्यातील प्रदूषकांचे स्रोत :**

**1) मानवी मलमूत्र व औदयोगिक कार्बनी अपशिष्ट**

मानवी वस्त्यांमधून उत्सर्जित झालेले मलमूत्र आणि औदयोगिक अपशिष्टातील कार्बनी पदार्थ मलवाहिन्यांतून नदी, समुद्र किंवा इतर जलाशयांत टाकले जातात. पाण्यात अतिप्रमाणात कार्बनी पदार्थ असल्यास सूक्ष्मजीवांची ऑक्सिजनाची मागणी वाढते. परंतु पाण्यातील ऑक्सिजनाची उपलब्धता घटते. त्यामुळे पारिस्थितिकीय संतुलन बिघडते व प्रदूषकांची समस्या निर्माण होते. विविध कारखान्यांमधून कार्बनी अपशिष्टे पाण्यात सोडल्यामुळे, या अपशिष्टांमार्फत ऑक्सिजन शोषून घेतला जातो. त्यामुळे जल प्रदूषणाची तीव्रता वाढते. सांडपाणी व मैला वाहून नेणाऱ्या वाहिन्यांमध्ये रोगांचे सूक्ष्मजीव असतात. अशा पाण्यावर संस्करण केल्यास काही सूक्ष्मजीवांचा नाश होतो, तर काही जिवंत राहतात. असे पाणी इतर जलाशयांत मिसळल्यास ते पाणी प्रदूषित होते. मैलापाण्याची सोय नीट न लावल्यास, त्यामुळे प्रदूषित झालेल्या पाण्याच्या वापरामुळे जठर आणि आतड्याचे रोग संभवतात.

**2) रासायनिक खते**

अधिक उत्पन्न व्हावे, यासाठी शेतजमिनीत रासायनिक खतांचा उपयोग केला जातो. ही खते जोराचा पाऊस पडल्यास ओहोळ, नाले यांतून नद्यांना व  समुद्राला मिळतात. पाण्यातून वाहून आलेल्या या रासायनिक खतांमुळेही  जल प्रदूषण होते. जमिनीवरील रासायनिक खते द्रवाच्या रूपात पाझरून भूजलसाठ्यात मिसळून भूजल प्रदूषित होते.

रासायनिक खतातील काही भागाचा उपयोग शैवालांच्या पोषणासाठी होतो. त्यामुळे शैवालांची वाढ जलद व दाट होते. त्यामुळे वनस्पतींची वाढ होत नाही. त्याचा माशांवर

परिणाम होतो. कालांतराने पोषकद्रव्ये न मिळाल्यास शैवालांचा लवकरच नाश होतो. ही शैवाले कुजतात व सूक्ष्मजीव त्यांवर वाढतात. ते पाण्यातील ऑक्सिजन शोषून घेतात. या कुजलेल्या शैवालांमुळे पाण्याला दुर्गंधी सुटते.

**3) कार्बनी रसायने**

आधुनिक शेतीमध्ये कीटकनाशके, कवकनाशके, तणनाशके इ. रसायनांचा वापर केला जातो. त्यामध्ये विषारी द्रव्ये असतात. त्यांचा काही अंश पिण्याच्या पाण्यात मिसळल्यास जल प्रदूषणाचा धोका निर्माण होतो.

**4) खनिज द्रव्ये व रासायनिक टाकाऊ पदार्थ**

कारखान्यातून बाहेर पडलेले टाकाऊ पदार्थ जलाशयात सोडल्यास त्यातील पाणी प्रदूषित होते. कॅल्शियम व मॅग्नेशियम यांचे क्षार पाण्यात विरघळल्यास ते पाणी कठीण बनते. या पाण्याचा उदयोगासाठी व पिण्यासाठी उपयोग होत नाही. औदयोगिक टाकाऊ विषारी रसायने पाण्यात मिसळल्यास त्या जलाशयातील जैविक क्रियांमध्ये बदल घडून येतात. काही रसायनांच्या प्रभावाने ते पाणी आम्लीय होते. अशा पाण्यामुळे जलाशयातील सजीवांचा नाश होतो. भारतात चर्म, कागद, लगदा, वस्त्र, रसायने इ. उदयोग जल प्रदूषणास कारणीभूत आहेत.

**5) सांडपाण्यातील व पाणलोटातील गाळ**

पाण्यातील गाळामुळे जलाशय गढूळ होतात. गाळाचे थर जमा होऊन कधीकधी जलाशय गाळाने भरून जातात. जलप्रवाहास गाळाचा अडथळा होऊन मैलापाणी व सांडपाणी कोंडले जाऊन चिकट गाळ खाली बसतो. त्यात विनॉक्सिजीवी सूक्ष्मजीव निर्माण होतात. त्यामुळे काही अंशी गाळाचे अपघटन होते. मात्र, ऑक्सिजन मोठ्या प्रमाणात खर्ची पडतो व हवेतील कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढते. विनॉक्सिजीवी सूक्ष्मजीवांमुळे हायड्रोजन सल्फाइड हा वायू पाण्यात मिसळतो. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरते.

**6) किरणोत्सारी पदार्थ**

किरणोत्सारी अपशिष्टांची विल्हेवाट लावण्यासाठी ती जलप्रवाहाच्या मदतीने विरल करून विखुरली जातात. ही अपशिष्टे जलप्रवाह किंवा समुद्रात मिसळल्यास तेथील पाणी प्रदूषित होते.

**7) उष्णता**

पाण्याचे संयंत्रे, औष्णिक विद्युत् निर्मिती, रासायनिक व पोलाद कारखाने, अणुकेंद्रीय संयंत्रे अशा अधिक प्रमाणात पाण्याची गरज असणाऱ्या मार्गातून बाहेर पडणारे पाणी अतिउष्ण असते. हे पाणी इतर जलाशयांत सोडल्यास 'औष्णिक प्रदूषण' होते. अशा अनैसर्गिक उष्णतेमुळे तेथील पाण्यातील सजीवांच्या जीवनचक्रास बाधा येते व परिसंस्थेचे संतुलन बिघडते.

**8) खनिजे व ज्वालाग्राही तेल**

समुद्रपृष्ठावर काहीवेळेस अपघात घडून येतात. त्यामुळे जलप्रदूषण होते. खनिजे व ज्वालाग्राही तेलाची वाहतूक जहाजांतून होत असते. त्यांतील तेलाच्या टाक्या फुटून तेल समुद्रावर पसरते. अशा पाण्यामुळे पक्षी, मासे व इतर जलचर तसेच पाणवनस्पती मृत्युमुखी पडतात. सागरी संसाधनांचा ऱ्हास होतो. समुद्रकिनाऱ्यावरील खनिज तेल कारखान्यांतून, विहिरींतून व साठवण टाकीतून काही प्रमाणात गळते व पाझरते. हे तेलही समुद्राच्या पाण्यात मिसळल्यास जल प्रदूषण होते. अशा दुर्घटनांमुळे माशांना धोका निर्माण होतो. साठवणीच्या टाक्या स्वच्छ करताना त्यांतील खनिज तेल, पेट्रोल, केरोसीन, डांबर इ. पदार्थ पाण्यात मिसळतात व प्रचंड प्रमाणात मासे मरतात. समुद्रपृष्ठावर तेल पसरल्याने त्या पाण्यात सूर्याची किरणे कमी प्रमाणात मिसळतात. त्यामुळे सागरी जल व वातावरण यांच्यातील ऑक्सिजन प्रक्रिया मंद होते

**.* जल प्रदूषणावरील उपाय**

1. जलशुद्धीकरण करणे.
2. सांडपाणी व मैला पाण्यात सोडण्यापूर्वी प्रक्रिया करणे.
3. पिण्याच्या पाण्याचे नियमित परीक्षण करणे.
4. पाण्यातील रोगकारक जीवाणूंच्या संख्येत वाढ होणार नाही, यावर नियंत्रण ठेवणे.
5. कवकनाशके, कीटकनाशके व कीडनाशके यांचा वापर मर्यादित करणे अथवा टाळणे.
6. कृत्रिम खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे.
7. पिण्याच्या पाण्यातील रसायनांच्या प्रमाणाची विशिष्ट मर्यादा असते. या सहज मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात रसायनांची वाढ होऊ नये, यासाठी योग्य ती दक्षता घेणे.
8. औष्णिक जल प्रदूषणामूळे जलाशय किंवा समुद्रातील पाण्याचे तापमान २० से.पेक्षा अधिक वाढणार नाही, याची खबरदारी घेणे.
9. खनिज तेलामुळे होणाऱ्या जल प्रदूषण समस्येवर उपाययोजना आखणे.

महाराष्ट्रात जल प्रदूषण रोखण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. नदयांतील पाण्याच्या दर्जाचे संनियंत्रण 48 ठिकाणी नियमितपणे केले जाते. या 48 पैकी, 35 ठिकाणी पाण्याचा दर्जा खालावल्याचे आढळले आहे. महाराष्ट्र राज्याने 1995 मध्ये राष्ट्रीय नदी कृती आराखडा तयार केला असून नागरी व घरगुती सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण कमी करणे, हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. या योजने अंतर्गत सांडपाणी अडवणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे, नदीघाटाचा विकास करणे, कमी खर्चाचे स्वच्छतागृह बांधणे इ. योजना हाती घेण्यात आल्या आहेत. जल प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व राज्यांच्या सहकार्याने राबविणे यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय जल दर्जा मूल्यांकन प्राधिकरण नियुक्त केले आहे.

**चि.मुकुंद गवते**
**बी.एस्सी तृतीय वर्ष**

# पाहुन तुला ते मन माझे

पाहुन तुला ते मन माझे
तीळ तीळ तुटते राणी
पाहुन तुला ते मन माझे
गात मंजूळ गाणी

आठवणीत तुझ्या रमून जाता
माझ्या डोळ्यात येते पाणी
पाहुन तुला ते मन माझे
तीळ तीळ तुटते राणी



सहवास तुझा तो मला का
हवाहवासा आहे
स्पर्श तुझ्या केसांचा मजला
चाहुल देऊनी जाये

जवळी असता तु माझ्या
मन शांत निवांत राहे
दूर जाता तु माझ्या
मन सैर भैर का धावे

डोळ्यात तुझिया मजला
माझे जीवन दिसते आहे
जीवन माझे मी राणी
तुजला आपले आहे

सांगशील तसा वागेन मी
देतो वचन हे तुजला
जाऊ नकोस दूर तु
सोडून सदैव मजला

**कु.ऋतुजा हरिभाऊ कदम**
**12 वी वाणिज्य**

# माझी कल्पना

घरात माझ्या मुलगी झाली
हर्षित झाले वृक्ष वेली
आनंदात माझी काया न्हाली
घरात माझ्या मुलगी झाली

समई होऊनी ती माझ्या घरचं
अंधारात नाश ती करीती
नाश कराना त्या अंधाराचा
दाही दिशातूनी प्रकाश देती

दिसते तिच्यात जिजाऊ मजला
दिसते तिच्यात लक्ष्मीबाई
आहे तीच प्रतिभा माझी
आहे तीच कल्पना

प्राशन करुनी शिक्षण अमृत
होईल तीही सावित्री
ताटी उघडेल ज्ञानेश्वराची
आज होऊनी ती मुक्ताई

दुष्टांना ती सदा मारीती
दु:खितांचे दुःख हारीती
थोरांचा ती मान राखीती
ईश्वरासही वंदनीय ती

**कु.ऋतुजा हरिभाऊ कदम**
**12 वी वाणिज्य**

# वडिल देवाची मूर्ती

वडिल म्हणजे देवाची एक मूर्ती
आपण जेव्हडे पुजा,प्राथना ही देवांची करतो
तोच देव सदैव आपल्या सोबत असतो
तोच देव म्हणजे वडिल असतो.

रडत असताना ही हसवतात
दु:खात नेहमी साथ देतात
आपल्या स्वप्नाला स्वत:चे स्वप्न बनवून दाखवतात
तोच देव म्हणजेच वडिल.

अवकाळी पाऊस नाही तर वडिलांचा पाझरत झरा आहे
पाण्याने भरलेला खड्डा नाही तर वडिलांचा अखंड समुद्र आहे
तोच देव म्हणजे वडिल आहे.

कष्ट किती ही असले तरी जानवत नाही
दु:ख किती ही असले तरी दाखवत नाही
तोच देव म्हणजे वडिल.

रागवतात बोलतात मारतात त्याच मुळे ते कठोरते वाटतात
पण या कठोरते मागे आपल्या एका जिवनाची एक कछी असते
ती फक्त वडिलानाच दिसते.

**कु.सानिया शफिक शेख**
**12 वी कला**

दोस्ती तो नहीं जो जान देती है
दोस्ती वो भी नही जो मुस्कान देती है
अरे! सच्ची दोस्ती तो वो है
जो पानी में गिरा हुआ आँसू भी पहचान लेती है।

**चि.क्षितीज कांबळे**
**१२ वी कला**

# निवडणूक आयोग

निवडणूक आयोग दिल्लीत बसून आहे
तर चिवडणूक आयोग गल्लीत बसून आहे
संविधान अनुभवल्याने तर त्यांना हे समजले
मतदान राजा त्यांचा बाटलीत बसुन आहे
खाऊन,पिऊन त्यांच्या कवळ्या गळून गेल्या
अन्नदेवता मात्र आता ताटात बसुन आहे
वधु मंडपात म्हणाली 'हुंडा' आता देणार नाही
नवरदेव मात्र अजूनही थाटात बसुन आहे
त्यांनी साठवलेले तलाव त्यांनी पिऊन टाकले
बेडूक महाशय मात्र आता माठात बसून आहे
ते सगळे भक्त आता पायथ्याशी येऊन बसलेत
देव मात्र  त्यांचा अजून स्वर्गातच बसून आहे.

# माणसांच्या दुनियेत

भोवतालाच्या गर्दीतूनी शोध माणसाचाच घ्यावा
विश्वासाचा घेऊन हात कोणता धरावा

सुटतो धावत आपण माणसाच्या प्रेमा पोटी
फक्त ऐकत राहतो सोनेरी शब्दाच्या गोष्टी

हसणे अन बोलणे सगळेच कसे फसवे
ठाऊक असूनीसुद्धा मुकाटपणे चालावे

कामाचे अन गुणाचे नाही इथे घेणे-देणे
जातीच्या घोळक्यात पक्क हसणे-नसणे

मानतो ज्यांना आपण देवासारखे पावन
त्यांच्यातून प्रकटतो एक हसरा रावन

मस्त पाखराचा थवा झाडावरी विसावतो
या माणसाच्या दुनियेत मी झाडाला बिलगतो

या धावपळीच्या युगात कोणी कुणासाच सांगाव
माणसाला माणसा सारख वागाव.

**कु.सानिया शफिक शेख**
**12 वी कला**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त व्याख्यान देताना पत्रकार संघ, जिल्हाध्यक्ष मा.तुकारामजी येवले, व्यासपीठावर मा.लक्ष्मीकांतजी जोशी, प्राचार्य डॉ.महेश देशमुख व डॉ.गंगाधर उषमवार



इतिहास विभागाची ग्रंथालय तासिका घेताना या प्रसंगी विभाग प्रमुख डॉ.गोरखनाथ फसले व विद्यार्थी.



जागतिक महिला दिना निमित्त मार्गदर्शन करताना डॉ.प्रेमनंदा घडसिंग, उपस्थित प्राध्यापक व विध्यार्थी



संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी निमित अभिवादन करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख व उपस्थित कर्मचारी वर्ग.




वेध परीक्षेचा यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.




दत्तोपंत ठेंगडी जन्म शताब्दी वर्षा निमित्त पुस्तक प्रदर्शनचे आयोजन करण्यात आले या प्रसंगी म.वि.स.अध्यक्ष मा.अभयजी कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख,ग्रंथपाल प्रा.सुरेश बनसोडे व मान्यवर.



हिंदी विभाग आयोजित अतिथी व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करतांना सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रा.डॉ.शिवाजी सुरवसे व विद्यार्थी



स्व.लोकनेते गोपीनाथजी मुंडे यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना महाविद्यालयातील कर्मचारी.

# धागा



फाटलेली नाती शिवायला
धागा आणायचा कुठून
छोट्या छोट्या मतभेदाने
हातून गेले सारे सदन सुटून

जो तो म्हणतो माझंच खरं
गोड बोलने वरच्या वर
प्रेमाचे लिहिलेले शब्द
आज गेले सारे मिटून
फाटलेली नाती शिवायला
धागा आणायचा कुठून

सुया झाल्या सगळ्याच बोथट
सोन्याचे झाले आज पितळ
कानाला शब्द टोचत न राहते
मन मेले सर्वाचे तुटून
फाटलेली नाती शिवायला
धागा आणायचा कुठून

दुसऱ्याच्या गोष्टी रस्त्यावर फेकून
स्वता:च्या चुका ठेवतात झाकून
छोटया छोटया मतभेदाने
हातून गेले आप सारे सुटुन
फाटलेली नाती शिवायला
धागा आणायचा कुठून

नका असे वागू कुणाशी
खेळ नको यांच्या मनाशी
नालांना ठिगळं लावता लावता
हृदयच जाईल आज फाटून
तर फाटलेली नाती शिवायला
नंतर धागा आणायचा कुठून

**कु.प्रियंका प्रदिप मुळक**
**बी.ए.एस.वाय.**

# मैत्रीण

मैत्रीण म्हणजे ठिकाण हक्काचं
साचलेल्या मनाला मोकळ करण्याचं

निखळ हसण्याचा गप्पांचा अवांतर कट्टा
किती ही ठरवलं तरी भावरत नाही मस्करी थट्टा

नसतो हट्ट रोज भेटण्याचा
ना रोज बोलण्याचा
पण भेटल्यावर मात्र
मन काही भरत नाही
मैत्रीच्या गावात
मिनिटांचे तास कसे होतात
तेच कळत

चिरतरुण नातं हे मैत्रीच
जे खरंतर मागत काहीच नाही
उन्हाळे पावसाळे झेलले कितीही
तरी साथ मात्र सोडत नाही

नातं हे लाखमोलाचं
जपून ठेवावं उरी
तुम्हाला ओळखणारी मनकवडी
मैत्रिण पाहिजे एकतरी

**कु.प्रियंका प्रदिप मुळक**
**बी.ए.एस.वाय**

सच्ची दोस्ती वो नही होती है
जो हर किसी से हो जाती है
सच्ची दोस्ती तो होती है
जिसके होने से अपना सा महसुस हो।

# आयुष्य हे काय आहे

मोह मायेच्या जाळ्यात अडकलेला जीव
बस यापरी अजून काही नाही
जन्माला आलेला प्रत्येक जण मायेच्या बंधनात अडकतो
नालांच्या बंधनात स्वतला जणू जकडून ठेवतो
यावर ही नाही भागले तरी प्रेमाच्या ही आहारी जातो
तरुणाईत बालपणाचा तर म्हातारपणी तारुण्याचा
मोह कुणाला असंख्य पैश्याचा तर कुणी खूप स्वार्थी असतो
माणूस मोहात फसवतो स्वतःला
सर्व मायेची बंधन तुटतात
मोहाचे सर्व दार बंद होतात
आणि संपतो तो आयुष्याचा
ना समझलेला खेळाचा भाग
पुन्हा एकदा जीव तयार होऊन
करतो दुसऱ्या आयुष्याची सुरुवात

**चि.संदीप डाके**
**बी.ए.प्रथम वर्ष**

# स्त्री एक देवी

अख्खा दिवस तिचा घराला देण्यात जातो
म्हणूनच मी तिला देवाच्या रूपात पहातो
संपूर्ण कुटुंबाचा असते ती आधार
तिच्यावरच असते आपल्या यशाची मदार
कधी होते कालिका तर कधी जिजाऊ असे
प्रत्येक देवीच्या अवतारात रूप तिचे दिसे.



**कु.कोमल पाटील**
**बी.ए.एफ.वाय.**

# जीवनाचा प्रवास

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे कर्तव्य आहे
काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे

कधी आनंद तर कधी दुःख
हा ऊन सावलीचा खेळ आहे
आंबट गोड नात्यांची इथे
एक चविष्ट भेळ आहे
आयुष्य खूप सुंदर आहे
जगता येणं महत्वाचं आहे
अडचणी सर्वांना आहे
मात करण महत्वाचं आहे

आयुष्यात नको होऊ निराश
खरंचं इतकं ते कठीण नाही
हे दिवसही बदलून जातील
स्थिर जगात असे काहीच नाही
जीवन हा एक प्रवास आहे
नशीब त्याचा एक भाग आहे

# आयुष्य

आयुष्य हे विद्यालयाच्या वहितील पान असत
रिकामं तर रिकामं लिहिलं तर छान असतं
शेवटचं पान मृत्यू अन् पहिल पान जन्म असतं
मधली पाने आपणच भरायची कारण ते आपलचं कर्म असतं
होणाऱ्या चूकांना टाळायच असतं
कुठलंच पान कधी गाळायचं नसतं
चुक झाली तरी फाडून फेकायच नसतं
कारण त्यातूनच आपल्याला पूढे शिकायचं असतं

**कु.प्रियंका प्रदिप मुळक**
**बी.ए.एस.वाय.**

# नातं कसं असावं

नात सन्मान देणारं असावं
अपमानित करणारं नसावं
नात प्रेरणा देणारं असावं
वेदना देणार नसावं
नातं बळ देणारं असावं
घाव देणारं नसावं
नात मदतीचा हात देणार असावं
पाय ओढणारं नसावं
नातं साथ देणारं असावं
विश्वासघात करणार नसावं
नातं समज देणार असावं
गैरसमज करून घेणार नसावं
नातं कौतुकास्पद असावं संशयास्पद नसावं
नातं प्रेम जपणार असावं खंजीर खुपसणार नसावं
नात सुखावणार असाव मन दुखावणार नसावं
नात कुठलही असो पण ते मात्र कायमस्वरूपी असावं
सोडून जाणारं नसावं.

# गुरु

चालायला नाही चालवायला शिकवतो
बोलायला नाही बोलून दाखवायला शिकवतो
खायला नाही खाऊ घालायला शिकवतो
विश्वास मिळवायला नाही टिकवायला शिकवतो
आत्मसन्मान घ्यायला नाही कमवायला शिकवतो
शिक्षण शिकायला नाही शिकवणूक घ्यायला शिकवतो
पैसा कमवायला नाही दान करायला शिकवतो
प्रेम मिळवायलाच नाही वाटायला शिकवतो
नाती तोडायला नाही जपायला शिकवतो
आधार घ्यायला नाही द्यायला शिकवतो
आयुष्य फक्त घालवायला नाही ते जगायला शिकवतो
तो म्हणजेच गुरु.

**कु.प्रियंका शिवलकर**
**बी.एस्सी.एस.वाय.**

# नशीब

जी माणसं हवीहवीशी वाटतात
ती माणसं भेटत नाहीत
जी माणसं नकोशी वाटतात त्यांचा सहवास संपत नाही
ज्यांच्याकडे जावस वाटत त्यांच्याकडे जायला जमत नाही
ज्यांच्याकडे जाऊ नये असं वाटतं
त्यांच्याकडे जावच लागतं
जेव्हा जीवन नकोसं वाटतं तेव्हा काळ संपत नाही
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो तेव्हा काळ संपलेला असतो

नशीब हे असंच असत त्याच्याशी जपुनच वागाव लागत
तिथं कुणाचंच चालत नाही जिथे नेईल तिथं जावच लागत.

# कुटुंब

कुटुंबापेक्षा मोठं कोणतंही धन नाही
वडिलांपेक्षा मोठा कोणी सल्लागार नाही
आईपेक्षा मोठा कोणतीही सावली नाही
भावापेक्षा चांगलं कोणी भागीदार नाही
आणि बहिणीपेक्षा चांगली कोणी शुभचिंतक नाही
म्हणून कुटुंबापेक्षा आयुष्यात कोणीच महत्त्वाचे नाही
घरात एकत्र राहणे म्हणजे कुटुंब नाही
एकत्रित जगणं आणि सगळ्यांची पर्वा करणं याला कुटुंब म्हणतात
जी लोक पैशांना कुटुंब समजतात ती त्यांची सर्वात मोठी चूक असते
जीवनात चांगला माणूस होण्यासाठी एवढचं करा
चुकाल तेव्हा माफी मागा आणि कुणी चुकलं तर माफ करा
कुणा वाचून कुणाचे काहीच आडत नाही
हे जरी खरे असले तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही
डोकं शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत
आणि भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत.

**कु.गायत्री गोपाळ**
**११ वी वाणिज्य**

# श्रीमंत माणूस

येताना एकटा येतो
जाताना एकटा जातो
बरोबर काहीही आणत नाही
जाताना बरोबर काही नेणार नाही
तरीपण श्रीमंत होण्याचा अट्टाहास का करतो?

सुखासाठी रात्रदिवस झगडतो
दुःखात कोणीही सामील नसतो
आहारात सर्व काही असते
पण तब्येत साथ देत नसते
तरीपण गर्व अहंकार करण्याचा अट्टाहास का करतो?

या जगात कोणी कोणाचा नसतो
भाऊ भावाचा वैरी असतो
पत्नी, मुले दिखावा असतो
पापाचा कोणीही वाटेकरी नसतो
तरीपण नाते गोलाचा अट्टाहास का करतो?

गाडी, बंगला सर्व काही असते
पण घरात सुख नसते
जन्म उदरात दिला ती माता
अंत होईल ती जागा माती
तरीपण मोठेपणाचा अट्टाहास का करतो?

**चि.यश खाटेर**
**बी.कॉम.एफ.वाय.**

दोस्ती का रिश्ता दो अंजानो को जोड़ देता है
हर कदम पर जिंदगी को नया मोड देता है
सच्चा दोस्त साथ देता है तब
जब अपना साया भी साथ छोड देता है।

**चि.पांडुरंग जाधव**
**बी.ए.प्रथम वर्ष**

# आई

आई म्हणजे असते एक मायेचा पाझर
आईची माया असते एक आनंदाचा सागर
आई म्हणजे असतो एक घराचा आधार
आई विना ते गजबजलेले घरचं असते निराधार

आईच्या एक कवेत ते घर सारं मावतं
मन-आधाराच्या पोटी सारयांना आईच घर भावत

आईच्या हाताला असते चव लई भारी
आईच्या हाताने खाण्याची बातच हो न्यारी
आईच्या कुशीतला तो विसावा खूप अनमोल

विचलित मनाला तो नेहमीच देई समतोल
आई चा राग म्हणजे बेभान ढगांचा गडगडाट
अवघड असते खुप तेव्हा सापडणे आपली वाट

सोचताना वेदना मुखातून एक शब्द नेहमी येई
प्रेमाचा पाझरं पसरून त्या वेदनेवर वेदना नाहिशी करते आई.

**कु.साक्षी येवले**
**१२ वी वाणिज्य**

# बाबा

आपल्याला जेव्हा चालायला येत नव्हत तेव्हा आपल्याला
चालायला शिकवणारे एकमेव व्यक्ती म्हणजे आपले बाबा
आपले बाबा आपल्याला काय हव का व आपल्यासाठी
रात्रदिवस काम करणारे व्यक्ती म्हणजे आपले बाबा
आणि लहानपणापासून एका बाहुली सारखं
आपल्याला सांभाळणारे व्यक्ती म्हणजे बाबा
एक दिवस असा येतो की आपला काळजाचा तुकडा
दुसऱ्याला द्यायचं म्हणल्यावर कस वाटत आपल्याला बाबाला
आणि आपल्याला काही दुख लागल्यावर, मोठ दुःख झाल्यावर
सगळ्या आधी बापरे हा शब्द निघतो म्हणूनच या नावात किती बळ आहे.

**चि.रामेश्वर आमुळे**
बी.ए.टी.वाय.

# मला कधीच वाटत नाही

मला कधीच वाटत नाही मला सारं सुख मिळावं
वाटतं फक्त दुःखानी माझ्या आनंदाला कधी ना गिळावं

मला कधीच वाटत नाही समोरच्याने मला योग्यच समजावं
पण गैरसमज करून कधीच चुकीचं ना ठरवावं

मला कधीच वाटत नाहीं मी प्रत्येक वेळी योग्य असेन
असा पण दिखावा करत नाही अप्रामाणिक नक्कीच नसेल

मला कधीच वाटत नाही लोकांनी प्रत्येक वेळी माझी साथ द्यावी
पण छोटयाशा स्वार्थासाठी गुंफलेली नाती मात्र ना तोडावी.

**कु.प्रियंका प्रदिप मुळक**
**बी.ए.एस.वाय.**

# बालपण

दिसत आहे मला माझ्या जीवनाची वाट
वळुन पाहता मागे दिसतो बालपणीचा थाट
दिसत होतो सुंदर तेव्हा होतो गोजीरवाणा
पाहून मला आईचा माझ्या फुटत होता पान्हा
रोज रोज बाबा मला आणत होते पेढा
मायेचा त्यांच्या मी होतो थोड़ा वेडा
एक होती मावशी माझी होती खुप हवशी
करत होती माझ्यासाठी रिकामी ती पिवशी
सांगत होते आजोबा माझे शिकुन हो तू मोठा
शिकून हो तू मोठा यात नाही कसला तोटा
एक होते नाना माझे एक होती नानी
ऐकवत होते मला ते गोड गोड गाणी
एक होता भाऊ मजला देत होता खाऊ
एक होती ताई माझी होती तीच आई
देत होती मजला ती दुधावरची साईट
एक होता काका माझा तोच होता सखा

**कु.ऋतुजा हरिभाऊ कदम**
**12 वी वाणिज्य**



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेड रिबन कल्बची स्थापना करण्यात आली या प्रसंगी प्राचार्य डॉ.महेश देशमुख, उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक.




खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथील संस्थेच्या साहित्य संमेलनामध्ये डॉ.रमेश गटकळ आपला विषय प्रतिपादन करताना व उपस्थित मान्यवर.




इंग्रजी विभागाच्या वतीने इंग्लिश क्लबची स्थापना करण्यात आले या प्रसंगी बोलताना विभाग प्रमुख डॉ.कमलकिशोर लड्ढा, व्यासपीठावर प्राचार्य डॉ.महेश देशमुख व उपप्राचार्य प्रा.युवराज मुळये.



प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.बी. इंगोले यांच्या पुस्तकाचे विमोचन करताना भा.शि.प्र.संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.सुरेंद्रजी आलुरकर,सहकार्यवाह मा.डॉ.हेमंतजी वैद्य, संस्थापदाधिकारी व प्राध्यापक.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत चि.अतुल चुंबळे, चि.गंगाराम येळवे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केल्या बद्दल महाविद्यालयाचे वतीने सत्कार करण्यात आला या प्रसंगी प्राचार्य डॉ.महेश देशमुख, क्रिडा विभाग प्रमुख डॉ.उमेश साडेगावकर व उपस्थित प्राध्यापक.



वाणिज्य विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.अशोक होके,प्रा.सुरेश गांडगे व संपादक मंडळ.





भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.शशीकिरणजी गडम, व्यासपिठावर उपस्थित मा.सुमंतजी कुलकर्णी, मा.अभयजी कोकड, मा.बळीरामजी सोळके, प्राचार्य डॉ.महेश देशमुख, उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

# श्रावण

श्रावणात हो वर्षा आली
सरसर करूनी धरतीवरती
सुगंध दरवळे माती मधूनी
वाऱ्यासंगे पक्षी गाती

गर्जत-गर्जत मेघांनी हो
केले पाणी चहुकडे
तृष्णा भागली मातीची अन
भरले सगळे शेततळे

वाहती खळखळत नाले,ओढे
नदीलाही पूर दिसे
देवांच्या हो महादेवाचा
श्रावणात या मान असे

**कु.ऋतुजा हरिभाऊ कदम**
**12 वी वाणिज्य**

महक दोस्ती की इश्क से कम नही होती
ना हो इश्क तो जिंदगी खत्म नही होती
साथ अगर हो जिंदगी में दोस्तो का
तो जिंदगी जन्नत से कम नही होती।

**चि.अरबाज शेख**
**बी.ए.एस.वाय.**

# लाडक्या माझ्या शेतकऱ्यांनो

लाडक्या माझ्या शेतकऱ्यांनो
करू नका हो त्याग जीवाचा
जीवात तुमच्या वास करतो
आत्म हो त्या शिवाचा

मंथनातील विषही त्याने
तुम्हाचसाठा प्राशन केले
ठेवा आदर्श त्या महादेवाचा
करू नका हो त्याग जीवाचा



नित्य येता संकटे अनेक
कधीही घाबरू नका हो
संकटरूपी तण ते आपण
खुरपुनी काढू चला हो

मशागत करोनी कष्टाचे मग
घामाचे सिंचन करा हो
उगवतील मोती मातीतून त्या
तुम्ही धीर धरा हो

आधीचे असे नव्हते काही
गेल्यावर तुम्ही बापही नाही
करा विचार त्या मुलाबाळाचा
करू नका हो त्याग जीवाचा

जातील ढग त्या दुःखाचे मग
येईल पाऊस आनंदाचा
पाऊस पाहण्या आनंदाचा
तुम्ही सांगा असणार का नाही

शेवट सांगतो शेतकऱ्यांनो
करू नका हो त्याग जीवाचा
जीवात तुमच्या वास करतो
आत्मा हो त्या शिवाचा

**कु.ऋतुजा हरिभाऊ कदम**
**12 वी वाणिज्य**

# पसायदान

**आता विश्वात्मके देवे ।**

**येणे वाग्यज्ञ तोषावे ।**

**तोषोनि मज द्यावे पसायदान हे ।**

आता म्हणजे ज्ञानेश्वरी लेखन पूर्ण झाल्यावर ज्ञानेश्वर विश्वात्मक असा जो सर्व धर्मातीत देव त्याला विनंती करत आहेत कि त्याने ह्या वांग्मय यज्ञाने प्रसन्ना व्हावे आणि मला या प्रसादाचे दान द्यावे.सर्व विश्व हेच माझे घर आहे, नव्हे आपणच सर्व विश्व जो बनला आहे अशा अत्मानुभूतीने संपन्न आपल्या सद्गुरू निवृत्तीनाथाना त्यांनी विश्वात्मक ही उपाधी दिली आहे. यज्ञ म्हणजे निष्काम भावाने केलेले कर्म. हा वाग्यज्ञ आहे . या यज्ञाने प्रसन्न होऊन गुरुनी प्रसाद द्यावा असे माऊली म्हणतात.

**जे खळांची व्यंकटी सांडो ।**

**तया सत्कर्मी रती वाढो ।**

**भूता परस्परे जडो मैत्र जीवाचे ।**

ज्याचा संबंध मागच्या ओवीशी आहे. मला या प्रसादाचे दान द्या कि, असा त्याचा अन्वय लावून येथून पुढे कोणत्या गोष्टी मिळाव्यात त्याचा उल्लेख आहे.खल म्हणजे दुष्ट, व्यंकटी म्हणजे वाकडेपणा. सर्वप्रथम दुष्टांचे दुष्टपण सुटावे असे मागणे मागितले आहे त्यांना सत्कर्माची आवड उत्पन्न होवो असे झाले म्हणजे कोणाशी त्याचे शत्रुत्व राहणार नाही. सर्व प्राण्यांमध्ये मैत्रीचा व्यवहार होईल. मनुष्याच्या प्रवृत्तीला तो स्वतःच जबाबदार आहे, त्याने स्वतःच स्वताचा उध्दार करायचा आहे असे भगवंत येथे सुचवतात.

**दुरितांचे तिमिर जावो ।विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।**

**जो जे वांछील तो ते लाहो ।प्राणिजात ।**

दुरित म्हणजे पाप, तिमिर म्हणजे अंधार, पापरूपी अंधाराचा नाश होवो. सगळ्या विश्वाने स्वधर्मरूप सूर्याच्या प्रकाशात पाहावे मग सर्व प्राण्यांना ज्याला जे हवे असेल ते मिळेल. पाप म्हणजे काय? सत्व रज आणि तम या तीन गुणांच्या कमी -अधिक प्राबल्याने मनुष्याचे आचरण बनते.सत्व रज आणि तम या तीन गुणांच्या कमी -अधिक प्राबल्याने मनुष्याचे आचरण बनते. रज, तम च्या जोराने काम आणि त्यामुळे लोभ, मद, मोह, मत्सर हे शत्रू बलवान होतात, मानव पापाचरणास प्रवृत्त होतो. म्हणून स्वधर्म म्हणजे निश्कामवृत्तीने कर्माचरण. हा गीतेचा मुख्य विषय आहे. भागवतधर्माचे सारही हेच आहे.स्वधर्म आचरणाच्या प्रकाशात सर्वांना पाहिजे ते मिळेल असे ज्ञानेश्वर म्हणतात.

**वर्षत सकल मंगळी।ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।**

**अनवरत भूमन्डली ।भेटतु या भूता।**

या पृथ्वीतलावर संपूर्ण मांगल्याचा अखंड वर्षाव करणारा ईश्वरनिष्ठांचा समुदाय सर्व प्राण्यांना भेटो.श्रेष्ठ पुरुष जे आचरण करतो त्याचे समाज अनुकरण करतो. त्याच्या वागण्यातून सामान्यांना धर्म कळतो.त्याच्या हृदयातील ज्ञानदिपाच्या प्रकाशात योग्य मार्ग

दिसतो .ईश्वरनिष्ठ आपल्या आत्मज्ञानाने पूर्णतया संसाराकडे पाठ फिरवून मुक्त झालेला असतो, पण समाज हिताकरता त्याने कर्मत्याग न करता लोकसंग्रह करीत समाजाचा एक घटक म्हणून जगले पाहिजे .याकरता श्रीकृष्णांनी स्वताचे उदाहरण दिले आहे .गीतेची हीच शिकवण आहे समाजातील सर्वांचेच आचरण शुध्द झाले पाहिजे, तरच ईश्वरनिष्ठांची मांदियाळी म्हणजे मोठा समूह तयार होईल. हे श्री ज्ञानदेवांचे मागणे आहे.

**चला कल्पतरूंचे आरव |चेतना चिंतामणीचे गाव |**
**बोलते जे अर्णव |पीयूषांचे |**

ईश्वर निष्ठांचे वर्णन करण्यासाठी येथे ज्ञानेश्वरांनी तीन काव्यमय उपमा दिल्या आहेत जे चालणारे कल्पतरूंचे बगीचे आहेत सजीव अशा चिंतामणीचे गाव आहेत अमृताचा बोलणारा समुद्र आहेत. चल म्हणजे चालणारा. कल्पतरू म्हणजे जे मागाल ते देणारे झाड. पण त्याच्याकडे आपल्याला जावे लागते, तर सज्जन मात्र कल्पतरू तर आहेतच, शिवाय तेच स्वतः तुमच्याकडे येतात. शिवाय ते कल्पतरू प्रमाणे एकच नाहीत, तर त्यांचीबागच आहे.चिंतामणी म्हणजे जे चिन्ताल ते देणारा दगड. संतही जे चिन्ताल ते देतात म्हणून ते चिंतामणी आहेत, शिवाय ते सजीव असल्याने देताना योग्य व अयोग्य याचा विवेक बाळगतात, आणि चिंतामणी प्रमाणे ते दुर्मिळ नाहीत ,तर त्यांचे समूह आहेत अमृताचा एक थेंब अमरत्व देतो, संत हे अमृताचा बोलणारा सागर आहेत म्हणून ते साऱ्या समाजाला अमर करू शकतात.

**चंद्रमे जे अलांछन |मार्तंड जे तापहीन |**
**ते सर्वाही सदा सज्जन |सोयरे होतु |**

येथे संतांची तुलना चंद्र आणि सूर्याशी केली आहे.जे डाग नसलेले चंद्र आहेत, उष्णता नसलेले सूर्य आहेत, असे सज्जन सर्वांचे सोयरे, नातेवाईक होवोत अशी प्रार्थना ते करतात.
संत हे चंद्राप्रमाणेच शीतल आणि आनंद देणारे असतात. चंद्र चांदण्याचा वर्षाव करून अंधार नाहीसा करतो, तसेच संत स्वधर्म आचरणाने पापाचा अंधार नाहीसा करून मंगलतेच्या चांदण्याचा वर्षाव करतात, चंद्रावर डाग आहेत, पण संतांचे चारित्र्य निर्मल आहे.सूर्य जगाला प्रकाश आणि उष्णता देतो, पण तो दाहक आहे, संत ज्ञानाचा प्रकाश देतात पण ते दाहक नाहीत. अशा प्रकारे गीतेतील तत्वज्ञानाचे मूर्त स्वरूप असे जे संत, त्यांचे श्रेष्ठत्व श्री ज्ञानेश्वर वर्णन करतात

**किंबहुना सर्वसुखी |पूर्ण होऊनी तिहनी लोकी |**
**भजिजो आदिपुरुषी |अखंडित |**

स्वर्ग, पृथ्वी आणिपाताळ या तिन्ही लोकातील सर्वांनी सर्व प्रकारे सुखी होऊन त्यांनी आदिपुरुषाची अखंडित भक्ती करावी अशी प्रार्थना ज्ञानेश्वर करतात.दुष्ट पुरुषाची दुर्बुद्धी नाहीशी होऊन त्याला सत्कर्मात रती उत्पन्न होईल. पापाचा अंधार नाहीसा होऊन स्वधर्माचा सूर्योदय होईल ईश्वर निष्ठांचे समूह मांगल्याचा वर्षाव करतील .चारित्र्यवान पुरुष सर्व प्राणिमात्राचे सोयरे होतील. असे आदर्श समाजचित्र सुखी जीवनाचा मार्ग आहे.

समाजाचे सर्व घटक सदाचरणी झाल्याशिवाय सर्व सुखी होणार नाहीत.आदिपुरुष म्हणजे परमात्मा. जो हे जाणतो कि परमात्माचे सर्वत्र अस्तित्व आहे ,तो स्वतः त्याच्याशी एकरूप होतो .भक्त आणि भगवंत यात भेद उरत नाही. या आदिपुरुषाची पूजा करावी स्वकर्म - कुसुमानि. हेच त्याचे भजन होय.

**आणि ग्रंथोपजीविये |विशेषी लोकीं इये |**

**दृष्ठादृष्टठ विजये |होवावे जी |**

आणि विशेषतः या जगात हा ग्रंथ ज्यांचे जगण्याचे साधन, आधार झाला आहे, त्यांना दृष्ट आणि अदृष्ट दोन्ही विजय मिळोत.गीतेत कर्मयोग आणि भक्ती हे परमात्म्यापर्यंत सर्वांना पोहोचण्याचे जे मार्ग सांगितले आहेत त्यासाठी साधनेची, ज्ञान किंवा योग मार्गातील तपस्येची गरज नाही. आपले सामान्य जीवन जगताना गीतेने सांगितलेल्या सत्वगुण युक्त मार्गाने चालले आणि परमात्म्याचे सतत नामस्मरण केले, तर या जीवनात म्हणजे दृष्ठ आणि मरणोत्तर म्हणजे अदृष्ट असे दोन्ही विजय लाभतील असे श्री ज्ञानेश्वर म्हणतात .जीवनात आणि जीव्नोत्तर नैतिकतेने विजयी होणे ह्याला भारतीय तत्वज्ञान जे महत्व देते तेच त्याचे वेगळेपण आहे.

**येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो |हा होईल दान पसावो |**

**येणे वरे ज्ञानदेवो |सुखिया झाला |**

तेव्हा विश्वाचे राजे म्हणले "या प्रसादाचे दान मिळेल ."या वरामुळे ज्ञानेश्वरांना आनंद झाला. श्री निवृत्तीनाथ गुरु यांना येथे विश्वाचा राजा म्हणून संबोधिले आहे.ते म्हणाले कि ही ग्रंथरचना करताना ज्ञानेश्वरांनी जे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश ठेवला तो सफल होवो .या मराठी भाषेच्या नगरी ब्रह्म विद्या इतकी सर्वांपर्यंत पोहोचो कि जग सुखमय होवो श्रोत्यांनी मन एकाग्र करून या ग्रंथाचे श्रवण केले आणि त्याप्रमाणे आचरण केले तर ते सुखी होतील हे ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा पूर्ण होवो .अशा रीतीने या वाग यज्ञाचा उद्देश पूर्ण झाला म्हणून ज्ञानेश्वरांना आनंद झाला.

**कु.पल्लवी गायगवे**
**(बी.ए.एस.वाय.)**



# थेरेसा सर्बर माल्कल!

हे नाव तुम्ही पूर्वी कधी ऐकलं आहे का? नाही? आज आपण जो जागतिक महिला दिन साजरा करत आहोत त्याचा आणि या नावाचा घनिष्ठ संबंध आहे. कसा तो आम्ही सांगतो. मंडळी, एखादा दिवस साजरा करण्यामागे नेमके काय कारण आहे, त्याचा इतिहास काय आहे, हा पायंडा कुणी पाडला हे जाणून घेणे महत्वाचे असते. जर ही माहिती तुम्हाला असेल तर तो दिवस साजरा करण्याचा आनंद द्विगुणित होतो. आता आजच्या जागतिक महिला दिनाचेच उदाहरण घ्या ना.. सर्वांना माहीत आहे की आज महिला दिन आहे, पण याची सुरुवात थेरेसा सर्बर माल्कल या महिलेने केली हे कुणालाच माहीत नाही. दुर्दैवाने थेरेसा आज विस्मृतीत गेल्या आहेत. चला तर मग, आजच्या दिवसाचे निमित्त साधून आपण त्यांची ओळख करून घेऊया.

थेरेसा यांचा जन्म १ मे १८७४ ला रशियातल्या बार नावाच्या शहरात एका ज्यू परिवारात झाला. जन्मापासूनच ज्यू-विरोधी वातावरणात वाढलेल्या थेरेसा यांना आणि त्यांच्या परिवाराला रशियाच्या त्झार राजवटीत प्रचंड त्रास सहन करावा लागला. त्यामुळं अनेक कुटुंबे तिथून स्थलांतर करून अमेरिकेत गेली. त्यात थेरेसा यांचेही कुटुंब होते. १८९१ साली अमेरिकेत दाखल झाल्यावर थेरेसा यांनी इतर ज्यू लोकांप्रमाणे चरितार्थासाठी मिळेल ते काम केले. प्रथम एका बेकरीमध्ये, नंतर एका कपड्यांच्या कारखान्यात त्यांना काम मिळाले. त्यांचा मूळ स्वभाव चळवळ्या आणि बंडखोर असल्याने त्यांचे लक्ष कामगार स्त्रियांच्या प्रश्नांकडे वेधले गेले. थेरेसा फक्त प्रश्न बघून गप्प बसणाऱ्या महिला नव्हत्या... त्या प्रश्न सोडवण्यासाठी काय करता येईल याचा विचार करू लागल्या आणि त्यातूनच कामगार स्त्रियांच्या संघटनेची निर्मिती त्यांनी केली. या स्त्री-संघटनेतून स्थलांतरित कामगार स्त्रियांचा आवाज उठवण्याचे काम त्या करू लागल्या.

लवकरच त्यांच्या असे लक्षात आले की, फक्त संघटना चालवून भागणार नाही. महिलांना पुरुषांच्या समान हक्क हवे असतील तर राजकारणात उतरण्याशिवाय पर्याय नाही, हे त्यांनी ओळखले. आता त्यांनी कामगार स्त्रियांच्या प्रश्नांसोबतच एकंदरीत स्त्री-पुरुष समानतेवरही लक्ष केंद्रित केले. सोशालिस्ट पार्टीमध्ये प्रवेश करून त्यांनी राजकारणात शिरकाव करून घेतला. त्यावेळी सोशालिस्ट पार्टी ही एकमेव अशी पार्टी होती, ज्यात महिलांना प्रवेश मिळत असे. आम्ही स्त्री-पुरुष भेदभाव करत नाही अस त्यांचं ब्रीदवाक्य होतं. यामुळेच थेरेसा सोशालिस्ट पार्टीकडे आकर्षित झाल्या होत्या. परंतु दुर्दैवाने लवकरच त्यांना सत्य समजले की पार्टीचा नारा फक्त दिखाऊ स्वरूपाचा होता. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांना नगण्य स्थान मिळत असे. थेरेसा यांनी यामुळे निराश न होता असे ठरवले की, पार्टी न सोडता आपली समांतर विचारधारा चालवून आपले ध्येय साध्य करायला हवे. त्यांनी सोशालिस्ट महिलांची एक वेगळी चळवळ सुरू केली आणि महिलांसाठी राजकारणात एक वेगळे स्वतंत्र व्यासपीठ असायला हवे असे जोरदार मत मांडले.

शेवटी सोशालिस्ट पार्टीने त्यांचे म्हणणे मान्य केले आणि अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच महिलांसाठी वेगळे डिपार्टमेंट बनवण्यात आले. त्याच्या अध्यक्षपदी थेरेसा विराजमान झाल्या. मंडळी, त्या काळी ही गोष्ट अजिबात सोपी नव्हती! एक तर महिला, त्यात अमेरिकेबाहेरील स्थलांतरित कामगार... ही एका नव्या पर्वाची सुरुवात होती!

या पदावर बसून थेरेसा यांनी महिलांच्या हक्कासाठी लढा दिला. त्यातलाच एक हक्क म्हणजे महिलांना मतदानाचा अधिकार! तोपर्यंत अमेरिकेत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. तो मिळायलाच हवा हा मुद्दा थेरेसा यांनी सर्वांसमोर मांडला आणि बरेच प्रयत्न करून त्यासाठी समर्थन मिळवले. या सोबतच महिलांचे अनेक प्रश्न त्यांनी यशस्वीपणे हाताळले. महिलांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण केली.

थेरेसा यांनी जगाचे लक्ष महिलांच्या समस्यांकडे वेधले जावे म्हणून एक कल्पना मांडली. वर्षातला एक दिवस 'महिला दिन' म्हणून साजरा व्हावा हीच ती कल्पना... सोशालिस्ट पार्टीने त्यांना या बाबतीत साथ दिली आणि अमेरिकेत पहिला 'राष्ट्रीय महिला दिन' १९०९ साली २८ फेब्रुवारी रोजी साजरा झाला. ही कल्पना नंतर युरोपियन देशांमध्ये सुद्धा पसरली आणि नंतर जगभरात लोकप्रिय झाली. आज सर्वानुमते जगभरात एकाच दिवशी म्हणजे ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' साजरा होतोय, या मागे मूळ कारण थेरेसा सर्बर माल्कल या आहेत.

थेरेसा माल्कल यांचे १७ नोव्हेंबर १९४९ मध्ये निधन झाले. एक स्थलांतर होऊन अमेरिकेत आलेली मुलगी ते अमेरिकेच्या राजकारणातील बलशाली महिला असा त्यांचा थक्क करणारा प्रवास होता. त्यांचे निधन झाल्यावर हळू हळू लोक त्यांना विसरले. आज आपण महिला दिन साजरा करतो, पण थेरेसा यांचा उल्लेख कुठेही होत नाही हे दुर्दैवी सत्य आहे. (रशियातून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या या बाईंमुळे जागतिक महिला दिन साजरा होतो.) जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा आणि थेरेसा माल्कल यांना सलाम!

**कु.बोधिनी कांबळे**
**बी.ए.प्रथम वर्ष**

दोस्ती वो नही जो जान देती है
दोस्ती वो भी नहीं जो मुस्कान देती है
अरे! सच्ची दोस्ती तो वो है
जो पानी में भी गीरा हुआ आयु भी
पहचान लेती है।

**चि.हनुमान काळे**
**बी.ए.प्रथम वर्ष**

# कुछ रह तो नहीं गया

तीन महीने के बच्चे को
दाई के पास रखकर
जॉब पर जाने वाली माँ को
दाई ने पूछा ~
कुछ रह तो नहीं गया ?
पर्स, चाबी सब ले लिया ना ?
अब वो कैसे हाँ कहे ?
पैसे के पीछे भागते-भागते
सब कुछ पाने की ख्वाहिश में
वो जिसके लिये सब कुछ कर रही है,
वही रह गया है !
शादी में दुल्हन को बिदा करते ही
शादी का हॉल खाली करते हुए
दुल्हन की बुआ ने पूछा ~
भैया, कुछ रह तो नहीं गया ना ?
चेक करो ठीक से ..!
बाप चेक करने गया, तो
दुल्हन के रूम में
कुछ फूल सूखे पड़े थे.
सब कुछ तो पीछे रह गया.
21 साल जो नाम लेकर
जिसको आवाज देता था, लाड़ से,
वो नाम पीछे रह गया, और
उस नाम के आगे गर्व से
जो नाम लगाता था,
वो नाम भी पीछे रह गया अब.
भैया, देखा ?
कुछ पीछे रह तो नहीं गया ?
बुआ के इस सवाल पर
आँखों में आये आँसू छुपाता बाप
जुबाँ से तो नहीं बोला, पर दिल में
एक ही आवाज थी ~
सब कुछ तो यहीं रह गया .!
बड़ी तमन्नाओं के साथ बेटे को
पढ़ाई के लिए विदेश भेजा था,
और वह पढ़कर वहीं सैटल हो गया.
पौत्र जन्म पर बमुश्किल
3 माह का वीजा मिला था,
और चलते वक्त बेटे ने प्रश्न किया ~
सब कुछ चेक कर लिया ना ?
कुछ रह तो नहीं गया ?
क्या जबाब देते, कि अब
अब छूटने को बचा ही क्या है ..!
सेवानिवृत्ति की शाम
पी.ए. ने याद दिलाया ~
चेक कर लें सर ..!
कुछ रह तो नहीं गया ?
थोड़ा रूका, और सोचा कि
पूरी जिन्दगी तो
यहीं आने-जाने में बीत गई.
अब और क्या रह गया होगा ?
श्मशान से लौटते वक्त बेटे ने ...
फिर से गर्दन घुमाई,
एक बार पीछे देखने के लिए ...
पिता की चिता की
सुलगती आग देखकर
मन भर आया.
भागते हुए गया
पिता के चेहरे की
झलक तलाशने की
असफल कोशिश की ....
और वापिस लौट आया.
दोस्त ने पूछा ~
कुछ रह गया था क्या ?
भरी आँखों से बोला
नहीं , कुछ भी नहीं रहा अब.
और जो कुछ भी रह गया है,
वह सदा मेरे साथ रहेगा .!

**चि.तुषार पट्टेकर**
**बी.ए.प्रथम वर्ष**

# गंभीर बनू नका

फार गंभीर बनून जगू नका. हे विश्वकरोडों वर्षापासून आहे. कित्येक आले आणि गेले. कुणावाचून कुणाचे काही थांबत नाही. जे व्हायचे ते होत राहणार आहे. तुम्हाला विचारुन काही घडणार नाही. या जगात आपले काहीच नसते, त्यामुळे काही गमावल्याचे दुःख करु नका. मी अमूक ,मी तमूक असा अंहकार बाळगू नका. सर्वांशी प्रेमाने रहा.
धर्म, जात,तत्व, या गोष्टी माणसाने निर्माण केल्या आहेत, त्यामध्ये अडकून पडू नका..स्वतःचा भरवसा नसतांना इतरांना संपवण्याची भाषा बोलू नका.
इतिहासातील कुरापती काढून वर्तमान खराब करु नका. त्यांचे जीवन ते जगले. तुम्ही तुमचे जीवन जगा व इतरांना जगू द्या.

आता काळ बदलला आहे. आपली खरी गरज काय आहे,ओळखा! उगीच फालतू गोष्टीत नाक खुपसू नका. हजारों प्रकारचे संकट घोंघावत असतांना, क्षुल्लक गोष्टींने विचलित होऊ नका. जीवन गंमतीने जगा! जरा मोकळे पणाने हसा. इतरांनाही आनंदी करा. लक्षात ठेवा तुमच्या गंभीरपणाने कुणाचेही भले होणार नाही. साऱ्या जगाचा विचार करू नका. नसती चिंता करु नका.

लहान सहान गोष्टींचा आनंद घ्या. सतत गंभीर बनू नका. इतरांशी मोकळेपणाने बोला. त्यामध्ये कमीपणा मानू नका. तुम्ही स्वतः ला काही ही समजले तरी निसर्गाच्या पुढे तुम्ही फक्त एक जीव आहात.कुणाचाही द्वेष करु नका. सूडबुद्धीने वागू नका.
आपल्या अवतीभोवतीचे जग बघा. किती गंमत आहे चोहीकडे. मुंग्याची रांग बघा. पाखरांचे थवे बघा. बघा कावळ्याची स्वच्छता. खळखळणारा समुद्र तुमच्या सोबतीला आहे. त्याच्या उसळणाऱ्या लाटा तुम्हाला खुणावत आहेत.

जा उंच डोंगरावर! किती प्रेमाने तो डोंगर खांद्यावर खेळवतो. विचारा त्या कोकीळेला, इतकी सुंदर कशी गातेस? विविध रंगाची फूले बघा. आयुष्यात विविध रंग भरा. एकसारखे जीवन जगू नका.नवी ठिकाणे, नवी माणसे यांच्याशी मैत्री करा. प्राण्यांशी संपर्क ठेवा, त्यांचे जगणे बघा. कटकटी कमी करा. अधिक आनंदी जगा!

चि.सिद्दिकी जफिरोद्दिन
बी.ए.एस.वाय.

## विनोद

ललिता : माझा प्रियकर शंभरात एक आहे !
मालती : अस्सं, बाकीचे नव्याणव कोठे आहेत





मराठी विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ.रमेश गटकळ,डॉ.ज्ञानेश्वर गवते व संपादक मंडळ.



हिंदी विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख,हिंदी विभाग प्रमुख प्रा.युवराज मुळ्ये व संपादक मंडळ.



इंग्रेजी विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,इंग्रेजी विभाग प्रमुख डॉ.कमलकिशोर लड्ढा व संपादक मंडळ.



संस्कृत विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,संस्कृत विभागाचे प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर,प्रा.सुरेश नेळगे व संपादक मंडळ.



समाजशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख व संपादक मंडळ.



राज्यशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके व संपादक मंडळ.



अर्थशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.महेश देशमुख व संपादक मंडळ.



इतिहास विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,इतिहास विभाग प्रमुख डॉ.गोरखनाथ फसले व संपादक मंडळ.

# रिश्ते

कदम रुक गए जब पहुंचे
हम रिश्तों के बाज़ार में...
बिक रहे थे रिश्ते
खुले आम व्यापार में..
कांपते होठों से मैंने पूँछा,
"क्या भाव है भाई
इन रिश्तों का..?"
दुकानदार बोला:
"कौन सा लोगे..?
बेटे का ..या बाप का..?
बहिन का..या भाई का..?
बोलो कौन सा चाहिए..?
इंसानियत का..या प्रेम का..?
माँ का..या विश्वास का..?
बाबूजी कुछ तो बोलो
कौन सा चाहिए
चुपचाप खड़े हो
कुछ बोलो तो सही...
मैंने डर कर पूँछ लिया



"दोस्त का.."
दुकानदार नम आँखों से बोला:
"संसार इसी रिश्ते
पर ही तो टिका है..."
माफ़ करना बाबूजी
ये रिश्ता बिकाऊ नहीं है..
इसका कोई मोल
नहीं लगा पाओगे,
और जिस दिन
ये बिक जायेगा...
उस दिन ये संसार उजड़ जायेगा..."

**कु.अंजली खळगे**
**बी.ए.एस.वाय.**

# सहनशक्ती

असं म्हणतात की;जगातील कोणतचं दु:ख माणसाच्या सहनशीलतेपेक्षा मोठ नसतं.जेवढे मोठे संकट,अडचणी व समस्या जीवनात येतात तेवढी माणसाची सहनशक्ती वाढते.ती व्हीटामीनच्या गोळ्या,बैद्यनाथ च्यवनप्राश किंवा काजू बदामचा शिरा खाल्याने वाढत नाही.संकटे किंवा समस्या ह्या माणसाची कसोटी बघत असतात.नैसर्गिक संकट सोडले तर बऱ्याच समस्या,संकटे व दु:ख ही माणूस स्वत:वूनच निर्माण करतो.त्याला आपले अज्ञान,हावरट स्वभाव,संस्कार,वाईट सवयी व साथसंगत जबाबदार असते.

तसेच कुठलेही संकट,दु:ख किंवा समस्या ह्या दीर्घकाळ राहत नाही ह्यावर माझा दृढविश्वास आहे.ती कधीतरी,केव्हातरी संपतातच पण कमजोर,कचखावू प्रवृत्तीची आणि कमकुवत मनाची व्यक्ती जराश्या वाऱ्याच्या झुळकेने वृक्ष उन्मूलन पडावे तसे कोलमडून पडतात.निराश होऊन आत्महत्या करतात.जेव्हा त्याला स्वत:वर आत्मविश्वास राहत नाही तेव्हा दारू,ड्रग्स सारख्या वाईट व्यसनाला बळी पडतात.काही व्यक्ती आणखी चुकीचे निर्णय घेऊन जीवनभर चाचपडत राहतात.पण खंबीर मनाची व गंभीर स्वभावाची व्यक्ती हिमतीने त्यां सर्वांचा सामना करतात.प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द व साहस सोडत नाही.संकटाला संधी मानणारे लोकं यशस्वी होतात तर पराभूत,भीत्रे लोकं निराश होऊन जीवन संपवतात.

एकदम सोपी गोष्ट आहे,ती म्हणजे प्रत्येक वाईट परिस्थिती, घटना, प्रेमभंग, व्यवसायातील तोटा,दुर्घटना व संकटानंतर परत नव्याने सुरवात करता येते.ती केव्हाही करता येते बस थोडेसे धैर्य,संयम व सहनशक्तीची गरज असते.प्रत्येकच दु:ख,संकट व समस्या ही नविन शिकवण व अनुभव देऊन जाते.

**चि.खिजर सय्यद**
**बी.ए.एस.वाय.**

## विनोद

शिक्षक : रामू सागं बरं कापड म्हणजे काय ?
(रामू गप्प उभा राहतो.)
शिक्षक : बरं, सांग बरं हा तुझा शर्ट कशापासून बनवलाय?
रामू : माझ्या मोठया भावाच्या जुन्या शर्टापासून.



# वेळ व नशीब

एका माणसाचा मृत्यू जवळ आला म्हणून यमराज आले.त्यांना तहान लागली म्हणून त्यानी त्या माणसाजवळ पाणी मागितले त्याने सुध्दा पटकन दिले. यमराज खुश झाले म्हणाले तुझा प्राण नेण्यासाठी आलो आहे पण तू मला पाणी दिले आणि म्हणून स्वतःचे नशीब बदलण्यासाठी मी तुला फक्त पाच मिनिटे देतो.यमराजने त्याला एक वही दिली आणि म्हणाले तू या वहीत जे लिहिशील ते तुला मिळेल फक्त पाच मिनिटे.

त्या माणसाने वही उघडली तर पहिल्या पानावर असे लिहिले होते की त्याच्या भावाला 10 लाखाची लॉटरी लागणार आहे, त्याने आपले नशीब बदलण्याच्या ऐवजी भावाचे नशीब बदलले,तिथं लिहिले भावाला लॉटरी लागू नये. दुसरे पान उलटले तर तिथं असे लिहिले होते की शेजारच्या मुलाला खूप मोठया कंपनीत खूप मोठया पगाराची नोकरी लागणार आहे, याच्या पोटात दुखू लागले त्याने त्याचे नशीब लिहून बदलले,नोकरी लागू नये. तिसरे पान पाहिले तर त्यावर लिहिले होते त्याचा मित्र सरपंच होणार होता,याला वाईट वाटले,त्याने त्याचे नशीब बदलले,याला सरपंच पद मिळू नये. पाने उलटत राहिला आणि जेव्हा स्वतःच्या पानावर लिहायची वेळ आली तेव्हा पाच मिनिटे संपली होती. यमराजाने त्याच्या हातातून वही काढून घेतली आणि म्हणाला तुझी वेळ संपली आता तू तुझे भविष्य बदलू शकत नाही. लोकांची भविष्य बदलण्यात किंबहुना लोकांचे वाटोळे करण्यात वेळ घालवला पण स्वतःचे कल्याण करून घेता आले नाही. आता तुझे मरण निश्चित..

**कु.अंजली खळगे**
**बी.ए.एस.वाय.**



# पर्यावरण जनजागृती

## 1. पर्यावरण विषयक पहिली जागतिक परिषद

आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण विषयक "पहिली जागतिक परिषद "5 जून 1972 मध्ये स्वीडनमधील "स्टॉकहोम "या शहरात झाली या परिषदेत अनेक लहान मोठ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यात पर्यावरणीय प्रदूषण औद्योगिक व रासायनिक प्रदूषण, हरितगृह परिणाम, ओझोन वायूचा क्षय ,आम्लपर्जन्य अशा विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. यामुळे संपूर्ण जगात पर्यावरण चळवळीला चालना मिळाली .संयुक्त राष्ट्रसंघाने देखील पर्यावरण संरक्षणासाठी विविध कार्य सुरू केले उदा. युनेपद्वारा (UNEP)पर्यावरण अभ्यास व संशोधनाला चालना देण्यात आली. लोकसंख्या नैसर्गिक साधन संपत्ती हवामान, मृदा व्यवसाय इत्यादी बाबतच्या मानवी हस्तक्षेप बाबत सर्वेक्षणाला चालना मिळाली .हवामान बदलाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली. सागर प्रदूषण नियंत्रण विषयी आंतरराष्ट्रीय कायद्याचे निर्मिती व अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे जागतिक स्तरावर पर्यावरण विषयक जनजागृती मोठ्या प्रमाणावर झाली.

## 2. वसुंधरा शिखर परिषद

वसुंधरा शिखर परिषद ही 3 जून ते 14 जून 1992 या कालावधीत ब्राझीलमधील" रिओडी जानेरो "या शहरात संपन्न झाली. या परिषदेमध्ये संपूर्ण जगातील लहान-मोठ्या 156 राष्ट्रांनी सहभाग घेतला या परिषदेत पर्यावरण विषयक विविध घटकांची चर्चा झाली पर्यावरण व नैसर्गिक संपदेचा विकास यावर चर्चा होऊन नैसर्गिक संपत्तीच्या वापराबाबत एक नवी दृष्टी देण्यात आली. यात मानव आणि पर्यावरण यांच्या अनुषंगाने खालील घटकावर चर्चा झाली.

1.उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर आणि वापराच्या पद्धती.

2.मानवी विकासाची पर्यावरणीय दृष्टीने छाननी करणे.

3. पृथ्वीवरील सतत बदलणाऱ्या हवामानाची चिकित्सा करणे.

4. जीव समूहाच्या अस्तित्वाचा प्रश्न अभ्यासणे.

5. प्रदूषण नियंत्रणाचे प्रभावी मार्ग कोणते अवलंबवायाचे.

6. मानवी जीवन पद्धतीची समीक्षा करणे.

7. उत्पादनाच्या पद्धतीत संवर्धन तत्त्वावरील गतिमानता.

8.पृथ्वी संरक्षण निधीची उभारणी व त्यातून राष्ट्रा -राष्ट्रांमधील पारंपारिक तंत्रज्ञानाची सुलभ देवाणघेवाण करणे.

9. पर्यावरणाबरोबरच विश्वबंधुत्वाची भावना जनमानसात रुजविणे.

10. जागतिक विकसित राष्ट्रांनी पर्यावरणविषयक जास्तीत जास्त जबाबदारी उचलणे.

11. वैज्ञानिक चाचण्या ,अनुबॉम्ब निर्मिती, अनुस्फोट चाचण्या ,प्रलयकारी शास्त्रांचा वापर याविषयी नियंत्रक उपाययोजना कार्यान्वित करणे.

पर्यावरण शास्त्राचे इतर विद्याशाखांची असणारे संबंध

पर्यावरणशास्त्राचे स्वरूप हे आंतरविद्याशाखीय व बहुविद्याशाखिय आहे. बहुतेक नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांमध्ये पर्यावरण शास्त्राचा समावेश होतो. तसेच बहुतेक विद्याशाखा आणि शास्त्रांमध्ये पर्यावरण शास्त्राचा अभ्यास वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो .याच्या अभ्यासामध्ये पर्यावरण आणि मानव हा विषय मध्यवर्ती असला .तरी ह्याच्या अभ्यासाचा समावेश नैसर्गिक शास्त्राप्रमाणे समाजशास्त्र, अर्थशास्त्र, व्यापार शास्त्र, राज्यशास्त्र, इ. सामाजिक शास्त्रांमध्ये करण्यात आलेला आहे.

पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासातील प्रदूषण हा एक अभ्यास घटक विचारात घेतला तर त्याचे अध्ययन पर्यावरण भूगोल, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र ,प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र , सूक्ष्मजीवशास्त्र, मृदा शास्त्र, सागर शास्त्र ,वातावरण शास्त्र, शरीरक्रिया शास्त्र व आरोग्यशास्त्र अशा अनेक शास्त्रांमध्ये केले आहे.

भारतात पर्यावरण विषयीची धोरणे शासकीय पातळीवर ठरविली जातात . त्यांची अंमलबजावणीही सुरू असते. पर्यावरण संरक्षणाविषयी कायदेही भरपूर आहेत. पण भारतातील प्रत्येक व्यक्तीची पर्यावरण संतुलन बाबतीत काही कर्तव्य आहेत. पर्यावरणाची निगा राखणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. म्हणून पर्यावरणासंबंधी जनजागृती करण्यासाठी विविध माध्यमांची मदत घेतली पाहिजे.

पर्यावरण विषयक अभ्यास प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावर समाविष्ट केला गेला पाहिजे म्हणून जून 2005 पासून महाराष्ट्र सरकारने शालेय स्तरावर पर्यावरण अभ्यास सर्वांना सक्तीचा केला आहे . तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालानुसार विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयीन स्तरावर प्रथम/द्वितीय वर्षासाठी सर्व शाखांना पर्यावरण विषय जून 2004 पासून अनिवार्य केला आहे .यामुळे पर्यावरण विषयी जाणीव समाजात निर्माण होते.

पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी शैक्षणिक अभ्यास सहली ,गटचर्चा, कृतीसत्रे ,परिसंवाद, अधिवेशने, प्रदर्शन असे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही चळवळ जनसामान्यांची आहे. याची जाणीव होणे ही काळाची गरज आहे.

जनजागृतीची उद्दिष्टे

**पर्यावरण जनजागृती किती महत्त्वाची आहे हे पुढील उद्दिष्टांवरून स्पष्ट होते.**

1. लोकसंख्येचे संतुलन राखणे.
2. हवेची गुणवत्ता सुधारणे व टिकवून ठेवणे.
3. पाणी प्रदूषण ,अपव्यय थांबविणे व गुणवत्ता टिकवणे.
4. जमिनीचे प्रदूषण थांबविणे व जमिनीचा पोत सुधारणे.
5. ध्वनी प्रदूषण कमी करणे.
6. आण्विक अपघात व इतर आरिष्ठे हे कमी करण्याचा प्रयत्न करणे.
7. पृथ्वीवरचे वाढते तापमान कमी करणे.

8. हरितगृह वायूंचे प्रमाण कमी करणे .

9. ओझोन वायूचा क्षय कमी करणे.

10. वाढते शहरीकरण ,औद्योगिकीकरण, जंगलतोड यास आळा घालने.

11. पर्यावरण खात्यांमधील भ्रष्टाचार प्रदूषणाबाबत जनमताचा आवाज उठविणे.

12. निसर्गाच्या ऱ्हसाला आळा घालने पर्यावरणाचा समतोल राखणे.

**जनजागृतीच्या पद्धती**

विविध उपक्रमांमधून पर्यावरण जनजागृती करता येते .त्यामध्ये काही पुढील जनजागृतीच्या पद्धती महत्त्वाच्या आहेत.

1. शालेय स्तरावर ,महाविद्यालयीन स्तरावर आणि समाजाच्या सर्व सर्व स्तरावर पर्यावरण शिक्षण सक्तीचे करणे.

2. सार्वजनिक, सरकारी व बिनसरकारी संस्था यांचा सक्रिय सहभाग व मार्गदर्शन.

3.शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम, प्रदर्शने, चर्चासत्रे, व्याख्याने, पर्यावरण ध्वनिफीत, चित्रपट यांचे आयोजन करणे.

4. सामाजिक कामातून जनजागृती करणे.

5. शासकीय स्तरावरील प्रमाणिक इच्छाशक्ती व जिद्द.

6. दूरदर्शन ,आकाशवाणी ,वर्तमानपत्रे यामार्फत जनजागृती.

7. पर्यावरण समस्येच्या क्षेत्रांमध्ये शैक्षणिक सहलींचे आयोजन.

8.जागतिक पर्यावरण दिन वसुंधरा दिन, वन्यजीव सप्ताह साजरे करणे.

9. "झाडे लावा झाडे जगवा" या सारखी मोहीम हाती घेणे.

अशाप्रकारे पर्यावरण विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीने पर्यावरण शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. त्यामुळे जनजागृतीसाठी पर्यावरण शिक्षण ही काळाची गरज आहे असे मानले जाते.

**चि.चंद्रशेखर कसबे**
**बी.एस्सी तृतीय वर्ष**



# मुलीचे अस्तित्व

मीना साधी भोळी सत्तेश्वर नावाच्या गावात राहणारी ही मुलगी आपल्या आई आणि बाबाची कामात मदत करणे, शाळेत जाणे, लिहिणे, वाचणे आणि मैत्रिणिसोबत खेळणे हे तिला खूप आवडायचे. आता मिना दाहावीला बसली होती. पण मीनाच्या गावाचे सरपंच मनोहर लाल हे खूप अकडेल स्वभावी आणि वाईट विचारांचे होते.

एके दिवशी मिना शाळेत जात होती मिना खूपच खूश होती. तिचे बाबा पण तिच्या सोबत होते. आत्ता मीनाला नविन कपडे, नवीन वह्या, पुस्तक, भेटले होते. जात जात पुढे मनोहर लाल भेटले. बघताच मनोहर मिनाला म्हणाले, ऐ पोरि कोठे जाते, हे काय शाळा वाळा शिकते, घरी बस अन स्वयंपाक शिक शाळा शिकून तु कोठे नौकरीला लागणार आहेस.

मीना काही विचार न करता मनोहरलाल ला बोलली दादा मी दहावीत शंभर पैकी शंभर मार्क्स मी  पण आनेण आणि राहिली गोष्ट माझ्या नौकरीला लागण्याची तर त्याचं टेशन तुम्ही घेऊ नका. मीनाच्या अभ्यास करणे खूप आवडायचे पण आत्ता तिची आवड तिच्यासाठी चॅलेंच बनले होते. तिने जिवतोडून अभ्यासाला सुरुवाता केली.
हळुहळु दिवस कटत होते मीनाचं जीवन खूपच छान प्रकार प्रवास करत होते. पण काय झाले असावे. अन् काय नाही अचानक मीनाच्या आईची तबियत खराब झाली त्यांना
डॉक्टरांना दाखवण्यात आले. डॉक्टराने मीनाच्या आईला पूर्णपणे आराम करायला लावले आत्ता मीनाचे काम वाढले होते. शाळा,अभ्यास, घरची कामे तरी तिने हार नाही मानली.ती काम अने अभ्यास करतच राहिली. ती शाळेतून आली आणि पूर्ण काम आवरले अन् मैत्रिणीच्या घरी अभ्यासासाठी गेली.

आईला तहान लागली आई बाजावरून खाली उतरली अन् पाणीच्या घड्याकडे जावू लागली हातातली काठी निसटली अन् मिनाच्या घरचा दिवा विजला आणि मिनाची आई देवाला पावली. मीनाची परीक्षा जवळ जवळ येत होती तिला आता अभ्यास करणे खूप अवघड जावू लागले. तरी मिना लवकर उठून अभ्यास करायची आणि रात्रिपण खूपवेळेपर्यंत ती लिहित बसायाची. आत्ता मिनाची परिक्षा आहे तिला उदया लवकर उठायचे होते. ती लवकर उठली अन् फटाफटा सगळे काम आवरून देवाच्या मंदिरात गोली. देवाला फक्त येवढच बोलली की देवा मी काय तुला माझी मदत कर अस म्हणत नाहिये पण फक्त माझ्या या जिवनाच्या संघर्षात माझी सात दे येवढीच मागणी आहे माझी म्हणतच ती शाळेत जावू लागली. घराच्या बाहेर पडणारच ते तिला तिच्या आईचे फोटो जे दरवाज्याच्या बाजूला लावले होते ते दिसले अन् तिच्या डोळ्यातून अमू थांबेना ती आपल्या मनाला सावरत ती परीक्षेला गेली. आज मिनाचे शेवटचे पेपर होते. ती शाळेत जातच होती तिचा पूर्ण लक्ष पेपराकडे आकर्शित झालेले होते.ती मस्त पणे विचारात होती. अन् पुढे चालत होती पुढून येणाऱ्या गाडिचे हर्न जोरात वाजत होते. पण मिनाचे लक्ष गाडीकडे नव्हते.ती चालतच होती अचानकच तिचे लक्ष गाडीकडे गेले. तिने उडी मारली पण तिच्या पायात

पाय आडकले अनू ती खाली पडली गाडि खूपच वेगाने येत होती. मीनाच्या हातावरून गाडी गेली.एका वृद्ध मानसाने लोकांना बोलावले मिनाच्या बाबांनापण बोलावले मिनाला दवाखाण्यात नेले डॉक्टरने मिनाला चेक केलं हाताला पट्टी केली. अनू जेव्हा मिना आपले डोळे उगडनार होती. हे तर काय तिला समोरच काहीच दिसत नव्हत. बाबा बाबा मला काहीच नाही दिखते मी काय करू माझं आज पेपर आहे बाबा मी काय करू मला शाळेत जायचय चालाना बाबा,बाबांनी तिला शाळेत नेलं शाळेत तिला येऊदेत नव्हते.तिने हट्ट धरला जाऊद्या मला तिची अन् तिच्या बाबाची अवस्था बघून तिला तिच्या वर्गात नेऊन बसवले पण तिला काही दिसत नव्हते. तिने विचार केला आणि सरांना म्हणाली सर मला काही दिसत नाहीये तुम्ही प्रश्न वाचून मला सांगाल का? सरानी मिनाकडे बघून होकार दिला सरांनी प्रश्नवाचायला सुरुवात केली. मीनाने पेन बाबांच्या हातात दिली अन् सर प्रश्न सांगत होते मिना उत्तर सांगत होती, अनू बाबा उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहित होते. बघता बघता मिनाचे पेपर सुटले.

मीनाची ती हुशारी कामाला आली पण ती एका मार्काने हरली. शंभर पैकी नव्यानव मार्क तिला पडले व पूर्ण तालुक्यातून ती पहिल्या आली. हारून सुद्धा मिना जिंकली.
मनोहर लाल ने अपली मनोवृत्ती बदलली अनू हार मानली. मुलीना अन् मुलांना शिकवलं पाहिजे. त्यांना त्यांचा भविष्य घडवून दिले पाहिजे. शिक्षण हा मुली आणि मुलांचा हक्क आहे तो त्यांना मिळालाचं पाहिजे असेही मनोहर लाल ने सांगितले.एका मिनामुळे सगल्या तालुक्यातल्या मुलींना शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला.

**कु.पल्लवी सुधाकर राठोड**
**१२वी कला**




लोकप्रशासन विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.सुनिल पाटील व संपादक मंडळ.



रसायनशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विकास बोरगावकर,प्रा.संजय पवार व संपादक मंडळ.


भौतिकशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिवशंकर मिटकर व संपादक मंडळ.


प्राणीशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी, मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सीताराम इंगोले व संपादक मंडळ.


वनस्पतीशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रेमनंदा घडसिंग,डॉ.गजानन होन्ना व संपादक मंडळ.


गणितशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख, गणितशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रेम राठोड,प्रा.ए.एल.डोंगरदिवे व संपादक मंडळ.



संगणकशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख व संपादक मंडळ.


क्रिडा विभागाच्या भित्तीपत्रक विमोचन प्रसंगी मा.अभयजी कोकड,मा.शशीकिरणजी गडम,मा.सुमंतजी कुलकर्णी,मा.बळीरामजी सोळंके,प्राचार्य डॉ.महेश देशमुख,

# भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्य व सध्यस्थिती

**“हे राष्ट्र जनवासियांचे,**
**जन हेच राष्ट्रीय धन हे,**
**विचार अहोरात्र मानवकल्याणाचा,**
**विचारपूर्वक गुंफुनी मोती कलमांच्या,**
**पुष्पमाला बनविली (संविधान) भारतभूच्या लेकरांकरिता,**
**आपल्यांसाठी आपल्यांनी आपण सांभाळले भारतभूला,**
**या पुष्पमालेने भारतभूमीच्या रक्षणी...”**

ब्रिटीशांनी भारतावर 150 वर्षे राज्य केली ज्या काही सुविधा केल्या तेव्हा स्वतःच्या फायदयाचा प्रथम विचार केला स्वातंत्र्यासाठी कित्येक क्रांतीकारकांनी, जनतेनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला, तेव्हा कुठे इंग्रजांनी आपले भारतवासियांचे स्वातंत्र्य मान्य केले. स्वातंत्र्य मिळणार पण कारभार करणार कसा ? त्यांना वाटले की 10-20 वर्षांत आपण परत भारतात येऊ पण क्रांतीकारकांचे बलिदान व्यर्थ न जावे यासाठी भारतीयांनी विचारपूर्वक स्वातंत्र्य मिळवण्याच्या 17-18 वर्षे आधी पासुनच स्वातंत्र्याची नांदी त्यांना कळली होती. भारतीय संविधानातील कर्तव्ये समजव्याआधी भारतीय संविधानाची निर्मिती कशी कशी होत गेली, हे पाहणे अधिक संयुक्तिक ठरेल.

आपल्या देशाचा राज्यकारभार आपल्या संविधानानुसार चालतो देशाच्या कारभारासाठी तयार करण्यात आलेले पायाभुत कायदे, नियम व तरतुदी ज्या पुस्तकात एकत्रित आहेत, त्यास संविधान म्हणतात. संविधानास 'राज्यघटना' म्हणतात संविधानानुसार राज्य कारभार केल्यास लोकशाही बळकट होते. राज्यकारभार ब्रिटिशांनी नव्हे तर भारतीयांनी केलेल्या कायदयानुसार चालावा म्हणून इ. स. 1946 साली संविधान सभेची स्थापना करण्यात आली.

जगात इंग्लंड, न्यूझीलंड आणि इस्त्राईल ही तीन लोकशाही राष्ट्रे वगळता सर्व राष्ट्रांची लिखित राज्यघटना आहे. भारतातील राज्यघटनेची उत्क्रांती ही ब्रिटीश ईस्ट इंडिया राजवट भारतात जेव्हा स्थापन झाली त्या काळापासून सुरू झाली. हा काळ सुमारे 350 वर्षांचा आहे भारतीय स्वातंत्र्य चळवळींचाही संविधान निर्मितीवर प्रभाव पडलेला दिसतो. इंग्रजांनी अनेक कायदे केले त्यांपैकी 1935 चा भारतीय सरकारचा सर्वात जास्त प्रभाव भारतीय राज्यघटनेवर आढळला. तसेच ब्रिटिश लोकशाहीचाही अभाव आहे 16 मे 1946 ला राज्यघटनेच्या निर्मितीची योजना कॅबीनेट कमीशनच्या शिफारसीनुसार मांडण्यात आली. प्रथम 22 सदस्य व संस्थानिक प्रदेशांचे 70 प्रतिनिधी म्हणजे 389 सदस्य असणार होते. पण फाळणीमुळे ती संख्या 299 वर आली.

**"संविधान मूल्यांना घेऊन सोबती**
**धर्म, वंश, जातीभेदांना घेऊनी हाती "**

संविधान सभेने 22 समित्या स्थापन केल्या पण फक्त 10 समित्या अतिमहत्त्वाच्या होत्या. घटना परिषदेची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 ला भरली होती. अध्यक्ष होते जेष्ठ सदस्य सच्चिदानंद सिन्हा 11 डिसेंबर 1946 ला डॉ.राजेंद्रप्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. 12 समित्यांपैकी मसुदा समिती ही महत्वपूर्ण होती तिची निर्मिती नेहरूंच्या प्रांतिक मंडळाने केली 29 ऑगष्ट 1947 ला डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती नेमण्यात आली. 1919 च्या अमृतसरचा काँग्रेस अधिवेशनात भारतीय घटना तयार करण्यासाठी मागणी मांडली होती ही राज्यघटना लिहिण्यासाठी 2 वर्ष 11 महिने 18 दिवस लागली. जगातील सर्वात मोठी राज्यघटना आयर्लंडची असून दुसऱ्या क्रमांकाची राज्यघटना आपल्या भारताची आहे, हे लक्षात असू दया. भारतीय राज्यघटनेत 395 कलमे 22 भाग 9 परिशिष्टे होती. सध्या 470 कलमे 25 भाग व 12 परिशिष्टे आहेत. 26 जानेवारी 1930 ला 'स्वराज्य दिन' पाळण्यात आला. त्या राज्यघटनेप्रमाणे कारभार 26 जानेवारी 1950 पासून प्रत्यक्ष सुरु झाला म्हणून हा राष्ट्रीय दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून पाळण्यात येतो. राज्यघटनेमध्ये फक्त भारतीयचं केंद्रस्थानी आहेत त्यांच्या विकासाचा, प्रगतीचा अन् उन्नतीचाच विचार, प्रतित होतो व्यक्ती आणि समाज यांच्यात सुसंवाद साधला जाऊन नागरिकांना व्यक्तिविकास साधता यावा यासाठी मुलभूत हक्क व कर्तव्ये नमुद केलेली आहेत. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाव्याच्या दोन बाजू आहेत हक्कांचा वापर करून कर्तव्यांचे व्यवस्थित पालन केले तर खऱ्या अर्थाने लोकशाही नांदेलही व टिकेलही.

**“संविधान मूल्यांचा संस्कार,**
**देईल देशाला आकार”**

